म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...
क्र. 3239

REFBK-0025444

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

14 JAN 1989

30 APR 1989

18 FEB 1990

26 APR 1995

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संयुक्त निबंध ३२३७

२५४४४

१५।१११८७



लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास

लेखक
डॉ. शरद व्यवहारे
एम. ए., बी. एड्.; पीएच्. डी.
मराठी विभाग, मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद (महाराष्ट्र)

REFBK-0025444

विश्वभारती प्रकाशन
धनवटे चेम्बर्स, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२.

लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास

लेखक
डॉ. शरद व्यवहारे
एम. ए., बी. एड., पीएच्. डी.
मराठी विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रकाशक: आर. बी. सिंह, विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेम्बर्स सीताबर्डी, नागपूर ४४००१२
मुद्रक : एस. एम. बोकडे, संजय टेक्नीकल प्रिन्टर्स, सिरसपेठ तेलीपुरा, नागपूर ४४००१९

प्रथम आवृत्ती १९८७

मूल्य रु. विशेष बांधणी ५०-००
विद्यार्थी संस्करण ३५-००

माझ्या आयुष्याच्या वाटचालीत ज्यांचा
मोलाचा सहभाग आहे अशा–

- राम नारायणराव अकमार
- माधव विठ्ठलराव नाईक
- वसंत सिताराम कावरखे पाटील

या माझ्या विद्यार्थी मित्रांना.....



प्रस्तावना

लोकसाहित्य हे चिरंतन अशा उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणारे अक्षर वाङ्मय आहे. आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा म्हणजे लोकसाहित्य. भारतीय लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य असून ते अत्यंत संपन्न आहे. अशा या लोकसाहित्याच्या संग्रहाचे आपल्याकडे बरेच प्रयत्न झाले आहेत. विविध स्वरूपांत लोकसाहित्य उपलब्ध होऊन लोकसाहित्याचे अनेक संग्रह प्रकाशित झाले आहेत. लोकसाहित्याच्या अभ्यासाची आवड आज अभ्यासकांत निर्माण होत आहे ही एक समाधानाची बाब आहे. लोकसाहित्याच्या संग्रहाबरोबरच लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास होणे हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासाची आज अत्यंत आवश्यकता आहे. महाराष्ट्रात लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासाचे प्रयत्न झाले आहेत, होत आहेत, ही एक चांगली बाब आहे.

डॉ. शरद व्यवहारे यांचा 'लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास' हा लोकसाहित्य विषयक ग्रंथ लोकसाहित्याच्या शास्त्रीय अध्ययनांत निश्चितच भर टाकणारा असा ग्रंथ आहे, असे मला वाटते. डॉ. व्यवहारे हे लोकसाहित्याचे एक अभ्यासक व संशोधक आहेत. मराठवाड्यांतील लोकसाहित्याचा त्यांनी जो संग्रह केला आहे त्यातून त्यांची लोकसाहित्या विषयीची आवड प्रकट झाली आहे. लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास करून त्यांनी अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केला आहे. या प्रबंधास मराठवाडा विद्यापीठाची पीएच. डी. पदवीसाठी मान्यता मिळाली आहे.

'लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास' या आपल्या ग्रंथातून डॉ. व्यवहारे यांनी लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसाहित्याच्या उद्‌गमापासून ते विकासापर्यंत निरनिराळ्या अवस्थांचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला आहे. लोकसाहित्य म्हणजे काय, लोकसाहित्यातील 'लोक' लोकसाहित्याची व्याप्ती आणि लोकसाहित्यातील अभ्यास संप्रदाय इत्यादी बाबींची शास्त्रीय चर्चा करून लोकसाहित्याचा इतर सामाजिक शास्त्रांशी असलेला अत्यंत जवळचा संबंधही त्यांनी स्पष्ट केला आहे.

डॉ. व्यवहारे यांच्या या ग्रंथाचा एक विशेष म्हणजे लोकगीते, लोककथा, उखाणे आणि म्हणी या लोकसाहित्याच्या मुख्य अंगाचीत्यांच्या स्वरूप वैशिष्ट्यासह केलेली चर्चा लोकगीतांची स्वरूप वैशिष्टये, लोकगीतांचे वर्गीकरण आणि लोकगीतामागील प्रेरणा इत्यादी बाबींचा त्यांनी शास्त्रीय दृष्टया घेतलेला परामर्श निश्चितच लोकसाहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरेल असे मला वाटते. लोकजीवनाचा आविष्कार म्हणजे लोकसाहित्य, लोकसाहित्य लोकजीवनातून आकारास येत असते, आणि लोकसाहित्यात लोकजीवनाचे प्रतिबिंब पडत असल्याने लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यातील जवळीक डॉ. व्यवहारे यांनी लोकसाहित्यातून होणारा लोकजीवनाचा आविष्कार, या प्रकरणातून विविध उदाहरणांसह स्पष्ट केला आहे.

डॉ. व्यवहारे यांच्या या ग्रंथाचा आणखी एक विशेष असा कीं, लोकसाहित्याचे खरे वारसदार, लोकसाहित्याचे विविध उपासक, लोककथा गीतांची स्वरूप-वैशिष्टये, यांची आणि ज्या लोकजीवनांत या लोकसाहित्याची जपणूक होत असते. त्या लोकजीवनातील भाव विश्वाची आचार-विचारांची ही त्यांनी दखल घेतली आहे. लोकसाहित्याच्या सर्व प्रमुख अंगाचे विवेचन करण्यांचा डॉ. व्यवहारे यांचा प्रयत्न लक्षांत घेण्याजोगा वाटतो.

लोकसाहित्य हा आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. लोकसाहित्यात लोकजीवनाची व लोकसंस्कृतीची अत्यंत-हृदयंगम चित्रे रेखाटलेली आहेत. लोकसाहित्याचा हा अमूल्य ठेवा प्राचीनकाळापासून ग्रामीण जन लोकानी जीवापाड जतन करून ठेवला आहे. या लोकसाहित्यांत त्यांचाच आत्मा सामावलेला आहे. असे मला वाटते. अशा या लोकसाहित्याच्या अभ्यासाचे मराठीत अधिकाधिक प्रयत्न व्हावयास हवेत.

डॉ. व्यवहारे यांचा हा ग्रंथ लोकसाहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त वाटेल असा विश्वास वाटतो. डॉ. व्यवहारे यांच्या या पहिल्या प्रयत्ना बद्दल त्यांचे अभिनंदन.

स्वाक्षरीत
डॉ. यू. म. पठाण,
प्रमुख, मराठी विभाग,
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

औरंगाबाद
दि. ८-४-१९७९

आत्मनिवेदन

'लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास' हा माझा छोटासा ग्रंथ रसिकापुढे सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. याप्रसंगी मनात भावनेचे अनेक उमाळे घर येऊ पाहतात. माझ्या अंतरीचा उमाळा येथे व्यक्त करणे अप्रस्तुत ठरणार नाही असे वाटते.

मला चांगले आठवते, मी आठ-नऊ वर्षाचा असेन तेव्हा लोकसाहित्यातील लोककथेचा आणि माझा संबंध आला. आमचे राहते घर मराठी जातीच्या गल्लीत होते. आमच्या शेजारी ४०-४५ वर्षे वयाची मराठी जातीची विधवा बाई आपल्या दोन मुलासह राहत असे. मी तिला 'गंगाची माय' म्हणून हाक मारीत असे. गंगा नावाची तिला मुलगी होती. दिवसभर तिच्या दोन मुलासह-साऱ्याच वयाचा एक मुलगा आणि एक माझ्यापेक्षा थोडा मोठा. तिच्याच घरी खेळायचो आणि रात्री तिच्याच घरी झोपायचो. रात्री आम्ही तिघांना घेऊन ही गंगाची माय आम्हाला गोष्टी सांगायची. राजाची, त्याच्या आवडत्या नावडत्या राण्यांची, म्हातारीची वेडगळ जावयाची अशा अनेक कहाण्या ती आम्हाला सांगत असे. कहाणी ऐकता ऐकता केव्हा झोप लागायची कळायचे सुद्धा नाही. लोककथांचा आणि माझा पहिला परिचय झाला तो असा आणि प्रातःकाळी जागा व्हायचो तो जात्याच्या घरघरीने. सकाळीच उठून गंगाची माय जात्यावर दळण दळीत असे आणि दळण दळता दळता ओव्या म्हणत असे. मी अंथरूणात पडून या ओव्या ऐकायचो. माझा असा हा क्रम एक सारखा वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत चालला. आणि मला जणू काही गंगाच्या मायने लोकसाहित्याचे बाळकडूच पाजिले. तेव्हा पासून मला लोकसाहित्याची आवड लागली. ही आवड वाढतच गेली आणि आजही लोकसाहित्याची मला अत्यंत आवड आहे आणि या माझ्या आवडीचा परिणाम म्हणजे मी लोकगीते, लोककथा विपुल प्रमाणात संग्रह केले, पीएच्. डी. पदवी साठी लोकसाहित्यावर प्रबंध लिहिला आणि आज लोकसाहित्य विषयक प्रस्तुत ग्रंथ रसिकापुढे ठेवीत आहे.

० ० ०

आता ही गंगाची माय नाही पण तिने सांगितलेल्या कहाण्या मात्र आजही माझ्या मनात खोलवर रुजलेल्या आहेत.

मॅट्रिक पास झालो. शाळा सोडली आणि शाळेत गेलो. दूरच्या एका खेड्यात शिक्षक म्हणून माझी नेमणूक झाली. डोंगर रुपारीतले हे गाव. आदिवासींची वसती असलेले हे गाव. आंध आणि बंजारा या जमातीची वसती. त्यांच्यात रमलो. त्यांचे जीन अगदी जवळून न्याहळीले. आंधाचे 'दिडार' ऐकण्यात कित्येक रात्री घालविल्या. वजारा जमातीच्या लोकासवे होळीची गाणी, लग्नाची गाणी ऐकली. माझ्या पाच बंपाच्या वास्तव्यात मी आंध आणि बंजारा या आदिवासी जमातीच्या सहवासात चांवगलाच रमलो. त्यांच्यातील काही मित्रासमावेत त्यांच्या सोयऱ्यांच्या तांड्याना भेटी दिल्या आणि या जमातींच्या जीवन विशेषांची नोंद मनात आणि कागदावर घेतली. ग्रामीण जीवनही अत्यंत जवळून पाहिले आणि अनुभवले. ग्रामीण जीवनाची सुख-दुःखे पाहिली. आपल्या रखरखीत जीवनातही या जमाती आपली संस्कृती आणि वैशिष्टये यांची जोपासना करताना पाहून मनात विचार तरंग निर्माण झाले. लोकसाहित्याच्या या जनकाचा, वारसदारांचा माझा परिचय झाला तो असा.

गावोगाव हिंडून तेथील लोकजीवनाचा आणि लोकसाहित्याचा अभ्यास करणे हा माझा छंदच झाला. पायाला भवरा असल्याप्रमाणे मी निरनिराळ्या गावांना भेटी देऊ लागलो. लोकसाहित्याच्या आणि लोकजीवनाच्या अभ्यासासाठी कधी जाणीवपूर्वक तर कधी अनाहूतपणे, कधी 'जांभरुन' तर कधी 'वरखेडा' या प्रमाणे ७८८ गावांची यात्रा केली. काही ठिकाणी या वाङमयप्रकाराशी संबंधिताशी केवळ दृष्ट भेट झाली. काहीनी अंतरीचे गूज सांगितले तर काहीनी 'कोंडी' घालून कोडग्यात टाकले. तर काही ठिकाणी वासुदेवाची श्रीकृष्णभक्तीपर रसाळ गीते ऐकली. कुठे कुणाच्या लग्न सोहळ्यास उपस्थित राहून 'गोंधळ' अवलोकिला तर कोठे 'जागरण' केले. तर कोठे 'पाळणा' ऐकला. कुठे खंडेरायाला हाक दिली तर कोठे 'मुरळीचा' नाच ही पाहिला. कुठे 'सकाळची कहाणी', 'दुपारतीला ऐकली' तर कुठे उजाड माळावरही आवडती-नावडतीच्या महालाची वर्णने तासन्तास ऐकण्यात रमलो. तर कोठे मांडवावर चाललेल्या गप्पागोष्टीत रंगलो. आणि मग कळले की लोकसाहित्याचा हा 'भगतगण' आवाक्याबाहेरचा आहे. त्यांच्याजवळ असलेल्या लोकसाहित्याच्या या अमूल्य ठेव्याने माझे डोळे दिपून गेले. गेल्या पंधरा वर्षापासून लोकसाहित्याचा हा अमोल ठेवा मी गोळा करीत आहे पण लोकसाहित्याचे हे भांडार संपले असे म्हणता येत नाही.

० ० ०

या लोकसाहित्याने मला पुष्कळ काही दिले. जीवनातला आनंद, समाधान आणि मनःशांती. आजही कधी उदासवाणे, कंटाळवाणे वाटू लागले की मी लोकसाहित्याचा संग्रह चाळतो. आणि मनाला होणारे क्लेश, हृदयावरची विचारांची धूळ हळूहळू निवळत जाते लोकसाहित्याच्या सहवासात. कधी कधी शहरी जीवनाचा फार उबग येतो. मनावर निराशेची काळिमा पसरते तेव्हा जातो माधवच्या होरकडला, कधी मल्हारीच्या

कहाकरला आणि कधी सावंतच्या वरखेडच्याला. त्याठिकाणच्या लोकजीवनात मना ला शांती मिळते. त्या ठिकाणच्या निसर्गाने आणि निसर्गाशी एकरुप झालेल्या जीवनाने मी सुखावतो. होरकड, वाघनाळी, कहाकर, वरखेडा मराठवाड्यातील ही खेडी जणू लोक-साहित्याची जीवंत ग्रंथ आहेत. आजही या खेड्यातून लोक, लोकसाहित्यातील जीवन जगताना दिसतात. आणि म्हणूनच ग्रामीण जीवनाची आढ मला लागते. या लोक-जीवनाची ओढ असलेले माझे मन शहरी जीवनात रमत नाही. थोडा वेळ मिळाला, सुटी असली की माझी भटकंती सुरू होते. जीवनातला बराचसा आनंद मी या लोकजीवनातून आणि लोकसाहित्यातून मिळविला आहे.

०००

आज लोकसाहित्याच्या अभ्यासास आपल्या देशात आणि महाराष्ट्रात विशेष चालना मिळत आहे ही एक चांगली गोष्ट आहे. पाश्चात्य देशाच्या तुलनेत आपल्या देशात लोकसाहित्याचा आढळ विपुल प्रमाणात आहे पण या लोकसाहित्याच्या अभ्यासाचे शास्त्रीय प्रयत्न पाश्चात्य देशात जितके झाले त्यामानाने आपलेकडील लोकसाहित्याच्या अभ्यासाचे प्रयत्न अपूरे वाटतात. पण भारतात अलिकडे होत असलेले या संदर्भातील संशोधकाचे आणि अभ्यासकांचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत.

लोकसाहित्य जीवनाच्या विविध अंगाना स्पर्श करीत असल्यामूळे लोकसाहित्याची व्याप्ती विशाल आहे. लोकजीवनातील बऱ्याच घटनांचा समावेश लोकसाहित्यात होत असल्याने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विशेष महत्त्व आहे. या शिवाय लोकसाहित्याची अस्मिता वेगळी असून आगळी आहे.

मराठीतील लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य आहे. लोकगीते, लोककथा, उखाणे, म्हणी, लोकश्रम इत्यादी प्रकारची विविधता त्यात आहे. लोकसाहित्यातील कल्पना व भाव सौंदर्य महाकाव्य लिहिणाऱ्या महाकवीच्या कल्पनेइतकी झेप लोक-साहित्यात पाहवयास मिळते. लोकसाहित्यातील विविध भावछटा मोहक असून हृदय-स्पर्शी आहे. लोकसाहित्यातील प्रत्येक ओवी म्हणजे अनमोल मोती होय. लोकजीवनातून आविष्कृत झालेले आणि लोकजीवनात आनंद निर्माण करणारे असे हे अलिखित अक्षर वाङ्मय आपल्या देशाचे एक प्रकारचे मानधन आहे.

प्रस्तुत ग्रंथात लोकसाहित्यातील लोकगीते, लोककथा, उखाणे, म्हणी व वाक्संप्रदाय यांच्या स्वरुप वैशिष्टघा बरोबरच लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व, लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न, या अभ्यासातील विविध संप्रदाय यांचाही थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. विस्तार भयास्तव लोकसाहित्यातील या घटकांचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. लोकसाहित्यातील प्रत्येक घटक हा स्वतंत्र ग्रंथ होण्याइतपत संपन्न आहे याची जाणीव मला आहे. लोकसाहित्यातून आविष्कृत

होणाऱ्या लोकजीवनाच्या विविध बाजुही प्रस्तुत ग्रंथात विचारात घेतल्या आहेत. या लोकजीवनात रूढ असलेल्या काही लोकसमजूती, म्हणी व वाक्संप्रदाय यांचाही समावेश प्रस्तुत ग्रंथात केला आहे. बऱ्याच बाबी या संदर्भात विचारात घेण्याची इच्छा असूनही त्यांचा समावेश प्रस्तुत ग्रंथात करता आला नाही याची टोचणी मनाला आहेच.

० ० ०

मी केलेला लोकसाहित्याचा संग्रह लोकसाहित्याचे अभ्यासक आणि मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. यू. म. पठाण याना दाखविला. लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करण्याचे त्यांनी सुचवून मला वेळोवेळी या संदर्भात त्यानी अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच मी लोकसाहित्याविषयीचा हा ग्रंथ लिहू शकलो. लोकसाहित्याचे अभ्यासक आणि संशोधक डॉ. प्रभाकर मांडे यांच्याशी या संदर्भात वेळोवेळी केलेली चर्चा प्रस्तुत ग्रंथास फारच उपकारक ठरली. माझ्या लोकसाहित्याच्या संग्रहात माझ्या अनेक विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. माधव नाईक, वसंत कावरखे, मल्हारी ढेंगळे, परशराम मांडगे, रुपसिंग राठोड, नत्थु कावरखे, राम नारायण अकमार आणि रामचंद्र सावंत यांचे या संदर्भातील सहकार्य मौलिक स्वरुपाचे आहे.

याशिवाय लोकसाहित्याच्या माझ्या अभ्यासात श्री. अरविंद कुरूंदकर, डॉ. चांदनकर, प्रा. पुरोहित, प्रा. द. ना. म वेकर, प्रा व्यवहारे आणि भ. मा. परसवाळे व प्रा. वसंत वैद्य इत्यादी मित्रांचे मिळालेले सहकार्य उल्लेखनीय आहे. या सर्वांच्या सहकार्यानेच मी हा ग्रंथ लेखनाचा प्रपंच करू शकलो. आणि लोकसाहित्याचा हा अमोल ठेवा ज्या खेडूत बंधू-भगिनींनी मुक्तकंठाने माझ्या स्वाधीन केला त्याचे वर्णन शब्दातीत आहे.

प्रस्तुत ग्रंथात जे काही चांगले आहे ते लोकसाहित्याच्या वारसदाराचे, लोकसाहित्याचे जतन करणाऱ्या ग्रामीण लोकांचे आहे–आणि या ग्रंथातील उणीवा–त्या आहेत माझ्या. प्रस्तुत ग्रंथात पुष्कळच उणीवा राहिल्या आहेत याची जाणीव मला आहे. लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासाच्या क्षेत्रातील माझे हे पहिले पाऊल. रसिक वाचकांनी प्रस्तुत ग्रंथातील उणीवा माझ्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्यांचा मी नम्रपणे स्वीकार करीन आणि त्या उणीवा भरून काढण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीन.

या ग्रंथाचे मोल रसिकानीच ठरवावयाचे आहे.

– शरद व्यवहारे



लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास

प्रस्तावना

अंतरीचा उमाळा

१. लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास १-५

२. लोकसाहित्याचे स्वरूप ६-२१

लोकसाहित्य म्हणजे काय ? /६, लोकसाहित्याचे स्वरूप/७, लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व/९, लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न/११, लोकसाहित्याच्या अभ्यासातील विविध संप्रदाय/१२, लोकसाहित्याचे काही पाश्चात्य अभ्यासक/१४, भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न/१६, मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न/१८, लोकसाहित्य आणि लोकजीवन/१९.

३. लोकसाहित्य आणि सामाजिकशास्त्रे २२-२९

लोकसाहित्य आणि समाजशास्त्र/२२, लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र/२३, लोकसाहित्य आणि इतिहास व पुरातत्वशास्त्र/२४, लोकसाहित्य आणि मानसशास्त्र/२६, लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र२७.

४. लोकगीते ३०-४५

लोकगीतांचे स्वरूप/३०, लोकगीत म्हणजे काय ?/३१, लोकगीतांचे वर्गीकरण/३४, लोकगीतांची मौखिक परंपरा/३७, प्रश्नोत्तररुपी लोकगीते/३७, लोकगीताची रचना/३८, लोकगीतातील ओव्या/३९, लोकगीते आणि बोलीभाषा/३९, लोकगीतांचे विशेष/४०, लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्य/४१.

५. लोककथागीते : स्वरूप विशेष ४६–६०

लोकथागीत म्हणजे काय ?/४६, लोककथागीतांचे स्वरूप/४८, अर्धाचे दिंडार/४९, लोककथागीतांचा विकासक्रम/५१, लोककथा गीतांचे गायक/५२, लोककथागीतांचे वर्गीकरण/५३, कौटुंबिक व सामाजिक लोककथागीते/५४, पौराणिक कथागीते/५५; भगतांची देवताविषयक कथागीते/५५, पोवाडे/५८, ओवी आख्याने/५९; इतर लोककथागीते/५९, लोककथागीतांचे विशेष/६०.

६. लोककथा ६१–७७

लोकजीवनात लोककथांचे स्थान/६१, लोककथांचे स्वरूप/६२, लोककथांची भारतीय परंपरा/६३, लोककथांचे वर्गीकरण/६६, दैवतकथा/६८, अद्‌भूतकथा/६९, दंतकथा/७१, नीतिकथा/७२, वीरकथा/७३, हास्यकथा/७३, व्रतवैकल्याच्या कथा/७४, लोककथांचे मूलघटक/७५.

७. उखाणे ७८–८७

उखाण्याला पर्यायी शब्द/७८, उखाण्याचे स्वरूप/७८, प्रश्नोत्तरी स्वरूपाचे उखाणे/७९, प्रश्नविरहित उखाणे/८१, नाव घेण्याचे उखाणे/८२, व्याही विहिणीचे उखाणे/८३, खेळातील उखाणे/८४, मनोरंजनात्मक उखाणे/८६.

८. म्हणी, वाक्संप्रदाय आणि लोकसमजुती ८८–१०४

म्हणीचे स्वरूप/८९, म्हणींची परंपरा/८९, म्हणींचे वर्गीकरण/९१, वाक्संप्रदाय/९४, वाक्संप्रदायाचे वर्गीकरण/९५,लोकसमजुती/१००, लोकसमजुतीचे वर्गीकरण/१००.

९. लोकसाहित्यातून आविष्कृत झालेले लोकजीवन १०५–१२४

लोकसाहित्य आणि लोकजीवन/१०५, लोकसाहित्यातून आविष्कृत झालेले समाज जीवन/१०६, लोकसाहित्यातून घडणारे लोक संस्कृतीचे दर्शन/१११, लोकसाहित्यातून व्यक्त होणारे स्त्री जीवन/११५, लोकसाहित्यातून घडणारे अलंकार दर्शन/१२१.

लोकसाहित्य विषयक प्रकाशित वाङ्मय १२५–१२७

—०—



१. लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास

भारतीय परंपरा आणि संस्कृती या दृष्टीने लोकसाहित्याचे स्थान उच्च आहे. लोकसाहित्याची प्रवृत्ती आणि प्रकृती उदात्त असून तिला लोकजीवनाचा स्पर्श झाल्यामुळे ती अधिक वैशिष्ट्यपूर्ण वाटते. लोकसाहित्याची तुलना वेद, श्रुती-स्मृतीशी करून लोकसाहित्याचे अलौकिकत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न बऱ्याच लोकसाहित्य विशारदानी केलेला आहे.

वेद इश्वरनिर्मित आहेत असा समज रूढ आहे पण हा समज तितकासा योग्य वाटत नाही. वेदातील ऋचा अलिखित असाव्या आणि पुढे त्या लिपीबद्ध झाल्या असाव्यात असे वाटते. लोकसाहित्याची व्याप्ती पाहू जाता लोकसाहित्य सर्वस्पर्शी असल्याचे जाणवते. लोकसाहित्य व्यापक स्वरूपात आढळते त्यामुळे त्याची व्याप्ती विशाल आहे. अनेक अभ्यासकांच्या मते लोकसाहित्य हा समाज प्रेरक व संस्कृती वर्धक गाथा आहे. लोकसाहित्याचे स्वरूप पाहू जाता लोकसाहित्य हे वेद, श्रुति–स्मृती, गाथा-संहिता, शास्त्र–इतिहास आदींच्या अग्रभागी असलेले 'अक्षरवाङ्मय' असल्याचे आपल्या लक्षात येते. लोकसाहित्यातून उदात्त आणि चिरंतन जीवन आणि सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडते.

अशा या अमूल्य लोकसाहित्याचा उद्‌गम केव्हा झाला ? कोठे झाला ? आणि प्रारंभीचे त्याचे स्वरूप कोणत्या प्रकारे होते ? या प्रश्नांची उत्तरे शोधणे कठीण असले तरी मनोरंजनात्मक आहे. अशा श्रेष्ठतम लोकसाहित्याचे उद्‌गाते, वारसदार कोण असावेत याचा विचार करणे आवश्यक ठरते. लोकसाहित्य हे अपौरुषेय म्हणजे इश्वर निर्मित किंवा डॉ. कमलाबाई देशपांडे म्हणतात त्या प्रमाणे स्त्री निर्मित नसून समाजातील स्त्री-पुरुष निर्मित आहे. लोकसाहित्य लिखित, ग्रंथित किंवा लिपीबद्ध नसून निसर्ग निर्मित, मानवाच्या प्रकृतीशी सम्पर्कित आणि जीवनस्पर्शी असून उत्स्फूर्त झालेले आदि-प्रणित अलिखित आहे.

लोकसाहित्य भारताच्या आदिसंतानाचे अस्सल वाङ्मय भांडार आहे. हे आदि-संतान म्हणजे आदिवासी. भिल्ल, कोरकू, बंजारा, आंध, माडिया, गोंड, नागा, कोलाम,

वारली इत्यादी आदिवासी व जंगलात राहणारे, दऱ्याखोऱ्यातून हिंडणारे वन्य जमाती तसेच महार, मांग, चांभार, वैद्यु, कैकाडी इत्यादी अंतज्य समजले जाणारे आणि मराठा, कुणबी इत्यादी लोक हेच लोकसाहित्याचे खरे वारसदार होत. शहरी विभागातील लोकापेक्षा ग्रामिण भागातील लोकांनी हा वारसा जोपासला. त्यात भर टाकली आणि तो विकसित केला व दुसऱ्या पिढीस देण्यासाठी लोकसाहित्याचा हा अमोल ठेवा जय्यत केला.

लोकसाहित्याचा पहिला ध्वनी स्फुरला तो आदिवासीच्या मुखातून. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. जाती जमातीचे मूळचे दोन स्तर होते ते म्हणजे आदिवासी किंवा वन्य आणि अन्त्यज किंवा अतिशूद्र होय. लोकसाहित्याचा उद्‌गम याच जाती जमातीत झाला. लोकसाहित्य धनाचे तेच खरे वारसदार होत. लोकसाहित्याच्या या जनकानी प्राचीन जीवनाच्या विशेषांचे आणि संस्कृतीचे अबाधित्व राखले. उदात्त प्रतीके जोपासली. या आदिसंतानी शून्यातून नियतीच्या कलानुसार जीवन आविष्कृत करून ते अलंकृतही केले आहे. त्यांनी ध्वनीला शब्दाचा आकार दिला आणि याच शब्दाना विविध भावरंग चढविले त्यानीच. तरल कल्पकता आणि मधुर जुळवणी करून त्यानी लोकसाहित्याची सहजस्फूर्त उभारणी केली. त्याचा गंध सर्वत्र दरवळविला.

आपल्या सांस्कृतिक जीवनाला त्यानी विविध वैशिष्ट्यासह धुमारे आणले. जीवनातील विविध पैलूना नवरसांचे आकंठ पान दिले आणि आपल्या संस्कृतीची अस्मिता विविध वैशिष्ट्यासह प्रगट केली. लोकसाहित्याच्या या वारसदाराबद्दल आणि त्यानी निर्मिलेल्या संवर्धित केलेल्या लोकसाहित्याबद्दल मॅक्झिम गॉर्की आपले विचार पुढीलप्रमाणे व्यक्त करतो.

"लोकसाहित्य हे जनतेच्या सूचनात्मक शक्तीचे सुंदर प्रतीक आहे. हीच जनता सृष्टीची प्रथम दार्शनिक आणि आदि कवीही आहे."

मॅक्झिम गॉर्की याच्या वरील उद्‌गारावरून लोकसाहित्याचे स्वरूप कळतेच कळते पण त्यांच्या जनकाचे महत्त्वही आपल्या लक्षात येते. लोकसाहित्याचे महत्त्व स्पष्ट करताना गॉर्की म्हणतो, "कोणत्याही राष्ट्रातील समाजाचे जीवन तपासून घ्यावयाचे असेल तर त्या राष्ट्रातील लोकवाङ्मय अभ्यासिले पाहिजे."

यावरून लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा जवळचा संबंध आपल्या लक्षात येतो. लोकजीवन लोकसाहित्याच्या उद्‌गमात किती महत्वाची कामगिरी करते याची जाणीव यावरून येते. लोकसाहित्याच्या उद्‌गमाबद्दल विश्वकवी रविंद्रनाथ टागोर म्हणतात, "अत्यंत प्राचीन काळी भारतभूमीच्या आदिसंतानी लोकसाहित्य व लोककला निर्माण करून देशाची उदात्त संस्कृती सिद्ध केली आहे."

लोकसाहित्याचा उगम प्रथमतः अशिक्षितातच झाला हे नाकारता येत नाही. प्राचीन काळातील आदिव्यक्तींनी अशिक्षित व अडाणी अवस्थेत असताही लोकसाहित्य, कला आणि संस्कृती यांचा हृद्य व प्रेरक आविष्कार घडविला आणि त्या मूलाधारावरच पुढे भारतीय साहित्य, कला आणि संस्कृती विकसित होऊ लागली. अशा या उच्चतम व आदर्शमय लोकसाहित्याचा पहिला ध्वनी निनादला तो दऱ्याखोऱ्यातून, कड्या-कपारीतून आणि माळरानावरून. हा ध्वनी सहजस्फूर्त आणि निसर्गनिर्मित होता. पुढे या ध्वनीला अनेक ध्वनी येऊन मिळाले आणि त्यांचे मधुर संगीत झाले. निसर्गाची साथ आणि लोकजीवनाशी व लोकजीवन लोकसाहित्याशी एकरूप होऊन जीवन संगीत स्फूरू लागले.

अशा लोकसाहित्याची महती गावी तितकी थोडीच. लोकसाहित्याच्या रूप, गंधाचा विचार पुढील प्रकरणात सविस्तरपणे करण्यात आलेला आहेच. तरीपण येथे लोकसाहित्याच्या रूप, गंधाचा थोडक्यात परामर्श घेणे उचित ठरेल असे वाटते.

लोकसाहित्याचे रूप मनोहारी असून ते जीवनाच्या विविध अंगाना स्पर्श करते हे आपण पाहिलेच आहे. परंपरागत व्यवहार, आचारविचार, संस्कृती, अनुभव यांचा गीत, कथा, संगीत इत्यादी प्रकारातून व्यक्त झाले ते सारे लोकसाहित्यात सामावते.

लोकसाहित्य हे लोकांचे पर्यायाने त्या देशाचे मानधन आहे, अमूल्य खजिना आहे. लोकसाहित्यात लोकजीवनाची, संस्कृतीची विविध चित्रे रेखाटलेली दिसतात. लोक-जीवनाचे व लोकसंस्कृतीचे हे विशेष खेडूत बंधू-भगिनीने जीवापाड जतन करून पुढच्या पिढीला देण्याचे अव्याहत कार्य केले आहे. लोकसाहित्यात लोकांचा आत्मा सामावलेला असल्यामुळे लोकसाहित्य जीवंत ठरले. लोकसाहित्य म्हणजे स्वयंस्फूर्त अमरवाणी. लोकहृदयाचे ते उत्स्फूर्त बोल आहेत. ग्रामीणांच्या निरागस हृदय सागरातून उगम पावलेली व त्यांच्याच मुखातून तरंगत पावून अखंडपणे खळखळ वाहत जाणारी, वाहत जात असताना इतराना सुखावणारी ही लोकगंगा आहे. या लोकगंगेत अनेक प्रवाह मिसळले. लोकजीवनातील सुखदुःखाचे, आचार-विचारांचे, रीति-रिवाजांचे, संस्कृती वैशिष्ट्याचे असे अनेक प्रवाह या लोकगंगेत मिसळल्याने ही लोकगंगा विकसित झाली. तिचे पात्र वाढतच गेले आणि या लोकगंगेच्या वाढत्या पात्रासोबतच तिच्या दोन्ही तीरावरील लोकजीवन तिच्याप्रमाणेच विकसित होत गेले. भावभावनांची अनेक रत्ने तिच्या पोटी दडलेली आहेत.

लोकजीवनातील अनुभव हीच लोकसाहित्याची संपदा. निसर्ग हाच लोक-साहित्याचा वैभव कळस, त्यात जिव्हाळा आहे, प्रेम आहे, ऋजुता, उत्कटता, निष्ठा आणि उदात्त भाव यांची संपन्नता लोकसाहित्यात आढळते. अशा या लोकसाहित्याची भाषा लोकांचीच आहे. जीवंत भाषा आहे.

० ० ०

लोकसाहित्याचा उद्‌गम आदिवासी आणि वन्य जमाती या लोकसमूहात झाला हे आपण पाहिले. पुढे याच लोकसाहित्याला अनेक धुमारे फुटून आज त्याचा मोठा वृक्ष झालेला आहे. अनेक फांद्या या वृक्षाला फुटल्या, फुलाफळांनी लोकसाहित्याचा हा वृक्ष बहरून त्याचा सुगंध सर्वत्र दरवळतो आहे.

आदिसंतानानी उच्चारलेला पहिला ध्वनी म्हणजे लोकसाहित्याचा हुंकार. पुढे हा ध्वनी शब्द बनला आणि या शब्दांना रूप, गंध प्राप्त झाले त्यातून लोकजीवन आणि लोकसंस्कृती आविष्कृत होऊ लागली. लोकजीवनातून लोकसाहित्य विकसित होऊ लागले. त्यातील सौंदर्यसृष्टीत विविध रंगछटा भरू लागल्या तसतसे लोकसाहित्य नयनमनोहारी व हृदयस्पर्शी बनू लागले.

लोकसाहित्याच्या विकासक्रमांचा आढावा घेताना आपल्या लक्षात येते की सध्या लोकसाहित्यातील विविध अंगाचे स्वरूप आज जसे दिसते तसे प्राचीन काळी नसले तरी लोकसाहित्याची ही विविध अंगे थोड्या फार फरकाने लोकजीवनात अस्तित्वात होतीच. शिवाय लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा घनिष्ट संबंध असल्याने किंबहुना लोकजीवनातूनच लोकसाहित्य साकार होत असल्याने लोकसाहित्यात परिवर्तन अपरिहार्य ठरते.

आदिसंतानानी लावलेले लोकसाहित्याचे रोपटे. या रोपट्याला अनेक धुमारे पुढे फुटले. लोकगीते, लोककथागीते, लोककथा ही महत्त्वाची अंगे विकसित होऊन लोकसाहित्याचा वृक्ष डौलदार झाला. उखाणे, म्हणी, वाक्‌संप्रदाय आणि लोकसमजुती, लोकप्रथा, लोकभ्रम, काही धार्मिक व सामाजिक विधी इत्यादी प्रकारचे धुमारेही या वृक्षाना फुटून लोकसाहित्याचा विकास झाला. लोकसंगीत, लोककला, लोकनृत्य इत्यादी प्रकार लोकजीवनातून लोकसाहित्यात समाविष्ठ झाल्याने लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य झाले. आणि आज लोकसाहित्याच्या व्याप्तीचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की लोकसाहित्य हे लोकजीवनाच्या विविध अंगाना स्पर्श करते झाले आहे. त्याची व्याप्ती अत्यंत विशाल बनली आहे.

लोकसाहित्याचा हा विकासक्रम पाहू जाता लोकसाहित्यातील प्रत्येक प्रकार संपन्न व समृद्ध असल्याचे कळते. लोकगीते हे लोकसाहित्याचे प्रमुख अंग होय. लोकसाहित्य म्हणजे लोकगीतेच असा एक समज पूर्वी रूढ होता तो लोकगीतांच्या विपुलतेमुळे. लोकगीतांची विविधता, त्यातील विविध रंगी भावछटा व त्यांचे विशेष यांचा अभ्यास स्वतंत्रपणे पुढील प्रकरणात केला असल्यामुळे हा थोडासा उल्लेख. याच लोकगीताना लोकनृत्याची व लोकसंगीताची साथ मिळून लोकजीवनात मान्यता मिळाली. लोकगीते लोकजीवनात, लोकमानसात खोलवर रुजली. लोकजीवनात ही लोकगीते मधुर संगीत निर्माण करू लागली तसतसे लोकगीते वाढू लागली. लोकगीते वाढू लागली याचा अर्थ लोकगीतांचे स्वरूप संपन्न होऊ लागले. त्यात विविधता येऊ लागली.

जी गोष्ट लोकगीतांची तीच लोककथांची. कहाण्यांची भारतीय परंपरा फार प्राचीन आहे. लोकजीवनात लोककथाना महत्त्वाचे स्थान असल्यामुळे लोककथा लोकजीवनात आणि लोकजीवन लोककथात रममाण होऊ लागले. परस्परांच्या सहकार्याने लोककथांचे दालन संपन्न बनले. लोककथांच्या आश्रयाने म्हणी, वाक्‌संप्रदाय आणि उखाणे विकसित झाली. लोकजीवनात रूढ झाली. लोककलाही या विकासक्रमात मागे राहिल्या नाहीत. लोकजीवनात लोककलाना महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊन त्यातून लोकजीवनाचा आविष्कार होऊ लागला. लोकजीवनातील प्रत्येक हुंकार, उच्चार, न्यास हा लोकसाहित्यात समाविष्ठ होऊन लोकजीवनात आनंद निर्माण करू लागला आणि अशा रीतीने लोकसाहित्याचा वृक्ष फोफावत गेला, वाढत गेला, डौलदार बनला.

लोकसाहित्याच्या उद्‌गम आणि विकासाविषयी लोकसाहित्याचे प्रसिद्ध अभ्यासक श्री. ना. रा. शेंडे यानी आपल्या 'लोकसाहित्य संपदा' या ग्रंथात पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले ते येथे सांगणे उचित होईल असे वाटते.

"आदिसंतानी शून्यातून नियतीच्या कलानुसार जीवन आविष्कृत केले, नव्हे ते अलंकृतही केले आहे. त्यानी ध्वनी निर्माण केला आणि त्याला शब्दाकार दिला. शब्दात त्यानी विविध भावरंग भरले. तरल कल्पकतेने शब्दाशब्दांची मधुर व प्रभावी जुळणी केली आणि नवरसांनी त्यानी लोकवाङ्‌मयाची सहजस्फूर्त उभारणी करून, रंगरुपासह त्याचा अत्यंत मधुर गंध सर्वत्र दरवळविला. ध्वनी, शब्द, रंग, रूप आणि गंध यांचा लोकसाहित्यात आविष्कार घडवूनच नव्हे तर नाट्य, नृत्य व संगीत इत्यादी कलांची निर्मिती करून, आदिसंतानी सांस्कृतिक जीवन तेजोवर्धित केले आहे. विविध प्रतीमा व प्रतीके दर्शवून, त्यानी जीवनातील विविध पैलूंची रसोत्कट अभिव्यक्ती घडविली आणि आपल्या संस्कृतीची अस्मिता प्रगट केली."

श्री. ना. रा. शेंडे यानी लोकसाहित्याच्या उद्‌गम, रूप आणि विकास या विषयी मांडलेले वरील विचार लोकसाहित्याच्या उद्‌गम, स्वरूप आणि विकासावर प्रकाश टाकणारे असेच आहेत.

असे हे लोकसाहित्य अलिखित अक्षरवाङ्‌मय असून त्याची अस्मिता वेगळी आणि आगळी आहे. लोकसाहित्य ही उच्चतम श्रुती आहे. उदात्त संहिता आहे. भारतीय जीवन आणि संस्कृतीचा प्रेरक इतिहास आहे. प्रभावी लोकगाथा आहे असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे ठरू नये.

० ० ०

२. लोकसाहित्याचे स्वरूप

- लोकसाहित्य म्हणजे काय ?
- लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व
- लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न
- लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध संप्रदाय
- लोकसाहित्याचे काही पाश्चात्य अभ्यासक
- भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न
- मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न
- लोकसाहित्य आणि लोकजीवन

लोकसाहित्य म्हणजे काय ?

'Folklore' या इंग्रजी शब्दासाठी मराठीत लोकसाहित्य हा शब्द वापरला जातो. लोकसाहित्याच्या संदर्भातच 'लोकगीत', 'लोककथा' या शब्दांचाही वापर केला जात असे. पण या शब्दांना अर्थाच्या मर्यादा पडत असल्याने व त्यातून व्यापक अर्थ निघत नसल्याने लोकसाहित्याच्या विशिष्ट प्रकारासच ही संज्ञा पुढे रूढ झाली. म. मो. दत्तो वामन पोतदार Folklore चे 'लोकविद्या' असे भाषांतर करतात. पण 'लोकविद्या' हा ही शब्द तितकासा रूढ झाला नाही. 'लोकसाहित्याची रूपरेखा' या आपल्या ग्रंथात दुर्गा भागवत यानी 'लोकसाहित्य' हा पारिभाषिक शब्द वापरून त्यातील अर्थाचे व्यापकत्व सुचविले आणि हाच शब्द सध्या रूढ झाला आहे. 'लोकसाहित्य' या सामासिक शब्दातील 'लोक' या शब्दालाही विशेष अर्थ आहे आणि 'साहित्य' या शब्दाची व्याप्ती अधिक असल्यामुळे दुर्गा भागवत यानी वापरलेला लोकसाहित्य शब्द यथार्थ वाटतो.

'लोकसाहित्य' या शब्दासाठी 'लोकवाङ्मय' हाही एक शब्द वापरल्या जातो पण या संज्ञेने विषयाची व्याप्ती मर्यादित होते असे दुर्गा भागवत यांचे मत आहे. लोक-साहित्यातील विषयाची, अभिव्यक्तीची आणि आशयांची विविधता पाहू जाता 'लोकवाङ्मय' या शब्दाला मर्यादा पडतात हे स्पष्ट होते.

हिंदी भाषेत Folklore साठी 'लोकवार्ता' हा पारिभाषिक शब्द रूढ आहे. तर पं. राम नरेश त्रिपाठी Folk साठी ग्राम शब्द स्वीकारतात. पण 'ग्राम' 'आणि 'लोक'

या शब्दांचा लोकसाहित्याच्या दृष्टीने अर्थ पाहू जाता 'ग्राम' हा शब्द संकुचित वाटतो. हिंदी भाषेत Folklore साठी 'लोकयान', 'लोकायन', लोकसंस्कृती' आणि 'लोकवार्ता' इत्यादी शब्द जरी वापरात येत असले तरी 'लोकसाहित्य' हा शब्द अर्थाच्या दृष्टीने अधिक योग्य आहे आणि सध्या हाच शब्द अधिक प्रमाणात वापरल्या जात आहे. प्रस्तुत ग्रंथात लोकसाहित्य हाच शब्द निवडण्यात आला आहे.

लोकसाहित्याचे स्वरूप

लोकसाहित्याचे स्वरूप विशाल असून ते मनोहारी, हृदयंगम असे आहे. विशाल दृष्टी स्वीकारूनच लोकसाहित्याचा विचार करणे आवश्यक आहे.

लोकांचे साहित्य ते लोकसाहित्य असा शब्दशः अर्थ 'लोकसाहित्य' या शब्दाचा असला तरी या अर्थामागे विशाल व व्यापक अर्थ लपलेला आपणास पाहवयास मिळतो. 'लोकसाहित्या'तील लोकांना विशेष महत्त्व आहे. या लोकांमुळेच लोकसाहित्य या शब्दाला विशेष अर्थ व स्वरूप प्राप्त झाले हे आपल्याला विसरता येत नाही. तेव्हा लोकसाहित्यातील हे 'लोक' कोणते ? या प्रश्नाचा या संदर्भात विचार करणे आवश्यक ठरते. सर्वसामान्य जन असा 'लोक' या शब्दाचा अर्थ स्वीकारल्यास तो संकुचित अर्थ होईल असे वाटते. तेव्हा लोकसाहित्यातील 'लोक' या संज्ञेचा व्यापक अर्थ लक्षात घेणे या संदर्भात उचित ठरेल. लोकसाहित्यातील हे लोक जनसामान्यातील लोक असले तरी ते जनसामान्यापेक्षा निराळे आहेत, आगळे आहेत. हे लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा एक वर्गच आहे. वेगळे जीवन जगणारा व या जीवनाचा सर्वसामान्य लोकावर ठसा उमटविणारा हा वर्ग आहे. ज्या संस्कृतीचे दर्शन आपल्याला या वर्गातून घडते ती संस्कृती स्वाभाविकपणे जगत असते, विकसित होत असते आणि बदलत्या जीवनाचे संस्कार घेऊन वाटचाल करीत असते. तसेच मानवी जीवनाचे त्या जीवनाच्या विशेषांचे जुने अवशेष या संस्कृतीत आपणास पाहावयास मिळतात. आद्य संस्कृतीचे हे अवशेष या समाजातील काही माणसांच्या जीवनविषयक सवयीतून, रूढीतून, परंपरेतून, आचार-विचारातून अविष्कृत होत असतात. आणि याच संस्कृतीचे, लोक-जीवनाचे दर्शन आपणास लोकसाहित्यातून घडत असते म्हणूनच 'लोकसाहित्य' या सामासिक शब्दातील 'लोक' या शब्दास अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना या लोकाशिवाय लोकसाहित्याला अर्थच राहत नाही. तेव्हा अशा वैशिष्ट्यासह बनलेला समाज म्हणजे 'लोक' होय.

लोकसाहित्यासाठी लोकवाङ्मय हाही एक शब्द वापरल्या जातो पण लोकवाङ्मय या शब्दाचा अर्थ लोकसाहित्याचे व्यापक दर्शन घडविण्यास असमर्थ ठरतो असे मला वाटते. विशिष्ट मर्यादेपलिकडे या शब्दातून आपणास पाहता येत नाही. लोकवाङ्मयाला काही मर्यादा पडतात. अर्थात या मर्यादा वाङ्मय या शब्दाच्याच आहेत. लोकसाहित्यात आपणास लोकसाहित्याचे विशाल स्वरूप दिसते तर लोकवाङ्मयात वाङ्मय या सदरात

मोडणारे साहित्यच पाहवे लागते. लोकवाङ्‌मयाची वैशिष्ट्ये सांगताना लोकसाहित्याचे एक अभ्यासक डॉ. नांदापूरकर म्हणतात, "लोकवाङ्‌मय म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकानी निर्माण केलेले आणि मौखिक व परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्‌मय तेच लोकवाङ्‌मय होय. याचा कर्ता लोकच–अर्थात लोकसमाजातील अज्ञात अशी व्यक्ती. यास्तव लोकांनी तयार केलेले, लोकभाषेतील, लोकांच्या परंपरेबरोबरच चालत आलेले जे वाङ्‌मय तेच लोकवाङ्‌मय होय."[१] लोकवाङ्‌मयाचे असे स्वरूप डॉ. नांदापूरकर सांगून पुढे म्हणतात, "लोकवाङ्‌मयाच्या या प्रकारात लोककथा, कहाण्या, आहाणे, उखाणे आणि लोकगीते येतात,"[२] याचाच अर्थ लोकसाहित्यात आपणास लोकजीवनाचे, संस्कृतीचे आणि जीवन जगण्याच्या विविध पद्धतींचे दर्शन घडते. डॉ. नांदापूरकर यानी 'वाङ्‌मय' हा शब्द 'साहित्य' या अर्थानेच योजिला असावा असे वाटते.

लोकसाहित्याचे हे स्वरूप पाहू जाता लोकसाहित्याची जडण घडण त्या पाठीमागे असलेल्या परंपरा, त्यातून अविष्कृत होणारे लोकजीवन आणि लोकसाहित्याची विविध अंगे याची आपणास ओळख होते.

लोकसाहित्याच्या स्वरूपाचा विचार करताना लोकगीतांचाही अभ्यास करणे आवश्यक ठरते. लोकगीत हे लोकसाहित्याचे प्रमुख अंग. लोकगीतांच्या स्वरूपातच लोकसाहित्य विशेषत: अस्तित्वात आहे. अशा लोकगीतांची व्याख्या देताना डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात, "विविध प्रकारांच्या जातीवंत स्वरविलासानी शिणगारलेले व अशिक्षितानी कित्येक वर्षामागे रचिले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान्-पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत होय. हे लोकगीत म्हणजे सामान्य माणसांच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय."[३]

तर लोकसाहित्याचा पाश्चात्य अभ्यासक क्रॉप लोकगीताची व्याख्या पुढील प्रमाणे सांगतो–

"लोकगीत हे गाणे म्हणजे भावगीत (lyric) किंवा ललितकृति असून त्याला चाल असते. लोकगीतांचा उगम निरक्षरात झालेला असून त्याचा कर्ता अनामिक असतो. लोकगीत ही भूतकालातील कृती असून पुष्कळदा कित्येक शतकांची परंपरा तिच्यामागे असते."[४]

लोकसाहित्याच्या अभ्यासकांचे वरील विचार पाहू जाता व लोकसाहित्याच्या स्वरूपाचा विचार करताना मला असे वाटते की, लोकजीवनाचा, लोकभाषेतून झालेला जीवनाविष्कार म्हणजेच लोकसाहित्य. अर्थात येथे लोक म्हणजे विशिष्ट परंपरा असलेले व विशिष्ट संस्कृतीचे दर्शन घडविणारे लोक असाच अर्थ अभिप्रेत आहे. अर्थात लोक-साहित्याची निर्मिती अशिक्षिताच झालेली असते हे मान्य करून ज्या जीवनात, ज्या

समाजजीवनातून ते अविष्कृत होत असते, विकसित होत असते त्या जीवनाच्या परंपरा, रुढी, प्रथा आणि संस्कृती यांचा स्पर्श या साहित्याला झालेला असतो हे नाकारता येत नाही. आणि म्हणूनच पाश्चात्य लोकसाहित्य विशारदानी लोकसाहित्य हे परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा अविष्कार आहे या जाणीवेने समाजशास्त्रीय दृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यास केला आहे.

तेव्हा लोकसाहित्य या शब्दाचा अर्थ व्यापक आहे. लोकसाहित्याचे स्वरूप विशाल आहे. या साहित्याला विविध पैलू आहे. ते जीवनस्पर्शी व जीवनाविष्कार घडविणारे लोकजीवनातील एक अंग आहे. लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या रुढी, लोक समजुती, आचारविचार, धार्मिकविधी, लोकभ्रम इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो. म्हणजेच लोकसाहित्य हे परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा सहज अविष्कार होय. थोडक्यात लोकसाहित्याचे स्वरूप इतके विशाल आहे की त्याचे दर्शन घराघरातून, कुटुंबा-कुटुंबातून आणि या भूतलावरील प्रत्येक भाषेतून घडत असते.

१. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाची जाणीव खरे पाहता बऱ्याच शतकापूर्वी झाली असली तरी त्याच्या प्रत्यक्ष अभ्यासास सुरूवात मात्र फार उशीरा झाली. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व युरोपातील काही अभ्यासकांना पटले व त्यांनी त्या दृष्टीने पाऊलही उचलले. सतराव्या शतकापासून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विशेष महत्त्व जाणवू लागले. अठराव्या शतकात तर युरोपात या अभ्यासाची एक लाटच उसळली. कारण लोकसाहित्याच्या अभ्यासाने लोकजीवनाचे विविध पैलू प्रकाशात येऊ लागले.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे कारण लोकसाहित्यातून लोकजीवनाचा आविष्कार झालेला पाहावयास मिळतो. याशिवाय प्राचीन लोकजीवनाचे अवशेष लोकसाहित्यात जितके प्रकर्षाने सापडतात तितके इतरत्र सापडणे कठीणच आहे. अशा लोकजीवनाचे कुतूहल अभ्यासकांच्या मनात निर्माण होणे साहाजिकच आहे. याही दृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाला महत्त्व येऊ लागले. शिवाय लोकसाहित्याचे क्षेत्र इतके विशाल आहे की, समाजशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र आदी शास्त्राना त्याचा स्पर्श होतोच. या शास्त्रांच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही लोकसाहित्याचा अभ्यास पूरकच ठरतो.

लोकसाहित्याच्या संग्रहाने, अभ्यासाने कोणत्याही देशास, समाजास, साहित्यास फायदाच होत असतो. कारण लोकसाहित्यातून देशाच्या प्राचीन संस्कृतीचे, आचार-विचाराचे रीतिरिवाजांचे ज्ञान मिळते.

लोकसाहित्याचे महत्त्व सांगताना श्री रामनरेश त्रिपाठी म्हणतात.[५]

"देश का सच्चा इतिहास और उसका नैतिक और सामाजिक आदर्श इन लोकसाहित्योंसे ऐसा सुरक्षित है कि इनका नाश हमारे लिए दुर्भाग्य की बात होगी."

या त्यांच्या उद्गारावरून लोकसाहित्याचे व त्याच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट होते. लोकसाहित्यातून आपल्याला केवळ सामाजिक, धार्मिक आणि पारिवारिक बाबीचा इतिहासच कळतो असे नव्हे तर त्यांच्या विकासाचेही ज्ञान आपणास मिळते.

गतकालातील लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकजीवनातील आचारविचारपद्धती, प्रथा, उत्सव यांचे प्रतिबिंब आपल्याला लोकसाहित्यातच पडल्याचे आढळते. एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत लोकसाहित्याची देवाणघेवाण होत असताना त्यातील नव्या बदलाची जाणीव ठेवूनही असे म्हणता येईल की मानवाच्या आद्य संस्कृतीचे अवशेष आपल्याला लोकसाहित्यातच आढळतात. या दृष्टीनेही लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विशेष महत्त्व आहे.

प्राचीन लोकजीवनाचा समाजशास्त्रीयदृष्टया अभ्यास करतानाही लोकसाहित्याचे अध्ययन अत्यंत उपकारक ठरते. लोकसाहित्यातून व्यक्त होणारे समाजजीवन, लोकजीवनातील चालीरीती, समाजाची व्यवस्थापना, रचना आणि कौटुंबिक जीवन या घटना समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आजच्या समाजजीवनाचे स्वरूप गतकालीन जीवनाशी पडताळून पाहताना आजच्या समाजरचनेचे मूळ कदाचित हाती लागून काही तथ्ये उपलब्ध होण्याचीही शक्यता असते. समाजशास्त्रातील काही रहस्ये उलगडण्यास लोकसाहित्याचा अभ्यास निश्चितच साह्यभूत ठरतो.

लोकसाहित्याच्या अभ्यासाने आपल्याला इतिहासाची ओळख करून घेता येते. अर्थात हा इतिहास लोकजीवनापुरता मर्यादित असला तरी त्याला लोकजीवनाच्या इतिहासात महत्त्व आहे. लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार तेव्हा लोकजीवनावर गतकालीन घटनांचा कोणत्या अवस्थेप्रत आणि कितपत परिणाम झाला हे आपणास लोकसाहित्याच्या अभ्यासाने कळू शकते.

भाषाशास्त्राच्या दृष्टीनेही लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घ्यावयास हवे. भाषा नेहमी बदलत असते हे मान्य करूनही असे म्हणता येईल की, भाषेच्या या प्रवाहासोबत भाषेत होणारे बदल, भाषेवर होणारा सामाजिक वातावरणाचा परिणाम, हा परिणाम कोणत्या अवस्थेत व कोणत्या स्थितीत कसा झाला इत्यादी अनेक गोष्टींचे ज्ञानही आपणास लोकसाहित्याच्या अभ्यासाने होते. लोकजीवनाचा आविष्कार करणारी लोकभाषा आपल्यात होणाऱ्या स्थित्यंतरासह लोकसाहित्यातून प्रकट होत असते. त्या भाषेत असे काही चिवट शब्द असतात की संक्रमण अवस्थेतही ते आपले अस्तित्व टिकवून धरतात. याशिवाय लोकसाहित्यातील भाषेच्या शब्दाशब्दाला लोकजीवनाचे सुवर्णकण चिकटलेले असतात. तेव्हा भाषाशास्त्रीयदृष्टया देखील लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व मान्य करणे क्रमप्राप्तच ठरते.

वाङ्मयीनदृष्ट्याही लोकसाहित्याच्या अभ्यासाला महत्त्व आहेच. लोकप्रतिभेतून साकार झालेले लोकसाहित्य वाङ्मयीन मूल्यानेही सजलेले असते. त्यातील लालित्य, कल्पनाविलास, प्रतिमासृष्टी, त्यातून झालेला रसाविष्कार आणि भावनाविष्कार यांना वाङ्मयीनदृष्ट्या अत्यंत मोल आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाने वाङ्मयातील काही मूल्ये प्रकाशात येऊ शकतात. आजच्या वाङ्मयीन कृतींचा आणि लोकसाहित्यातील लोकगीते, कथा इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास करून वाङमयीन ज्ञानात भरच पडू शकते.

या शिवाय लोकसाहित्याचा संग्रह करण्यात व त्याच्या अभ्यासास विशेष महत्त्व आहे कारण या अभ्यासाने कंठस्थ साहित्य लिपिबद्ध करता येते. लोकसाहित्य मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचत असते. आणि असे होत असताना त्यात बदल होत असतो. असा बदल होणे अपरिहार्य ठरते. आणि एखादे वेळी हे मौखिक स्वरूपातील लोकसाहित्य त्या व्यक्तीच्या मृत्यूने उपलब्ध होऊ शकत नाही. तेव्हा लोकसाहित्याच्या अभ्यासाने लोकसाहित्याचे शास्त्रशुद्ध संकलन करता येऊन हा अमोल ठेवा जतन करून ठेवता येतो.

सारांश लोकसाहित्याचे अध्ययन विविध ज्ञानशाखांच्या अध्ययन-संशोधनास अत्यंत उपकारक ठरते. या दृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

२. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याची जाणीव युरोपातील काही अभ्यासकाना झाली आणि तेव्हापासून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे प्रयत्न होऊ लागले. सतराव्या शतकातील हे प्रयत्न प्रारंभीचे असल्यामुळे म्हणा, तितकेसे भरीव स्वरूपाचे नव्हते. पण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र लोकसाहित्याच्या अभ्यासाचे जोरदार प्रयत्न सुरू झाले. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, स्वीडन व रशिया इत्यादी देशात लोकसाहित्याच्या अभ्यासाची एकच लाट उसळली. आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाचे भरीव प्रयत्न होऊ लागले.

लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या प्रयत्नांचा मागोवा घेत असता आपल्या लक्षात येते की टचूटॅनिक संस्कृतीच्या अभ्यासाची सुरूवात झाली. पुढे नार्वेच्या स्नारी स्टर्लसनने लोकसाहित्याचे संकलन व लोकसाहित्याचा अभ्यास करून या अध्ययन क्षेत्रात लक्षात घेण्याजोगे कार्य केले आहे. आणि या प्रयत्नांचा मागोवा घेत असताना आपल्या लक्षात येते की दहाव्या शतकाचा उत्तरार्ध ते बाराव्या शतकाचा उत्तरार्ध या दोनशे वर्षाच्या कालावधीत लोकसाहित्यात मोलाची भर पडली. या कालावधीत लोकसाहित्याच्या अभ्यासापेक्षा लोकसाहित्याच्या संकलनाचेच प्रयत्न अधिक झाल्याचे

दिसून येते. अकराव्या शतकातील सेंमूड, डॅनिश इतिहास तज्ज्ञ सॅक्सो यांनी अत्यंत परिश्रमाने लोकसाहित्यास भूषण ठरतील अशा दंतकथा, लोककथा, अद्‌भूतकथा इत्यादी साहित्य आपल्या ग्रंथात नोंदवून लोकसाहित्याच्या अध्ययनाचा पाया रचला असे म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या या प्रयत्नानी लोकसाहित्याच्या अभ्यासाची उत्सुकता वाढू लागली.

एकोणविसाव्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यासाची वाटचाल शास्त्रीयदृष्टीने होऊ लागली. व्हिक्टर रिडबर्ग या स्वीडिश कवीने सॅक्सोच्या आणि स्नारीच्या कृतींचा अभ्यास करून त्यातील कथाविशेष स्पष्ट केले. यानंतर लोकसाहित्याच्या अभ्यासात वेगवेगळे सिद्धान्त उदयास येऊ लागले. या निरनिराळ्या सिद्धान्ताच्या आधारे लोकसाहित्याची चिकित्सा होऊ लागली व लोकसाहित्याच्या अभ्यासास शास्त्रीय दृष्टी लाभू लागली.

जॉन ऑब्रे या लोकसाहित्य विशारदकाने आपल्या 'Miscellenies' या ग्रंथात पुराण परंपरांचे संकलन करून या परंपरा लोकसाहित्यात किती मोलाच्या आहेत हे दाखवून दिले. सर थॉमस ब्राऊन याच्या 'Pseudodorcia Epidemica' या ग्रंथात शकुन, स्वप्ने यांची माहिती व लोकसाहित्यातील त्यांचे स्थान कळते. याच लेखकाच्या 'Remains of Gentilisme and Judisme' या ग्रंथात प्राचीन समजुती, परंपरा, विधी इत्यादीबद्दल माहिती मिळते.

लोकसाहित्यात प्राचीन परंपरा, शकुन, प्रथा, विधी यांचा झालेला हा समावेश फार महत्त्वाचा आहे. लोकसाहित्याच्या या अभ्यासाने लोकसाहित्याचे हे क्षेत्र विशाल होऊ लागले. दंतकथा म्हणजेच लोकसाहित्य ही कल्पना मागे पडून लोकसाहित्यातील विविधता प्रकाशात येऊ लागली.

३. लोकसाहित्याच्या अभ्यासातील निरनिराळे संप्रदाय

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे क्षितिजही विस्तार पावत होते. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स इत्यादी देशात लोकसाहित्याच्या अभ्यासात वेगवेगळे संप्रदाय पुढे येऊ पाहत होते. हे संप्रदाय लोकसाहित्याच्या अभ्यासास पूरकच होते. यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासास वेगळे वळण लागू पाहत होते. लोकसाहित्याच्या अभ्यासातील निरनिराळ्या विचारप्रवाहानी विविध दृष्टीकोनातून लोकसाहित्याचा अभ्यास होऊ लागला. लोकसाहित्यातील विविध घटकावर चर्चा होऊन हे घटक उजेडात येऊ लागले.

लोकसाहित्याच्या अभ्यासास वेगळे वळण लावण्याच्या कामी ज्या संप्रदायांचा आणि विचारप्रणालींचा उपयोग होऊ लागला त्यांचाही आपण थोडक्यात विचार करू या.

भाषाशास्त्रीय सिद्धान्त (Philological School)

ग्रिमबंधू, ब्रेल, कूहन, मॅक्समूलर, डासेंट, कॉक्स् हे लोकसाहित्य विशारद या भाषाशास्त्रीय सिद्धान्ताचे पुरस्कर्ते होते. लोकसाहित्याच्या या अभ्यासकानी लोकसाहित्य शास्त्राच्या साधनसामुग्रीची जुळवाजुळव करून त्यांच्या आधारे लोकसाहित्याचे केलेले वर्गीकरण लोकसाहित्याच्या अभ्यासात महत्त्वाचे ठरते.

भाषाशास्त्रीय संप्रदायाचा काळ स्थूलमानाने सन् १८१३ ते १८७१ असा समजावयास हरकत नाही. या संप्रदायाच्या उदयापूर्वी लोकसाहित्याचा अभ्यास करताना इतिहास व वाङ्मय या दोन विषयावरच भर दिला जात असे. पण या संप्रदायाने शुद्ध भाषाशास्त्रीय व वाङ्मयीनदृष्टीनी लोकसाहित्याचा अभ्यास करून लोकसाहित्याच्या अभ्यासास वेगळे वळण लावले. दैवतकथासंबंधीचा मॅक्समूलरचा सिद्धान्त[६] असा होता की, दैवतकथा या अशुद्ध व विकृत व्युत्पत्तीतून जन्मलेल्या असून त्याना भाषेला आलेली सूज किंवा भाषेला जडलेला रोग म्हणता येईल.

या संप्रदायाच्या अभ्यासकांचा एक लक्षणीय प्रयत्न म्हणजे त्यांनी भाषाशास्त्राच्या आधारे तौलनिक दैवतकथा शास्त्रापर्यंत आपल्या अभ्यासाची मजल मारली. या अभ्यासकानी खेडोपाडी हिंडून भाषावारी साहित्य व्यवस्थित नोंदवून त्यांचे वर्गीकरण केले. दैवतकथांचा अभ्यास करताना या सिद्धान्ताचे पुरस्कर्ते म्हणतात की, 'दैवतकथा ही प्रारंभी भाषाशास्त्राचीच शाखा होती.'

सारांश, भाषाशास्त्रीय सिद्धान्ताने लोकसाहित्याच्या अभ्यासास भाषाशास्त्राच्या कसोट्या लावून लोकसाहित्याचा भाषाशास्त्रीयदृष्ट्या चिकित्सक अभ्यास होऊ लागला. तर निसर्ग रुपकवादी संप्रदायांच्या (The Nature Symbolists) मतान्वये दैवतकथेतील निसर्गदृश्य विशिष्ट कार्य व्यक्त करीत असतात. दैवतकथेतील निसर्ग हा कोणत्याही गोष्टीचे प्रतीक असते. या त्यांच्या विचारप्रवाहामुळे लोकसाहित्यातील दैवतकथांचे विशेष प्रकाशात येऊ लागले. त्यातील निसर्गदृश्याना विशेष अर्थ प्राप्त होऊ लागला.

वरील दोन संप्रदायासोबतच **भ्रांतकल्पनावादी संप्रदाय** (Euhmerist School) व **स्पष्टीकरणवादी संप्रदाय** (Acteological School) या संप्रदायांच्या विचारसरणीचांही उपयोग लोकसाहित्याचा अभ्यास करताना होऊ लागला. लोकसाहित्यातील अनेक घटकाना आणि घटनाना अर्थ प्राप्त होऊ लागला.

सजीवावशेषत्ववादी संप्रदायाच्या (Survival Theory) विचारसरणीप्रमाणे मूळच्या कथा रानटी लोकात आढळतात. यांचेच अवशेष सुसंस्कृत लोकांच्या कथात आढळून येतात. तर **विभाजनवादी संप्रदयान्वये** (Distributionist School)

दूरदूरच्या कथेतील साम्यांना अर्थ प्राप्त होऊ लागला. याच काळात या शिवाय इतरही काही विचारप्रणाली उदयास येऊ लागल्या होत्या. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

१. संप्रसारणवादी विचारप्रणाली.
२. ऐतिहासिक भौगोलिक पद्धती.
३. मानववंशशास्त्रीय अमेरिकन संप्रदाय.
४. मानसशास्त्रीय संप्रदाय.

या आणि इतर विचारप्रणालीमुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाला विशिष्ट दिशा येऊ लागली. लोकसाहित्याचा सर्वांगीण अभ्यासाचा प्रयत्न होऊ लागला व या प्रयत्नांनी आजवर अंधारात असलेल्या लोकसाहित्यातील अनेक घटकाना उजाळा मिळू लागला. या विचारप्रणालीमुळे लोकसाहित्यातील दैवतकथा, प्राणीकथा, दंतकथा, विधी, परंपरा इत्यादी घटकावर साधक बाधक मते मांडली जाऊ लागली. डॉ. फ्रॅंझ बोआस याने दैवतकथा आणि लोककथा यांचा अभ्यास करून त्यातील साम्य स्पष्ट केले. बोआसने केलेले कथेचे विश्लेषण लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

येथपर्यंत आपण लोकसाहित्याच्या अभ्यासाला पूरक ठरलेल्या संप्रदायांचाच थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला. या निरनिराळ्या संप्रदायाच्या उदयाने आणि त्यांच्यामुळे प्राप्त झालेल्या विशिष्ट दृष्टीनी लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यासाचे प्रयत्न होऊ लागले. एक शास्त्र म्हणून लोकसाहित्याची चिकित्सा होऊ लागली. ही गोष्ट लोकसाहित्याच्या अभ्यासात अत्यंत महत्त्वाची ठरते.

४. लोकसाहित्याचे काही पाश्चात्य अभ्यासक

येथपर्यंत आपण लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या झालेल्या प्रयत्नांचा मागोवा घेतला. आता आपण लोकसाहित्याच्या अभ्यासात ज्यांनी मोलाची भर घातली त्या अभ्यासकांच्या आणि त्यांच्या अभ्यासाचा थोडक्यात परामर्श घेऊ.

लोकसाहित्याच्या अभ्यासास प्रथम चालना पाश्चिमात्य देशात मिळाली. स्नारी स्टर्लसन हा नार्वेचा. त्याचा लोकसाहित्यविषयक अभ्यास महत्त्वाचा असून लोकसाहित्यात मोलाची भर टाकणारा असा आहे. त्याचा 'Edda' हा लोककथांचा संग्रह लोकसाहित्याच्या अभ्यासकाना मार्गदर्शक ठरावा असा आहे. स्नारीच्या या लोककथातून आपणास तत्कालीन लोकजीवनाचे अवशेष व विशेष पाहवयास मिळतात.

स्नारी प्रमाणेच सेंमूड या लोकसाहित्य विशारदाची कामगिरी महत्त्वाची आहे. तर कथाशास्त्राचा पाया घालण्याचे महत्त्वाचे काम ग्रीमबंधूनी केले. ग्रीमबंधूच्या

पाठोपाठ मॅक्समूलर या लोकसाहित्याच्या अभ्यासकाने जागतिक कथा वाङ्मयाचे अधिष्ठान अत्यंत प्राचीन भारतीय वाङ्मयात आहे असे आपले मत व्यक्त केले. मॅक्समूलरने निरनिराळ्या देशात विखुरलेल्या दैवतकथांचा व पुराणकथांचा अभ्यास करून सुसंगत शास्त्रीय सूत्र शोधून काढण्याचा प्रयत्न केला. त्याने दैवतकथांचे स्पष्टीकरण करून लोकसाहित्याच्या अभ्यासकांना विशिष्ट दिशा दाखविण्याचा केलेला प्रयत्न अभ्यासनीय आहे. ऑण्ड्रचू लॉंग, डॉ. अलेक्झांडर क्रॉप या लोकसाहित्य विशारदांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला. क्रॉपचे 'The Science of Folklore' हे पुस्तक लोकसाहित्याच्या शास्त्रीय मूल्यमापनात महत्त्वाचे आहे. त्याने केलेली लोकसाहित्याची व्याख्या लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करते. क्रॉपने लोकसाहित्याचा सखोल अभ्यास करून लोकसाहित्याचे वर्गीकरणही केले आहे. क्रॉपने लोकसाहित्याचे केलेले हे वर्गीकरण त्याच्या नंतरच्या लोकसाहित्याच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरले आहे. पाश्चिमात्य लोकसाहित्य विशारदात क्रॉपला महत्त्वाचे स्थान देणे क्रमप्राप्तच ठरते कारण त्याचा मागोवा घेत घेत इतर अभ्यासकानी लोकसाहित्याच्या अभ्यासात मोलाची भर टाकली. थिओडोर बेनफे याने पंचतंत्राचे भाषांतर करून लोकसाहित्याची शास्त्रीय चिकित्सा करणारी प्रस्तावना लिहिली. त्याची ही प्रस्तावना लोकसाहित्यविषयक उद्भवनाऱ्या प्रश्नांची चर्चा करणारी असली तरी या प्रस्तावनेने लोकसाहित्याकडे पाहण्याची शास्त्रीयदृष्टी अभ्यासकाना प्राप्त होते हेही नसे थोडके. फ्रेंच लोकसाहित्य विशारद इमॅन्युएल कॉसक्विन याने लोकसाहित्यविषयक लेख लिहून लोकसाहित्याच्या अभ्यासात महत्त्वाची भर घातली. प्रो. ह्रीस डेव्हिड्स, सर जॉर्ज कॉक्स यांचाही लोकसाहित्यविषयक अभ्यसनीय वाटतो.

सर जेम्स फ्रेझर. लोकसाहित्याचा डार्विन. त्याचा 'The Golden Bough' हा ग्रंथ लोकसाहित्याचे आगळेपण वेगळे दालन उघडून दाखवितो. फ्रेझरने आपल्या या ग्रंथातून अनेक लोकप्रथांचा व कथांचा संग्रह करून लोकसाहित्यात मोलाची भर घातली.

लोकसाहित्याच्या वरील व इतर अभ्यासकांनी लोकसाहित्याचे संकलन करून, वर्गीकरण करून त्यातील घटनांचा अभ्यास केला. त्यातील सूक्ष्म बारकावे आणि घटना यांचा तपशील पडताळून त्यांना विशिष्ट अर्थ प्राप्त करून दिला. लोकसाहित्य विशारदांचे हे प्रयत्न लोकसाहित्याच्या क्षेत्रात महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या या अभ्यासाने लोकसाहित्याच्या वेगवेगळ्या अंगावर प्रकाश पडला. लोकसाहित्याचे शास्त्रीय वर्गीकरण होण्यास मदत झाली. त्यांच्या या अभ्यासावर अनेक विचारवंतानी अभ्यास करून आपले विचार या संदर्भात व्यक्त केले. लोकसाहित्याचे शास्त्रीय मूल्यमापन करण्याचा प्रयत्न होऊ लागला. आणि हा प्रयत्न लोकसाहित्याच्या अभ्यासाला विशिष्ट दिशेने नेऊ लागला.

लोकसाहित्याच्या या अभ्यासकांच्या प्रयत्नाने लोकसाहित्यातील काही प्रमुख अंगे प्रकाशात आली त्यापैकी लोककथा, वीरकथा, दंतकथा, पारंपारिक प्रथा, उत्सव, लोकभ्रम, दैवतकथा, म्हणी, कोडी इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होऊ लागला. यामुळे लोकसाहित्याचे स्वरूप विशाल होऊ लागले. लोकसाहित्य या शब्दाला व्यापक अर्थ प्राप्त होऊ लागला. लोकसाहित्य विशारदांच्या या अभ्यासामुळे लोकात लोकसाहित्याविषयी कुतूहल निर्माण होऊ लागले आणि लोकसाहित्याच्या अभ्यासकांची संख्या वाढू लागली. आणि लोकसाहित्याच्या अभ्यासाला महत्त्व येऊन लोकसाहित्याचे क्षितिज अधिक विस्तारित बनू लागले.

५. भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न

भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना मिळाली ती भारतीय प्राच्य विद्येच्या (Indology) अनुषंगाने आणि त्यानंतर विल्यम जोन्सचे प्रयत्न भारतीय लोकसाहित्याचा अभ्यास होण्यास साहचभूत ठरले. त्याच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या नियतकालिकातून पुरातन प्रथा, वाङ्मय यांचा परामर्श घेतला जाऊ लागला. यानंतर 'रॉयल एशियाटिक सोसायटी'चे प्रयत्नाने भारतीय लोकसाहित्यावर थोड्याशा का होइना प्रमाणात प्रकाश टाकला गेला. पण लोकसाहित्याच्या अभ्यासाला खरी प्रेरणा मिळाली ती 'इंडियन अँटिक्वेरी' या नियतकालिकातून. पुरातनप्रथांचे संशोधन हा या नियतकालिकाचा उद्देश होता. आणि पुरातनप्रथा तर लोकसाहित्याचा महत्त्वाचा घटक. या नियतकालिकातून दंतकथा, लोकगीते, खेळ, प्रथा, आदींचे विवेचन येत असे– की ज्यामुळे लोकसाहित्याची अभिरुची समृद्ध होण्यास मदत झाली. त्याप्रमाणेच 'बॉंबे अँथ्रॉपॉलाजिकल सोसायटी'च्या नियतकालिकाचेही महत्त्व उल्लेखनीय आहे. भारतीय लोकजीवनाची विविध अंगे तपासणे हा उद्देश या संस्थेचा होता. आणि लोकजीवन हा तर लोकसाहित्याचा आत्मा आहे हे आपण पाहिलेच आहे. जादूटोणा, चेटूक, भूताचा अंगात संचार, नरबलीची प्रथा, दैवतकथा, पूजाविधी, नागपूजा, लिंगपूजा, पिशाच्च पूजा, लोकभ्रम, जन्म, लग्न व मृत्यू यांचे विधी इत्यादी लोकसाहित्यातील महत्त्वाच्या घटकांचे विवेचन प्रस्तुत नियतकालिकातून होत असे.

भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाचा हा पाया असला तरी या पूर्वीच भारतीय लोकसाहित्याबद्दल उत्सुकता अभ्यासकाना लागलेली होतीच. लोकसाहित्याच्या अभ्यासात, जागतिक क्षेत्रात भारतीय लोककथांचा, दैवतकथांचा विचार झालेला दिसतो. यूरोपात आलेल्या लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या लाटेचे पडसाद भारतात उठणे नवलाचे नाही. सुप्रसिद्ध भारतीय मानववंशशास्त्रज्ञ शरश्चंद्र रॉय यांच्या संपादकत्वाखाली 'मॅन इन इंडिया' हे नियतकालिक सुरू झाले होते. आणि या संपादक मंडळाच्या प्रयत्नाने प्रांतीय लोकसाहित्याच्या संकलनास महत्त्व आले आणि यापूर्वी

संकलित केलेल्या लोककथांचा शास्त्रीय अभ्यास करण्यास सुरूवात झाली. भारतीय लोकसाहित्याचे चिकित्सक वर्गीकरण होऊ लागले आणि त्यातील घटकांचे विश्लेषण शास्त्रीयदृष्ट्या मोलाचे ठरले.

सन् १८८४ नंतर भारतीय संग्रहाचे कल्पनाबंधानुसार आर्ने व थॉमस यानी वर्गीकरण करून महत्त्वाची कामगिरी केली यात संशय नाही.

भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या प्रयत्नांचा आतापर्यंत आपण मागोवा घेत असताना एक गोष्ट लक्षात आलीच असेल ती म्हणजे भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासास चालना देणारे, अभ्यासाचे प्रयत्न करणारे हे लोकसाहित्य विशारद पाश्चात्यच होय. पण याचा एक फायदा असा झाला की लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे भारतीय अभ्यासकांचे लक्ष वळ लागले त्यांच्यात लोकसाहित्याबद्दल उत्सुकता निर्माण झाली. आणि सध्या तर भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाची एक जोरदार लाट आली असे म्हणावयास हरकत नाही.

कै. ठाकुर रवींद्रनाथ टागोर, श्री राम नरेश त्रिपाठी, आचार्य काका कालेलकर, कै. सानेगुरुजी श्री देवेंद्र सत्यार्थी इत्यादीनी लोकसाहित्याचा अभ्यास करून त्यातील चांगल्या गोष्टी रसिकांपुढे मांडल्या. कै. रविंद्रनाथ टागोर यानी आपल्या पुस्तकात लोकसाहित्याचा परामर्श घेतला. त्याचा परिणाम इतर अभ्यासकावर होऊन त्यांनी रविंद्रनाथ टागोरांची या बाबतची दृष्टी स्वीकारली. रविंद्रनाथ टागोरांनी बंगाली लोकगीताचे विशिष्ट दृष्टी ठेवन समालोचन केले आणि त्याच दृष्टीचा पुरस्कार इतर लोकसाहित्याच्या अभ्यासकानी केला. त्याचा परिणाम असा झाला की लोकसाहित्यातील चांगल्या, रमनीय आणि बोधप्रद अशाच घटना रसिकापुढे येऊ लागल्या. लोकसाहित्याचा सर्वांगीण अभ्यास होण्यास हा दृष्टीकोन तितकासा उपकारक ठरत नव्हता. लोकसाहित्यात याशिवाय इतरही घटनांचा समावेश असतो. त्यांचाही या संदर्भात अभ्यास होणे आवश्यक ठरते. शास्त्रीयदृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यास करताना मंगल-अमंगल असा भेद व्हावयास नको. सुरूवातीस भारतीय लोककथा, दैवतकथा, प्राणीकथा, लोकभ्रम, लोकप्रथा, लोकगीते इत्यादींचा शास्त्रीयदृष्टीने म्हणावा तसा अभ्यास होऊ शकला नाही. त्यांचे मूल्यमापन योग्यरीत्या झाले नाही.

इतर देशाच्या तुलनेने भारतात लोककथा, लोकगीते आणि दैवतकथा इत्यादी लोकसाहित्याचा भरपूर साठा आहे पण चिकित्सकदृष्टीच्या अभावाने त्यांचा अभ्यास होऊ शकला नाही.

पण सध्या लोकसाहित्याविषयी भारतीय अभ्यासकाना आवड निर्माण झाल्यामुळे लोकसाहित्याची शास्त्रीय चिकित्सा होऊन त्याच्या सर्वांगीण अभ्यासाची दृष्टी अभ्यासकात येत आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

६. मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाचे झालेले प्रयत्न

मराठीत लोकसाहित्याचे संकलन विपुल प्रमाणात झालेले आहेत आणि लोकसाहित्याचा अभ्यासही बऱ्याच प्रमाणात झाला आहे. त्यातील काही उणीवाकडे दुर्लक्ष केल्यास मराठीत झालेल्या लोकसाहित्याच्या अभ्यासास तोड नाही. मेरी फ्रियरच्या 'Old Deccan Days' च्या संग्रहानंतर सदाशिव काशिनाथ छत्रे, राजाराम शास्त्री भागवत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, महादेव कुंटे, काशिनाथ लेले, इत्यादी लोकसाहित्याच्या चाहत्यानी लोककथा व लोकसाहित्य संकलीत करण्याचा प्रयत्न केला. लोकसाहित्याचे रसग्रहण करून काही साधक बाधक चर्चाही होऊ लागली आणि लोकसाहित्याकडे बऱ्याच जणांचे लक्ष आकर्षित झाले. १९२५ सालापासून 'महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत' लोकसाहित्यविषयक मजकुर प्रसिद्ध झालेला दिसून येतो.

तरीपण मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाची खरी सुरुवात कै. वि. का.राजवाडे यांच्यापासून झाली असे म्हणावयास हरकत नाही. राजवाडे यांनी 'लोकगीते' आणि 'लोककथा' यांची वैशिष्टये स्पष्ट केलीत. पुढे या क्षेत्रात ना. गो. चाफेकर उतरले, आणि महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतून लोकसाहित्य प्रकाशित होऊ लागले. शास्त्रीय दृष्टीने चाफेकरानी लोकसाहित्याचे संकलन करून महत्त्वाची कामगिरी केली. दत्तो वामन पोतदार, शं. गो. दाते यांची कामगिरी या क्षेत्रात प्रशंसनीय आहे.एक विचारवंत व थोर समाजसेवक म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉ. केतकरांनी लोकसाहित्याचा विचार केलेला आपणास दिसतो.

श्री मुंडले, सौ. अनुसया भागवत यानी लोकसाहित्याचे शास्त्रीयदृष्टया संकलन करून लोकसाहित्यात मोलाची भर टाकली.

कै. सानेगुरुजीनी स्त्रीगीतातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनाचा परिचय करून देऊन रसिकांचे लक्ष स्त्रीगीताकडे खेचून घेतले. श्री. वामनराव चोरघडे आणि कालेलकर, पा. श्री. गोरे, डॉ. कमलाबाई देशपांडे यांच्या अभ्यासाने मराठी लोकसाहित्यात भरच पडली. श्री. भिडे, डॉ. बोरसे यांच्या लोकसाहित्याच्या संकलनाने मराठी लोकसाहित्य प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू लागले. मराठवाड्यातील लोकसाहित्याचे दालन रसिकापुढे उघडण्याचे श्रेय डॉ. नांदापूरकर यांना आहे.

मराठवाड्यातील लोककथा, लोकगीते आणि स्त्रीगीते यांचा अमोल ठेवा त्यानी रसिकांपुढे मांडला. एवढेच नव्हेतर लोकसाहित्यातील स्त्रीगीतात्मक ओवीचा परिचय त्यांनी विश्लेषण करून लोकसाहित्याच्या अभ्यासात भरच टाकली.

डॉ. सरोजिनी बाबर यांचे या क्षेत्रातले कर्तृत्व तर सर्वश्रुतच आहे. 'जा माझ्या माहेरा', 'एक होता राजा...', 'जन लोकांचा सामवेद', 'बाळराज' इत्यादी त्यांचा

लोकगीतांचा संग्रह मराठीतील लोकसाहित्याची अपूर्वाई दाखवितो. लोकसाहित्याचे विविध पैलू डॉ. सरोजिनी बाबर यांनी प्रकाशात आणून शहरी संस्कृतीचे डोळे दिपवून टाकले यात संशय नाही.

डॉ. यू. म. पठाण आणि डॉ. प्रभाकरराव मांडे या लोकसाहित्याच्या अभ्यासकांचा अभ्यास लोकसाहित्याच्या क्षेत्रात डोळचात भरण्यासारखा आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी लोकसंस्कृतीचा अभ्यास करून लोकसाहित्य, लोकप्रथा, धार्मिक विधी, लोकसंस्कृतीचे उपासक यांचा परिचय करून देऊन लोकसाहित्याच्या अभ्यासाची आवड निर्माण केली.

शास्त्रीयदृष्टीने लोकसाहित्याचा सविस्तर अभ्यास करणाऱ्या मराठीत, मला वाटते दुर्गा भागवत होत. 'लोकसाहित्याची रूपरेखा' हा दुर्गा भागवत यांचा ग्रंथ लोक-साहित्याच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरावा असाच आहे. प्रस्तुत ग्रंथात त्यांनी केलेले शास्त्रीय विवेचन अत्यंत मोलाचे आहे. डॉ. इरावती कर्वे मराठी संस्कृतीचे दर्शन घडविताना लोकगीतांचे शास्त्रीय विवेचन करताना दिसतात.

मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाचा मागोवा घेताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे दुर्गा भागवत, डॉ. इरावती कर्वे आणि डॉ. प्रभाकरराव मांडे यांचा अपवाद वगळता मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासात शास्त्रीयदृष्टीचा अभाव होता असेच म्हणावे लागेल. मराठीत लोकसाहित्याचे संकलन विपुल व विविध प्रमाणात झाले आहे हे मान्य करावेच लागेल पण त्या लोकसाहित्याची चिकित्सा मात्र सुजाणपणे झालेली दिसत नाही असे निदान मला तरी वाटते.

लोकसाहित्य आणि लोकजीवन

लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य लोकसाहित्य विशारदानी लोकसाहित्य हे परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा आविष्कार आहे हे लक्षात घेऊनच लोकसाहित्याचा समाजशास्त्रीयदृष्टीनेही अभ्यास केला. याला कारण म्हणजे लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचे अभिन्नत्व होय. लोकसाहित्याचा विचार त्यातील लोकाशिवाय आपल्याला करताच येत नाही. लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार. लोकांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीची नोंद म्हणजे लोकसाहित्य. लोक-साहित्याचा अभ्यास हा पर्यायाने लोकजीवनाचाच अभ्यास असतो हे आपल्याला विसरता येत नाही. लोकसाहित्य लोकजीवनाशी इतके निगडित असते, एकरूप झालेले असते की ते एकमेकापासून आपणास वेगळे काढताच येत नाही. लोकजीवनाच्या परिवर्तनानुसार लोकसाहित्यातील जीवनातही परिवर्तन अपरिहार्य ठरते ते या कारणामुळेच.

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांची एकरूपता सांगताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, "लोकजीवनाशी निगडीत असणे, लोकजीवनाचा त्यातून सतत आविष्कार

होणे, लोकजीवनाचे अविभाज्य अंग असणे ही लोकसाहित्याची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत."[७]

याचाच अर्थ असा की लोकसाहित्याची निर्मिती ज्या लोकजीवनात होते त्या लोकजीवनापासून त्याला वेगळे काढता येत नाही. लोकजीवनाला आकार देत देत साकार होण्याचे कार्य लोकसाहित्य करीत असते. लोकसाहित्याच्या प्रेरणानुसार लोकजीवन घडत असते. लोकजीवनाच्या विविध भावात्मक छटाही लोकसाहित्यात पाहवयास मिळतात.

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा परस्पर-संबंध पाहू जाता, त्यांच्यातील परस्परावलंबी घटक पाहू जाता त्यांच्यातील अत्यंत जवळचे व अतूट संबंध आपल्या लक्षात येतात.

लोकसाहित्याची निर्मिती लोकजीवनातूनच होत असते. म्हणी, वाक्‌संप्रदाय या लोकसाहित्याच्या घटकांमागे लोकजीवनाच्या काही परंपरा आहेत. लोकजीवनाची काही वैशिष्ट्ये आहेत. लोकजीवनातील अनुभवातूनच लोकसाहित्यातील हे घटक आकार घेतात असे म्हणावयास हरकत नाही.

उदाहरण म्हणून आपण 'कल्हई करणे' हा वाक्‌प्रचार घेऊ. 'कल्हई करणे' या वाक्‌प्रचाराची निर्मिती विशिष्ट लोकजीवनाच्या अवस्थेतूनच झाली आहे. या वाक्‌प्रचाराच्या पाठीमागे विशिष्ट लोकजीवनाची परंपरा आहे. परंतु पुढे अर्थच्युतीने या वाक्‌प्रचाराचा अर्थ बदलला व त्यास प्रचलित अर्थ मिळाला. या वाक्‌प्रचाराप्रमाणेच इंगा फिरविणे, कच्चे मडके, कान टोचणे, चांभारचौकशी इत्यादी वाक्‌प्रचार विशिष्ट लोकजीवनातूनच साकार झालेले आहेत. लोकसाहित्यातून व्यक्त होणारा प्रत्येक अनुभव हा जिवंत अनुभव असून तो लोकजीवनातूनच लोकसाहित्यात साकार झालेला असतो. तेव्हा लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा किती निकटवर्ती संबंध आहे हे स्पष्ट होते.

याशिवाय लोकजीवनातील काही प्रथा, लोकभ्रम यांना लोकसाहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. लोकजीवनाचे स्वच्छ आणि स्पष्ट प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले आपणास दिसते. लोकसाहित्यातील प्रत्येक शब्दातून लोकजीवन डोकावताना आपणास दिसते. मानवी जीवनातील सुखदुःखाच्या भावना, धीरगंभीर प्रसंग आणि मानवी स्वभावाच्या विविध छटा आपणास लोकसाहित्यातून पाहावयास मिळतात. लोकसाहित्याच्या या घटकांना लोकजीवनातून वेगळे काढल्यास ते निष्प्रभ ठरतात. आणि म्हणूनच, लोकजीवनाच्या आधाराशिवाय लोकसाहित्य जिवंत राहू शकत नाही. लोकजीवनाची नाडी ओळखण्याचे अंतःसामर्थ्य लोकसाहित्याच्या अभ्यासात आहे हे लोकसाहित्याचे विख्यात अभ्यासक प्रो.जार्डन यांनी मान्य केले ते यामुळेच असावे असे वाटते. मानववंशशास्त्राच्या

अध्ययनानेही लोकजीवन आणि लोकसाहित्य यांच्या संबंधावर प्रकाश पडतो. मानव-वंशशास्त्राच्या अभ्यासाने प्रत्यक्ष लोकजीवनाशी अत्यंत व्यापकरितीने लोकसाहित्याचा संबंध प्रस्थापित केला जातो.

लोकसाहित्यातून आविष्कृत होणाऱ्या लोकजीवनाच्या विविध छटा आपण स्वतंत्रपणे पाहणारच आहोत. लोकजीवन कोणत्या अवस्थेप्रत लोकसाहित्यास पोषक ठरते याचाच आपण येथे विचार केला. लोकजीवनाची विशिष्ट अवस्थाच लोक-साहित्याच्या निर्मितीस पोषक ठरते आणि लोकजीवनाच्या प्रवाहाबरोबरच जीवंत असलेल्या लोकसाहित्याचे स्वरूपही बदलत जाते याचाही आपण येथे विचार केलेला आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की लोकजीवनाचे हुबेहूब प्रतिबिंब आपणास लोकसाहित्यात पाहवयास मिळते.

० ० ०

संदर्भ

१. डॉ. ना. गो. नांदापूरकर : माहेरचं मराठी

२. डॉ. ना. गो. नांदापूरकर : माहेरचं मराठी

३. डॉ. सरोजिनी बाबर : मराठीतील स्त्री-धन

४. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा

५. श्री राम नरेश त्रिपाठी : कविता कौमुदी, भाग ५, पृ. ७७

६. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. १८

७. डॉ. प्रभाकर मांडे : 'लोकसाहित्याचा अभ्यास : एक दिशा', 'प्रतिष्ठान', दिसेंबर १९७१, पृ. २१

३. लोकसाहित्य आणि सामाजिकशास्त्रे

- लोकसाहित्य आणि समाजशास्त्र
- लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र
- लोकसाहित्य आणि इतिहास व पुरातत्वशास्त्र
- लोकसाहित्य आणि मानसशास्त्र
- लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र

लोकसाहित्य या संज्ञेचा अर्थ व्यापक असल्यामुळे लोकसाहित्याची व्याप्ती विशाल आहे. लोकसाहित्यात पारंपारिक लोकजीवनाचा आविष्कार होत असल्यामुळे लोकजीवनाशी संबंधित घटकांचाही समावेश लोकसाहित्यात करावा लागतो. लोकजीवनाच्या विविध अंगाचे दर्शनही लोकसाहित्यात घडत असल्यामुळे लोकसाहित्य इतर संबंधित अभ्यासविषयात त्यांच्या अभ्यासात साहचभूत ठरते. लोकसाहित्याचा इतर सामाजिक शास्त्राशी अत्यंत जवळचा संबंध आहे. लोकसाहित्याचा अभ्यास इतर सामाजिक शास्त्राच्या अभ्यासास कसा साहचभूत ठरतो ? लोकसाहित्याचा आणि इतर सामाजिक शास्त्रांचा कोणता संबंध आहे ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी या शास्त्रातील परस्पर संबंधित घटक कोणते याचा आपणास अभ्यास करावा लागतो. हे घटक परस्पराच्या अभ्यासास पूरक ठरतात.

लोकसाहित्य आणि समाजशास्त्र

समाजाच्या विविध अंगाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणून समाजशास्त्र ओळखले जाते. समाजाच्या या विविध अंगाचा अभ्यास करताना त्या त्या समाजातील रूढी, प्रथा, लोकसमजुती, कथा आणि ज्या ज्या माध्यमातून समाजजीवनाचा आविष्कार घडतो त्या सर्व माध्यमांचा या संदर्भात समाजशास्त्रज्ञाना अभ्यास करणे आवश्यक असते. समाजशास्त्राचा असा अभ्यास करताना यातील बरीचशी अध्ययन सामुग्री लोकसाहित्यात सापडते. लोकसाहित्यातून समाजजीवनाचे प्रतिबिंब पडत असल्यामुळे समाजशास्त्रज्ञाना लोकसाहित्य बरेच उपयोगी पडते. निरनिराळ्या जातीजमातींचा अभ्यास समाजशास्त्र करून त्यांची वैशिष्टये विशद करीत असते. हा अभ्यास करताना या जातीजमातीत पूर्व परंपरेने चालत आलेल्या प्रथा, रूढी यांचे अवशेष लोकसाहित्यात सापडतात त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास करणे या संदर्भात आवश्यकच ठरते.

लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार. समाजजीवनाची गाथाच ती. समाजाची विविध वैशिष्ट्ये लोकसाहित्यातून पाहवयास मिळतात. लोकजीवनातील रूढी, प्रथा, लोकसमजुती, विधी यांना समाजशास्त्रातही अत्यंत महत्त्व आहे. लोक-जीवनातील हे घटक लोकसाहित्यातही तितकेच महत्त्वाचे ठरतात आणि लोकजीवनाच्या या संबंधित घटकांचा आविष्कार लोकसाहित्यातून होत असल्यामुळे लोकसाहित्याचा आणि समाजशास्त्राचा संबंध अत्यंत जवळचा आहे.

लोकसाहित्याचा अभ्यास समाजजीवनाच्या अभ्यासाशिवाय होऊच शकत नसल्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास करताना समाजशास्त्राचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे लोकजीवनाचा अभ्यास. लोकजीवन आणि लोकसाहित्य याचे अभिन्नत्व असल्यामुळे लोकसाहित्यात लोकजीवन हे अविभाज्य अंग आहे. लोकसाहित्याला त्यातील 'लोका' मुळेच अर्थ प्राप्त झालेला आहे. याचाच अर्थ 'लोका' शिवाय लोकसाहित्याला अर्थ राहत नाही आणि हे लोक, लोकजीवन समाजशास्त्राचे आणि लोकसाहित्याचे मूल आधार आहे. बदलत्या समाजजीवनाचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पडते. समाजजीवनातील परिवर्तनाचा परिणाम लोकसाहित्यात परिवर्तन होण्यास अपरिहार्य ठरतो.

लोकसाहित्य मौखिक परंपरेने चालत आल्यामुळे लोकसाहित्यात भूतकाळातील समाजजीवनाचे अवशेष पाहवयास मिळतात. समाजजीवनाच्या संदर्भात, गतकालातील समाजजीवनाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करताना या अवशेषाची गरज समाजशास्त्राच्या अभ्यासकांना असते. याचाच अर्थ असा की, समाजजीवनाच्या संदर्भात लोकसाहित्याचा अभ्यास करणे जसा समाजशास्त्रज्ञाना आवश्यक आहे तसाच लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्याच्या अभ्यासकास समाजशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

लोकसाहित्य आणि समाजशास्त्र हे परस्परांना पूरक अशी शास्त्रे आहेत. या दोन्ही शास्त्रांचा अत्यंत जवळचा असा संबंध आहे.

लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र

मानवी संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्य बऱ्याच अंशी उपयोगी पडते. मानववंशशास्त्राच्या अभ्यासाची अध्ययन सामग्री म्हणून, मानववंशशास्त्र लोकसाहित्याकडे पाहतात. मानववंशशास्त्राचे अनेक सिद्धांत लोकसाहित्याच्या अभ्यासाआधारेच स्पष्ट करण्यात आले आहेत.

मानववंशशास्त्राची एक शाखा म्हणून पूर्वी लोकसाहित्याकडे पाहिले जात असे यावरून लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र यांचा संबंध आपल्या लक्षात येतो. आजही

लोकसाहित्याचा सांस्कृतिक मानववंशशास्त्र म्हणून काही अभ्यासक उल्लेख करतात ते लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या सांस्कृतिक परंपरामुळेच. लोकसाहित्यातून विविध संस्कृतीच, परंपराच, पारंपारिक संस्थांचे दर्शन घडत असल्यामुळे व लोकसाहित्यातून व्यक्त होणारे हे घटक मानववंशशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्यामुळे लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. सांस्कृतिक मानववंशशास्त्राचा Cultural Anthropology अभ्यास लोकसाहित्याशिवाय करताच येत नाही.

मानववंशशास्त्राचे एक प्रमुख अभ्यासक एडवर्ड बी. टायलर यांनी लोकसाहित्याच्या आधारेच त्यांचा 'संस्कृती उत्क्रांतीविषयी'चा सिद्धांत मांडला असल्याचे स्पष्ट होते. आणि मानववंशशास्त्राच्या अभ्यासात लोकसाहित्याचे महत्त्व पटवून दिले. लोकसाहित्याचे हे महत्त्व अनेक मानववंशशास्त्रज्ञांना मान्य केल्यामुळेच लोकसाहित्याच्या अभ्यासाचा मानववंशशास्त्रीय संप्रदाय निर्माण झाला.

मानववंशशास्त्रज्ञांच्या मते संस्कृती ही मानवाचा सामाजिक वारसा असते. परंपरेने चालत आलेल्या विशेषांचा संस्कृतीत समावेश असल्याने आणि या संस्कृतीचे दर्शन लोकसाहित्यातून घडत असल्याने मानववंशशास्त्र आणि लोकसाहित्य यांचा संबंध अनन्यसाधारण आहे. मानववंशशास्त्रज्ञांना त्यांच्या अभ्यासासाठी लोकसाहित्याचा आधार घ्यावा लागतो व लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी मानववंशशास्त्राची माहिती आवश्यक ठरते.

लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्रांचा संबंध लक्षात घेण्यासाठी लोकसाहित्याच्या अभ्यासातील मानववंशशास्त्र संप्रदायाचा विचार करणे आवश्यक वाटते. टायलर व लँग हे अभ्यासक सजीवावशेषत्ववादी संप्रदायाचे प्रवर्तक. त्यांनी रानटी लोकांच्या दैवतकथांचा अभ्यास करून स्पष्ट केले की मूळच्या कथा रानटी लोकांत आढळतात. त्यांचा हा सिद्धांत लोकसाहित्याला अत्यंत जवळचा आहे.

मानववंशशास्त्राच्या अभ्यासामुळे प्रत्यक्ष लोकजीवनाशी पर्यायाने लोकसाहित्याचा जवळचा संबंध प्रस्थापित झाला असेच म्हणावे लागते.

सारांश-लोकसाहित्यात मानवी संस्कृतीचे दर्शन घडते आणि ही संस्कृती मानववंशशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वाची ठरते यामुळे लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे.

लोकसाहित्य : इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्र

लोकसाहित्याचा इतिहास व पुरातत्त्वशास्त्र यांच्याशी घनिष्ट संबंध आहे. लोकसाहित्यातील दंतकथा, आख्यायिका यांच्या आधारे आपल्याला इतिहासाच्या तळाचा

शोध घेता येतो– कारण ऐतिहासिक घटनेसंबंधीची आठवण कल्पनावगुंठीत स्वरूपात मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत झिरपत जाते. लोकप्रतिभा या ऐतिहासिक घटनेवर कल्पनाबंधाची पुटे चढवित जाते आणि मूळ सत्य धूसर बनते पण हे धूसर सत्य आपल्याला शोधून काढता येते. लोकसाहित्यातील दंतकथा किंवा आख्यायिका लोकात प्रचलित असतात. अनेक उत्खनने याच दंतकथांच्या आधारे करण्यात आली आहेत. व त्यातून ऐतिहासिक अवशेषही सापडलेले आहेत यावरून लोकसाहित्य आणि पुरातत्त्वशास्त्र व इतिहास यांचा जवळचा संबंध असल्याचे स्पष्ट होते.

कर्नल टाड यांच्या मते लोकसाहित्यातून ऐतिहासिक सत्त्याचा शोध आपल्याला घेता येतो तर जॉर्ज लॉरेन्स लोकसाहित्याला इतिहासाचे शास्त्र म्हणतो. मानववंश-शास्त्रज्ञ समाजात प्रचलित असलेल्या लोकसाहित्याच्या आधारेच मानववंशाच्या भूतकालीन जीवनाची माहिती मिळवितात. जेऊबग्रिम लॉरेन्स यानी लोककथांचा, लोकरुढींचा अभ्यास करून याबाबत निष्कर्ष काढलेले आहेत.

रामायण आणि महाभारतात अनेक दैवतकथांचा समावेश झालेला आढळतो. या दैवतकथांच्या आधारे ऐतिहासिक सत्य, तत्कालीन जीवनाची माहिती व ऐतिहासिक घटना यांचा अभ्यास करण्याचा आपल्याकडेही प्रयत्न झालेला आहेच. दैवतकथांच्या आधारे इतिहासाकडे पाहण्याच्या पद्धतीवर अनेक अभ्यासक आक्षेप घेत असले तरी ऐतिहासिक सत्य शोधण्यासाठी लोकसाहित्याचा उपयोग होऊ शकतो हे अमान्य करता येत नाही हेही तितकेच खरे आहे. लोकसाहित्यातील रूढी, प्रथा, परंपरा यांच्या आधारे गतकालातील समाजजीवनाचा इतिहास लिहिला जाऊ शकतो आणि इतिहासाच्या या अभ्यासासाठी लोकसाहित्य आपल्याला बरीच मदत करू शकते हे हे नाकारता येत नाही.

लोकसाहित्याशिवाय मानवी संस्कृतीचा इतिहास ज्ञात होणे शक्य नाही. सांस्कृतिक इतिहास लेखनात लोकसाहित्याची आवश्यकता स्पष्ट करताना डॉ. शंकरलाल यादव म्हणतात.

"विश्व और मानव की रहस्यमय पहेली को सुलझाने के लिए उसके प्राचीनतम रूपों को खोजने के लिए और उसके यथार्थ स्वरूप जानने के लिए जहाँ इतिहास के पृष्ट मूक है, शिलालेख और ताम्रपट मलिन हो गए है वहाँ उस तमसाच्छन्य स्थिती में लोकसाहित्यही दिशा निर्देश करता है"[१]

डॉ. शंकरलाल यादव यांच्या वरील उद्गारावरून ऐतिहासिक घटना समजून घेण्यासाठी लोकसाहित्याचे महत्त्व किती आहे हे आपणास समजते.

लोककथा, लोककथागीते किंवा लोकगीते, लोकसाहित्याची ही अंगे स्थलकालाशी संबंध असलेल्या ऐतिहासिक पुरुषांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना जतन करीत असतात या ऐतिहासिक घटना म्हणजे "मौखिक इतिहास" असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे ठरू नये असे वाटते.

प्राचीन काळातील मानवी जीवनाचा शोध घेण्याचे काम पुरातत्त्वशास्त्र करीत असते. लोकसाहित्यात मानवी जीवनाचा आलेख आपणास पाहवयास मिळतो. अशा पुरातत्त्वाचे लोकप्रचलित स्वरूप लोकसाहित्यात असते.

प्राचीनकाळचा इतिहास जाणून घेण्यासाठी वर्तमानात अवशेष रूपाने अवशेष असलेल्या घटनाचा विश्लेषनात्मक अभ्यास पुरातत्त्वशास्त्र करते. हे जुने अवशेष लोकसाहित्यातील रूढी, प्रथा, लोकगीते, दंतकथा यांच्यातून पाहवयास मिळतात. डॉ. रा. चि. ढेरे या महाराष्ट्रातील संशोधकाने लोकसंस्कृतीच्या क्षेत्रातील अभ्यासपूर्ण व महत्त्वाचे संशोधन लेख लोकसाहित्याच्या आधारेच लिहिले आहेत.

दंतकथा किंवा आख्यायिका यांच्या आधारे इतिहासातील घटना कशा समजू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणून वाशीम या गावाच्या नावाविषयीची आख्यायिका या परिसरात सांगितली जाते तिचा थोडक्यात आशय असा-

वाशीम या गावाचे प्राचीन नाव 'वत्सगुल्म' असे सांगितले जाते. वत्सगुल्म म्हणजे अगस्त्यऋषीचा आश्रम. अगस्त्य दक्षिणेत आले तेव्हा त्यानी येथे आपला आश्रम स्थापन केला अशी आख्यायिका या परिसरात प्रचलित आहे. याचाच अर्थ असा की आख्यायिका, दंतकथा, ग्रामनामाच्या उत्पत्तिकथा यातून पौराणिक परंपरांचा आणि प्राचीन काळात घडलेल्या ऐतिहासिक घटनांचा आपल्याला मागोवा घेता येतो आणि यातून पुरातत्वज्ञ आपला मार्ग शोधीत असतात. त्यांच्या संशोधनाला लोकसाहित्याच्या आधारे दिशा मिळत असते. तेव्हा लोकसाहित्य आणि इतिहास तसेच पुरातत्त्वशास्त्र यांचा अत्यंत जवळचा संबंध असल्याचे स्पष्ट होते.

लोकसाहित्य आणि मानसशास्त्र

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. व्यक्तिशिवाय समाजाला अर्थच उरत नाही. व्यक्ति आणि व्यक्तित्व समाजजीवनातच संपन्न होत असते. व्यक्तीचे व्यक्तित्व समाजजीवनातून फुलत असते, विकसित होत असते. व्यक्तितील मानसिक प्रक्रीयांचा अभ्यास मानसशास्त्र करीत असते. व्यक्तीतील वर्तन परिवर्तन पर्यायाने समाज घडणाऱ्या परिवर्तनाचा एक भाग असते आणि समाजातील परिवर्तन हे व्यक्तीतून आकारास येत असते. व्यक्ती आणि समाज हे परस्परावलंबी घटक असून ते एकमेकांना पूरक असतात. व्यक्ती आणि समाज हे एकमेकात इतके मिसळलेली असतात की, त्यांना एकमेकापासून

वेगळे काढताच येत नाही. आणि म्हणूनच काही वेळा व्यक्ती ही समाजमनातून अविष्कृत होत असते. व्यक्तीचे आविष्कार म्हणजे समाजाचे आविष्कार ठरतात. व्यक्तीचा समाज मनातून असा झालेला आविष्कार आपल्याला लोकप्रथा, रूढी, लोकसमजुती यातून पाहवयास मिळतो. यातूनच समाजमनाची, प्रवृत्तीची ओळख होते. आणि म्हणूनच समाजमनाच्या अभ्यासासाठी लोकसाहित्य उपयोगी पडते. लोकसाहित्यात व्यक्तीच्या जीवनाचा जसा आविष्कार होतो तसाच समाजजीवनाचा आविष्कारही त्यातून होतो हे आपण पाहिले आहे.

फ्राईड, अर्नस्ट जोन्स, एफ. रिकलिन आणि टी. रीक यांनी मानसशास्त्रांच्या अभ्यासात लोकसाहित्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे. मानवीमनातल्या गूढ, सुप्त वासना, भीतीचे पृथक्करण. जे जे दिसते त्याचे मूळ काय या विषयीचे गाढ औत्सुक्य व वासनापूर्तीची प्रतीके या कल्पनावर मानसशास्त्रज्ञांनी लोककथांचे विश्लेषन करून रानटी अवस्थेपासून तो सुसंस्कृत सामाजिक अवस्थेपर्यंतची मानवी मनाच्या व्यापाराची सारी दालने खोलून दाखविली.[२]

लोकसाहित्याचा मानसशास्त्राच्या दृष्टीने अभ्यास करण्याची लाटच विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उसळली होती पण पुढे ही लाट ओसरली तरी लोकसाहित्य आणि मानसशास्त्र याचा असलेला संबंध नाकारता येत नाही.

'लोका'ला 'लोकमन' असते असे लाझारस आणि स्टाईनथाल यानी संशोधनाच्या आधारे स्पष्ट केले आहे. या लोकमनाचा आविष्कार लोकांची भाषा, पुराणकथा, लोकसाहित्य, कला, वाङ्मयातून होत असतो. हे तत्त्व बऱ्याच लोकसाहित्य विशारदानी व मानसशास्त्रज्ञानी मान्य केलेले आहे. आणि म्हणूनच समूहाच्या मानसिक अवस्थांचे अध्ययन करणे लोकसाहित्याच्या अभ्यासाला पूरक ठरते.

सारांश लोकसाहित्य आणि मानसशास्त्र यांचा अत्यंत जवळचा असा संबंध आहे.

लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र

लोकसाहित्य हे भाषाशास्त्राच्या अभ्यासाचे एक साधन आहे. लोकसाहित्यात शब्दवैभव, अर्थवैभव आणि उच्चारवैभव असल्याने त्यांचे विशेष समजण्यास भाषाशास्त्र आपल्याला मदत करते लोकसाहित्यातील शब्द आपल्या जुन्या रूपासह प्रकट होत असल्याने भाषाशास्त्राची सामुग्री म्हणून लोकसाहित्याला विशेष महत्व आहे. लोकसाहित्यात प्रचलित असलेले आणि आज रूढ नसलेले शब्द त्यांची रूपे यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास भाषाशास्त्राच्या आधारे करता येतो. लोकसाहित्याची भाषा ही बोलभाषा असते. लोकसाहित्यात शब्दांचे पालटेत रूप पाहवयास मिळत असली तरी

शब्दांची स्वतःची अशी वैशिष्ट्ये असतातच. लोकसाहित्यात भाषेतील जुने शब्द, जुने वाक्‌प्रचार, उच्चार वैभवाची पुरातन रूपे पाहवयास मिळतात. प्रस्तुत ग्रंथातच लोकसाहित्याची भाषा म्हणून पुढे विवेचन केले आहेच त्यावरून लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र यांचा अत्यंत निकटचा सबंध असल्याचे स्पष्ट होते.

भाषाशास्त्रज्ञानी लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीते यांचा अभ्यास करून भाषेसंबंधीचे महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढलेले आहेत. मॅक्समूलरने दैवतकथांचा जो सिद्धांत स्पष्ट केला त्याला त्याने भाषाशास्त्राचाच आधार होता. भाषा सांस्कृतिक प्रवाहाचे एक जिवंत माध्यम आहे. वाक्‌प्रचार, म्हणी यातून समाजजीवनांच्या अनुभवांचे प्रकटन होत असते.

लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र यांचा संबंध पाहताना आपल्या लक्षात येते की भाषाशास्त्रज्ञानीच पौराणिक परंपरांचे शास्त्रशुद्ध संकलन करून लोकसाहित्याचा तात्त्विक व चिकित्सक अभ्यास केला. सन् १८१२ ते १८७१ या कालखंडात ग्रिम, बेल, कूहन, मॅक्समूलर, डांसेंट आणि कॉक्स यानी लोकसाहित्याचा भाषाशास्त्र या दृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या कालखंडात प्रामुख्याने भाषाशास्त्रीय दृष्टीने दैवतकथा आणि लोककथा या लोकसाहित्याच्या अंगाची चिकित्सा करण्यात आली यावरून लोकसाहित्य आणि भाषाशास्त्र यांचा असलेला घनिष्ठ संबंध स्पष्ट झाला असेच म्हणता येईल.

लोकसाहित्याचा आणि इतर सामाजिकशास्त्रांचा हा परस्परपूरक संबंध पाहू जाता सामाजिकशास्त्रांच्या अध्ययनात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे व लोकसाहित्याच्या अध्ययनात या व इतर सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासाचे असलेले महत्त्व आपल्या लक्षात येते.

वर उल्लेखिलेल्या सामाजिकशास्त्राशिवाय धर्म, लोकवैद्यक, चित्रकला, संगीत व नृत्य इत्यादीसंबंधीच्या शास्त्रांचा व लोकसाहित्याचा जवळचा संबंध आहेच. सध्या संगीत, नृत्य आणि चित्रकला या शास्त्रांच्या अभ्यासात लोकसाहित्याला महत्त्व प्राप्त होत असलेले दिसते.

लोकसाहित्याचे वरील सामाजिकशास्त्रांच्या अध्ययनातील महत्त्व पाहू जाता लोकसाहित्याची महतीही आपणास कळते. लोकसाहित्य हे वेद, श्रुति–स्मृती, गाथा–संहिता, शास्त्र–इतिहास यांच्या अध्ययने साधनसामुग्री असून चिरंतन आणि उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्ये सिद्ध करणारे 'अलिखित अक्षरवाङ्मय' आहे. ध्वनी, शब्द, रंग, रूप आणि गंध यांचा लोकसाहित्यात आविष्कार घडतोच घडतो पण नाट्य, नृत्य, संगीत, चित्रकला इत्यादी कलांचीही महती आपल्याला लोकसाहित्याच्या अध्ययनाने

समजू शकते. लोकसाहित्य हे केवळ प्राचीन रुढींचे किंवा प्रथांचेच अध्ययन करते असे नव्हे तर जीवित लोकभावना, लोकाभिव्यक्ती आणि चैतन्यपूर्ण प्रक्रीयांचे अध्ययनही आपल्याला लोकसाहित्याच्या आधारे करता येते. जीवनाच्या विविध अंगाना स्पर्श करणारे असे हे लोकसाहित्य इतर सामाजिकशास्त्राशी अतूट अशा धाग्यांनी बांधले गेले आहे.

० ० ०

संदर्भ

१. डॉ. शंकरलाल यादव : हरियाना प्रदेश का लोकसाहित्य, विषयप्रवेश.
२. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. ३७



४. लोकगीते

- लोकगीतांचे स्वरूप
- लोकगीत म्हणजे काय ?
- लोकगीतांचे वर्गीकरण : स्त्रिया आणि लोकगीते
- लोकगीतांची मौखिक परंपरा
- प्रश्नोत्तररुपी लोकगीते
- लोकगीताची रचना
- लोकगीतातील ओव्या
- लोकगीते आणि बोलीभाषा
- लोकगीतांचे विशेष
- लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्य

लोकसाहित्याच्या कक्षा अत्यंत विस्तृत असून लोकसाहित्य किती विशाल आहे हे आपण पाहिले. लोकसाहित्याचे दर्शन आपल्याला घराघरातून, कुटुंबाकुटुंबातून आणि प्रत्येक भाषेतून घडते. लोकसाहित्याच्या प्राचीनत्वाचे विशेषत्वाचे प्रकर्ष त्यांचा अभ्यास करतांना आपल्या ध्यानात येतात.

लोकसाहित्याचा खजिना आपल्याला विविध प्रकारात आढळतो. विशाल व विविध स्वरूपात आणि विपुल प्रमाणात आढळणाऱ्या लोकसाहित्याचे स्थूलमनाने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१. लोकगीते
२. लोककथा
३. उखाणे
४. लोकभ्रम किंवा लोकसमजुती
५. लोकप्रथा
६. लोकनृत्य
७. लोकनाट्य

अर्थात लोकसाहित्याचे हे वर्गीकरण स्थूलमानाने केलेले आहे. लोकसाहित्यातील या प्रकारांचा परस्पराशी असलेला जवळचा संबंध त्यांचा अभ्यास करताना आपल्याला जाणवतो. कधी कधी तर लोकसाहित्याचे हे प्रकार एकमेकात बेमालूमपणे मिसळलेले पाहवयास सापडतात.

लोकनाट्य या लोकसाहित्याच्या प्रकारात लोकगीत, लोकनृत्य, लोकसंगीत यांचा मनोहारी मिलाप पाहवयास आढळतो. तर एखाद्या लोककथेतून उखाणा किंवा कोडी आपल्याला कोड्यात टाकतात. तर लोकसमजुतीवर आधारलेल्या काही लोककथा ऐकावयास मिळतात.

लोकगीते

लोकगीते हा तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. लोकसाहित्याचे ते प्रमुख अंग आहे. मराठी लोकसाहित्यात तर लोकगीतांची संख्या फारच विपुल प्रमाणात आढळते. मराठी लोकसाहित्याचे लोकगीते एक प्रमुख वैशिष्ट्ये आहे.

अशा या लोकगीतांचा जन्म कसा झाला हे सांगताना ना. रा. शेंडे म्हणतात; लोकगीते तर लोकसाहित्याचा आत्मा आहे. त्या आत्मपिंडातून स्त्रवणारे विविध भाव निर्झर आणि त्यांची लकाकी मनुष्यमात्राच्या जीवनप्रणालीचे व प्रकृती आणि प्रवृत्तीचे प्रभावी द्योतक ठरतात. शून्यातून ध्वनी निर्माण झाला– त्यातून अक्षरे निनादली– अक्षरानी शब्द बनला आणि शब्दानी आकार घेऊन एक वेगळे रूप प्रकट केले त्यातच 'मनुष्य' 'मानव' व्यक्त झाला. आणि त्याने आपल्या सहजस्फूर्त भावनाद्वारे शून्याचा आविष्कार घडविला. त्या आविष्कारात लोकगीताचा जन्म झाला. तो संगीतबद्ध झाला. त्याने वातावरणात चैतन्य निर्माण केले."[१]

लोकगीत म्हणजे काय ?

लोकगीतांचे स्वरूप, त्यांची लक्षणे आणि विशेष याविषयी लोकसाहित्याच्या अभ्यासकानी आपले मत व्यक्त केले आहेत. त्यावरून लोकगीतांचे स्वरूप आपल्याला त्यांच्या वैशिष्ट्यासह लक्षात येते.

- लोकसाहित्याचा पाश्चात्य अभ्यासक क्रॉप लोकगीताचे विशेष सांगताना म्हणतो," लोकगीत हे गाणे म्हणजे भावगीत (Lyric) किंवा ललितकृति असून त्याला चाल असते. लोकगीतांचा उगम निरक्षरात झालेला असून त्याचा कर्ता अनामिक असतो. लोकगीत ही भूतकालातील कृती असून पुष्कळदा कित्येक शतकांची परंपरा तिच्या पाठीमागे असते."[२]

० तर डॉ. सरोजिनी बाबर लोकगीतांची पुढीलप्रमाणे व्याख्या करतात, "विविध प्रकारांच्या जातीवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षांमागे रचिले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत होय. हे लोकगीत म्हणजे सामान्यमाणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती होय.[१]

वरील विवेचनावरून लक्षात येते की लोकगीतांच्या पाठीमागे कित्येक शतकांची परंपरा असून लोकगीत हे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची जीवंत अभिव्यक्ती असते.

० एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्ये लोकगीतांचे पुढील विवेचन केले आहे त्यावरून लोकगीतांची अस्मिता कळण्यास मदत होते.

'कोणतेही गीत अथवा संगीत लोकगीतावर निर्भर, अधिष्ठित आहे. संगीताच्या दृष्टीनेही लोकगीते कसल्याही वाद्ययंत्राशिवाय स्वाभाविकपणेच हृदयस्पर्शी स्वरांचे प्रतिनिधीत्व करतात. मानवजातीच्या हृदयातून प्रकृतिदत्त ध्वनीने आणि सहजस्फूर्ततेने प्रगट होणारे लोकगीत हे संगीतच आहे. आपल्या हृदयावरील भार हलका होऊन आनंद प्राप्तीस्तव त्यातून विविध भाव-भावनांची अभिव्यक्ती अविष्कृत होत असते आणि ते बोलण्यापेक्षा गावून प्रदर्शित केले जाते."

० लोकगीतातील स्वाभाविकता आणि सहजता स्पष्ट करताना ग्रिम म्हणतो, "लोकगीते अकृत्रिम असतात ती सहजतेने स्वयं निर्माण होत असतात. आणि संगीताचे रूप घेऊन जीवनात आनंद निर्माण करतात."

० तर पॅरी पुढील सुटसुटीत शब्दात लोकगीताचे विशेष स्पष्ट करतो. "लोकगीत आदिमानवांचे आल्हाददायी संगीत आहे." लोकगीतांच्या स्वरूपावर प्रकाश टाकणाऱ्या पुढील व्याख्याची नोंद येथे करणे सयुक्तीक वाटते.

० "लोकगीत म्हणजे ज्या लोकसमूहाचे वाङ्मय अलिखीत आणि मौखिक परंपरेने चालत येते त्याचे संगीतमय गीत."
(स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोक्लोअर मायथॉलॉजी अँड लिजेंड भाग २, पृ. १०३२)

० "लोकगीत नवेही नसते आणि जुनेही नसते. वनातील वृक्षाप्रमाणे त्याची मुळे भूतकाळात खोलवर रुजलेली असतात. परंतु तिला नित्यनूतन शाखापुष्पफळे येत असतात"

—व्ही. विलियम्स

- "A Folk song is a sponteneous out flow of life of the people that live in more or less primitive condition cut side the sphere of sophisticated influence." –Prof. Kunj Bihari Das
- "लोकगीत हमारे विकास के इतिहास की अमूल्य निधी के समान है। जातीय हृदय की उथल-पुथल, सुख-दुःख, संयोग-वियोग आदी की भावनाएँ भिन्न-भिन्न प्रथाओं के गीतों के रूप में व्यक्त हुई है। इस अमूल्य रत्न-राशि को यदि हम जमा न कर सके तो आगे इनका स्वरूप विकृत होकर बदल जायगा।"

  – श्री राम नरेश त्रिपाठी, कविता कौमुदी, भाग ५, पृ. ७७

  लाला लजपतराय यांचे विशेष पत्र.
- 'छत्तीसगढी लोक-गीतों का परिचय' या श्री श्यामचरण दुबे लिखीत ग्रंथाच्या प्रस्तावनेत पं. द्विवेदी लिहितात,

  "ग्रामगीतों का समस्त महत्व उनके काव्य सौंदर्य तक ही सीमित नहीं है। इनका एक बहुत ही महत्वपूर्ण कार्य है। एक विशाल सभ्यता का उद्‌घाटन जो अबतक या तो विस्मृती के समुद्र में डुबी हुई है या गलत समझ गई है। आर्य आगमन के पूर्व बहुत ही समृद्ध आर्येतर सभ्यता भारत वर्ष में फैली हुई थी। आर्यो ने राजनीतिक रूप में तो भारत वर्ष को जीत लिया था, पर वे सांस्कृतिक रूप में पूर्ण रूप से यही के मूल निवासियों के द्वारा प्रभावित हो गए थे। यहाँ की मूल सभ्यता वैदिक सभ्यता से एकदम भिन्न थी और आज भी लोकाचार, स्त्री-आचार, पौराणिक परंपरा आदि के रूप में विद्यमान है। ग्रामगीत इस सभ्यता के वेद (श्रुति) है। वेद भी अपने आरंभिक युग में श्रुति कहलाते थे। वेद भी आर्यो की महान जाति के गीत ही थे और ग्रामगीतों की भाँति ही सुन सुनकर याद किये जाते थे। सौभाग्यवश वेद ने बाद में श्रुति से उतरकर लिपी का रूप धारण कर लिया, पर हमारे ग्रामगीत अब भी 'श्रुति' ही है। जिस प्रकार वेदों द्वारा आर्य सभ्यता का ज्ञान होता है, उसी प्रकार ग्रामगीतों द्वारा आर्य पूर्व सभ्यता का ज्ञान हो सकता है। ईट-पत्थर के प्रेमी विद्वान यदि धृष्टता न समझें, तो जोर देकर कहा जा सकता है कि ग्रामगीत का महत्व मोहेन-जोदड़ से कहीं अधिक है। मोहेन-जोदड़ सरीखे भग्न स्तूप ग्रामगीतों के भाष्य का काम दे सकते हैं।"

पं. द्विवेदी यानी आपल्या प्रस्तावनेतून लोकगीतांचे किती महत्त्व आहे हे स्पष्ट केले.

- "गीतों में विज्ञान की तराश नहीं, मानव संस्कृती का सारल्य और व्यापक भावों का उभार होता है। गीतों की यह परंपरा तबतक जीवित है, जबतक मानव का अस्तित्व विद्यमान है। आदि-मानव के कंठ से जो भाव निकले थे वे गीत बन गए। गीतों के प्रारम्भ के प्रति एक संभावना हमारे पास है। पर उसकी अंत की कोई स्थापना नहीं। यह बड़ी धारा है, जिसमें उनकी छोटी-मोटी धाराओं ने मिलकर उसे सागर की तरह गंभीर बना दिया है।"

  (भारतीय लोकसाहित्य, पृ. ५२–५४)

० "गाँवों के गीत जीवन का संगीत है। इनके सहारे अरण्यवासी पुलकित हो उठते हैं। उनके पास श्रम, आनंद, उत्सव और नृत्य-गीतों का अक्षय संग्रह है– जो प्रचलित और लुप्त होते रहते हैं। वे अपनी सरल और प्राकृतिक बोली में भाव प्रदर्शन और विचार दर्शन बड़े ही अनूठे ढंग से करते हैं। लोक संस्कृती की पूंजी पुस्तकें नहीं वरन् अपने जीवन की लोककथाएँ, गीत और नृत्य है। जिन्हें वे पीढ़ियों से सुनते और दोहराते जाते हैं।"

– पं. प्रयागदत्त जी शुक्ल (आरण्य की संस्कृती, पृ. ९७–१००)

लोकजीवनातून आविष्कृत होणाऱ्या लोकगीताचे विशेष पं. प्रयागदत्त जी वरील उताऱ्यात स्पष्ट करताना दिसतात.

० "ज्या गीतात लोकमानसाची अभिव्यक्ती असते अशा गीतांचा समावेश लोकगीतात करता येईल." – डॉ. सत्येंद्र

० "सामान्य लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर सहजरूपाने मनोभावांची झालेली लयात्मक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत." – डॉ. चिंतामणी उपाध्याय

० "लोकगीत आमच्या जीवनविकासाचा इतिहास आहे."

– डॉ. तेजनारायण लाल

वरील व्याख्यांवरून लोकगीतांचे स्वरूप आणि लक्षणे स्पष्ट होतात.

लोकगीतांचा कर्ता अनामिक असतो. अशिक्षितात ती रूढ झालेली आढळतात. लोकगीते ही कोणा एका व्यक्तीच्या मालकीची नसतात. लोकगीतातून लोकजीवनाच्या विविध आणि सूक्ष्म भावछटा वेगळ्या पण आगळ्या स्वरूपात व्यक्त होतात. लोकगीते म्हणजे जीवंत काव्य. लोकगीतातून लोकजीवन, लोकसंस्कृती आणि रीतिरिवाज यादीचे आपणास दर्शन होते. लोकगीतांचे स्वरूप पाहताना आपल्या लक्षात येते की लोकगीतांची जडण घडण सारखी चालू असते. लोकगीते गाता येतात. ती स्वरप्रधान असतात. लोकगीतात लोकजीवनाचा आविष्कार असतो. लोकगीतातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकगीते कालातीत असतात. लोकगीते नृत्य, नाट्य, संगीत, विधी आणि खेळ यांच्याशी जोडलेली असतात आणि मुख्य म्हणजे लोकगीते मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेली असतात.

लोकगीतांचे वर्गीकरण

आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत लोकगीतात विविधता असल्याने त्यांचे वर्गीकरण करणे सहजशक्य होत नाही. विशिष्टदृष्टी स्वीकारून किंवा विशिष्ट तत्त्वाचा आधार घेऊनही लोकगीताचे वर्गीकरण करताना त्यात उणीवा राहतातच. लोकसाहित्याच्या अभ्यासकानी लोकगीताचे वर्गीकरण करण्याचा बराच प्रयत्न केलेला आहे. तरीपण त्यातून समाधानकारकपणे वर्गीकरण होऊ शकले नाही याला कारण लोकगीतांची सर्वसमावेशकता, त्यातील वर्ण्य विषयाची व्यापकता आणि विविधता लोकगीतांचे

वर्गीकरण करताना काही तत्त्वे गृहीत धरणे आवश्यक आहे आणि त्या आधारेच लोकगीताचे वर्गीकरण करता येईल. ही तत्त्वे सामान्यत: पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रादेशिकता
२. लोकगीते गाणारे
३. जातीयता
४. वयाची अवस्था
५. समाजजीवन
६. विधी

लोकगीतांचे वर्गीकरण करतांना वरील तत्त्वांचा आधार घेतला तरी त्यात उणीवा राहणारच. प्रादेशिक तत्त्वावर लोकगीतांचे वर्गीकरण करताना शहरी विभागातील लोकगीते, ग्रामीण भागातील लोकगीते आणि दऱ्याखोऱ्यातून, रानावनातून राहणाऱ्या आदिवासी, वन्यजमातीची लोकगीते असे वर्गीकरण आपल्याला करता येईल. पण या वर्गीकरणालाही काही मर्यादा पडतातच. लोकगीते म्हणणाऱ्याच्या आधारावर वर्गीकरण करू जाता पुरूषांची लोकगीते आणि स्त्रियांची लोकगीते असे वर्गीकरण करण्याचा एक प्रयत्न केला जातो पण समाजजीवनात भटक्या जमाती ज्याना आपण फिरस्ती म्हणून उदा. वासुदेव, रायंदर, पांगूळ, नंदीबैलवाले. या फिरस्त्यांच्या लोकगीतांचा प्रश्न शिल्लक उरतोच. जातीय तत्त्वाधारे लोकगीतांचे वर्गीकरणात लमाण्याची, भिल्लाची, आंधाची, मातंगाची, कहाराची, वैद्युची, कैकाडी, घिसाडी, बेलदार इत्यादी जाती-जमातींच्या लोकगीतांची विविधता व त्यातील गुंतागुंत पाहू जाता असे वर्गीकरण शास्त्रशुद्ध होईल असे सांगता येत नाही. व्यक्तीच्या वयाच्या वेगवेगळ्या अवस्था लक्षात घेऊन त्यांच्या आधारे लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो पण लोक-साहित्याचा अभ्यास करताना हेही वर्गीकरण अपुरेच पडते. लहान मुलांची बडबडगीते, तरुणीच्या खेळातील फुगडी, झिम्मा इत्यादीची लोकगीते असे वर्गीकरण साह्यभूत ठरू शकत नाही. समाजजीवनात काही संस्था–परंपरेने चालत आलेल्या लोकगीतांची जपवणूक करताना दिसतात. लोकसंस्कृती आणि लोकाविष्कारांचे पारंपरिक दर्शन घडविणाऱ्या या संस्था म्हणजे वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, भराडी इत्यादी होत. याशिवाय ललित, कीर्तन आणि विधीनाट्य इत्यादी माध्यमातूनही लोकगीतांचे आदान-प्रदान चालू असतेच. या लोकप्रकटन संस्था आपल्या लोकगीतातून लोकजीवनाचा आविष्कार घडवित असतात. लोकगीतांचे या संस्थाच्या आधारे वर्गीकरण करू जाता गुंतागुंत अधिक प्रमाणात जाणवते. विधीच्या आधारे लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचा काही अभ्यासकानी प्रयत्न केला आहे. जन्म, लग्न, मर्तिक इत्यादी विधीप्रसंगी म्हटली जाणारी लोकगीते या वर्गीकरणात मोडतात.

उपासनागीते, स्त्रीगीते, बालगीते, पोवाडे या प्रकारातही लोकगीतांचे वर्गीकरण काही अभ्यासकानी केले आहे.


दुर्गा भागवत यांनी अलेक्झांडर क्रॉपने लोकगीतांचे अंतरंग आणि बहिरंग यासंबंधी व्यक्त केलेल्या लक्षणावरून पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.[४]

अ. प्रणयगीते
ब. नृत्यगीते
क. विलपिते
ड. श्रमगीते
इ. स्त्रियांचीगीते
ई. विधिगीते
उ. विनोदीगीते

क्रॉपने लोकगीताचे केलेले वरीलप्रमाणे वर्गीकरण बरेचसे शास्त्रीय असले तरी काही लोकगीते या वर्गीकरणाहून भिन्न आढळतातच.

सारांश, लोकगीताचे स्वरूप, त्यातील आशय, अभिव्यक्ती, लोकगीते म्हणणाऱ्या व्यक्ती, लोकगीते ज्या विधीशी, प्रसंगाशी संबंधित असतात त्या विधी आणि रचनाविशेष यांचा विचार करूनच लोकगीतांचे वर्गीकरण करता येते.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी पुढीलप्रमाणे लोकगीताचे वर्गीकरण मांडून दाखविले आहे.[५].



डॉ. प्रभाकर मांडे यानी लोकगीतांचे केलेले हे वर्गीकरण लोकगीताच्या स्वरूप विश्लेषनावर अधिक प्रकाश टाकणारे असेच आहे. लोकगीतांचा बराचसा भाग या वर्गीकरणात येऊ शकतो. त्यामुळे त्याचे हे वर्गीकरण मान्य करण्यास हरकत नसावी.

स्त्रिया आणि लोकगीते

भारतीय लोकगीतांचा अणि मराठी लोकगीताचा अभ्यास करू जाता लोकगीतांच्या निर्मितीमध्ये आणि लोकगीत म्हणणाऱ्या मध्ये पुरूषापेक्षा स्त्रियांचा सहभाग अधिक असल्याचे आढळते. लोकगीतात स्त्री गीतांचाच भरणा अधिक आढळतो. मराठी लोकगीतात स्त्री जीवनाचा आविष्कार करणारी, स्त्रियानी म्हणावीत अशा लोकगीतांची संख्या विपुल प्रमाणात आढळते याला कारण वर्षानुवर्षे स्त्रियामध्ये लोकगीते मौखिक स्वरूपात आली. सण, उत्सव, रूढी, रीतिरिवाज यामध्ये स्त्रियांच्या लोकगीताना विशेष स्थान आहे. अशी लोकगीते कित्येक शतकापासून स्त्रीमन जतन करीत आले आहे. स्त्रीमनातील भावविश्वाची अभिव्यक्ती त्यांच्या लोकगीतातून व्यक्त झालेली प्रकर्षाने जाणवते.

मराठी लोकगीतात जात्यावरच्या ओव्यांची संख्या कितीतरी विपुल प्रमाणात आढळते आणि या ओव्यात आशय, भाव-भावना आणि वर्ण्य विषय यादृष्टीने विविधता आढळते. लोकगीतांचा अमूल्य खजिना जतन करून त्यात भर टाकण्याचे श्रेय पुरूषापेक्षा स्त्रियाकडे अधिक जाते असे म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये असे वाटते.

लोकगीतांची मौखिक परंपरा

लोकगीतांची निर्मिती अशिक्षितातच होत असल्याने लोकगीते मौखिक स्वरूपात आढळतात. मौखिक परंपरेने लोकगीतांचे आदान-प्रदान होत असते आणि हे आदान-प्रदान होत असतानाच लोकगीतांची जडण घडण होत असते. त्यातूनच ती विकसित होत असतात. लोकगीते ही कोणा एकाच्या मालकीची नसून ती सामूहिक असल्यामुळे त्यात परिवर्तन होत असते. त्यात लवचिकपणा असतो आणि हे परिवर्तन, हा लवचिकपणा, ही जडण घडण होण्यास लोकगीतांची मौखिक परंपराच मदत करीत असते. मूळचा गाभा कायम ठेऊन बदलत्या प्रवाहात त्यावर वेगळा साज शिणगार घालण्याचे कामही या मौखिक परंपरेत घडत असते.

प्रश्नोत्तररुपी लोकगीते

प्रश्नोत्तरे हाही लोकगीतांचा एक विशेष आहे. अशी लोकगीते द्वंद्वगीतासारखी असतात. अशी लोकगीते आणि नृत्य यांचा जवळचा संबंध असतो. 'घोडा-बैल संवाद', 'छकडा', 'बोडक्या' ही मराठी लोकगीतांची उत्तम उदाहरणे या प्रकारच्या लोकगीतांची देता येतील. अशा लोकगीतातून कधीकधी अध्यात्मिक विषयांचीही गुंफण झालेली

दिसते आणि ही लोकगीते मग 'कूटा'चे रूप धारण करतात. प्रश्नोत्तररूपी लोकगीतात पहिल्या चरणात प्रश्न आणि दुसऱ्या चरणात त्याचे उत्तर असते किंवा पहिले कडवे प्रश्नरूप असते आणि दुसरे कडवे त्याच्या उत्तराचे असते. अशा प्रकारच्या लोकगीतातून 'नाट्य' आणि 'जिज्ञासा' हे विशेष प्रकर्षाने जाणवतात. एक उत्तम संवादाचे उदाहरण म्हणून पुढील लोकगीत देता येईल.

बैल : अरे अरे घोड्या, ज्ञानमोड्या
कसं बोलावं तुला ?
ज्या येळंला शंकर गेले गिरजा परणायला
तवा साज कैसा केला ?
नवलक्ष चंद्र तारा, खिळं हो मूठाला
माझा साज पाहून राजा दक्षत भुलला
काय सांगू घोडम्या तुला ?

घोडा : महाराणाच्या ठायी, शिपायी भिडलेत येऊन
रण वाढविले घोड्यानं, खड्ग बाजे खण खण
एकमेकाचे घेती हो प्राण
तेथे बैलाला पुसतो कोण
अरे अरे बैला, काय सांगतो भूषाण
तुझ्या अंडाच्या गोट्या चोळल्या मांगान
तू माजला म्हणून, तुझे वरचे दात पाडले शंकरान ॥

संवादात्मक आणि प्रश्नोत्तररूपी अशी लोकगीते मनोरंजन, बोध आणि नाट्य या विशेषांनी बहरलेली आढळतात.

लोकगीतांची रचना

लोकगीते विविध प्रकारची असल्यामुळे त्यांच्या रचनेतही विविधता पाहवयास मिळते. लोकगीते विविध प्रकारे गायिली जातात. काही लोकगीते विविध टापूत प्रचलित असल्याने त्यावर त्या त्या विभागातील बोलीचाही परिणाम झालेला दिसतो. तेव्हा लोकगीताची रचना पाहू जाता त्यात विविधता दिसून येते. गेयता व लय येण्यासाठी काही शब्दावर जोर देऊन दीर्घ उच्चार व लांब स्वर धरून पुढल्या शब्दाशी त्याचा धागा जोडावा लागतो आणि असे केले तरच ते गीत गाता येते. उच्चार सौकर्यासाठी व गीतातील भाव स्पष्ट व्हावा म्हणून लोकगीतांची मांडणी गाणारा आपल्या सोयीप्रमाणे करतो.

काही काही लोकगीतात प्रत्येक चरणात ७ + ८ = १५ अक्षरे व २२ मात्रा आढळतात तर काहीत १४ ते १८ अक्षरे व २६ ते ३० मात्रा आढळतात. गीताच्या

दोन चरणात बहुतेक यमक साधलेले असते. लोकगीताच्या चाली सोप्या, सरळ व तालबद्ध असतात.

लोकगीतात ध्रुवपदाला फार महत्त्व असते. बऱ्याच लोकगीतांची सुरूवात ध्रुवपदाने सुरू होते आणि याच ध्रुवपदाची पुढे गीतात पुन्हा पुन्हा आवृत्ती होत राहते. लवचिकपणा हाही लोकगीत रचनेचा एक विशेष सांगता येईल. लोकगीतात लवचिकपणा असला तरी त्याच्या कडव्याच्या बांधणीतील सर्व घटक एकमेकाशी व्यवस्थित बांधलेले असतात.

लोकगीतातील ओव्या

मराठी लोकगीतात स्त्रीगीतांची संख्या विपुल प्रमाणात आढळते. स्त्रीगीतांचे हे दालन समृद्ध आहे. स्त्री ही स्वभावाने पुरूषापेक्षा हळुवार, संवेदनाक्षम व भावनाप्रधान असल्यामुळे तिचे जीवन भावसंकुल असते. आपल्या जीवनातील भावनाविष्कार करण्यासाठी तिने ओवी हा साधा, सुटसुटीत प्रकार निवडावा हे साहजिकच आहे. स्त्रीजीवनाचा सहजरम्य आविष्कार आपल्याला या ओव्यातून पाहवयास मिळतो. अशा या ओव्यांचे वर्गीकरण त्यातील आशयाच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे करता येते.

१. देवादिकाविषयीच्या ओव्या : यात पंढरपूरच्या, रामाच्या, पांडवाच्या, तुळशीच्या, सूर्यनारायणाच्या व साधुपीरासंबंधीच्या ओव्यांचा समावेश करता येतो.

२. कौटुंबिक जिव्हाळ्याच्या, नातेसंबंधावर आधारित ओव्या : यात आई, वडील, भाऊ, बहिण, पति, बाळ, मामा, भावजय आणि व्याही–विहिणी यांच्याविषयीच्या ओव्यांचा समावेश होतो.

३. पौराणिक घटनावर, कथावर, प्रसंगावर आधारित ओव्या :

४. समाजजीवनावर आधारित ओव्या : यात सामाजिक आचार-विचार, रूढी, प्रथा इत्यादी विषयीच्या ओव्यांचा समावेश होतो.

५. संकीर्ण ओव्या : यात उपदेशपर, अलंकार, नदी इत्यादी विषयावरच्या ओव्यांचा समावेश होतो.

असे पाच वर्ग या ओव्याचे स्थूलमानाने करता येतात. अर्थाच्या दृष्टीने प्रत्येक ओवी स्वयंसिद्ध असते. प्रत्येक ओवीला स्त्रीजीवनातील हृद्य प्रसंगाचा स्पर्श झालेला जाणवतो. ओवीतील सहजता आणि सोपी रचना लक्षणीय आहे.

लोकगीते आणि बोलीभाषा

लोकगीते लोकजीवनातूनच आविष्कृत होत असल्याने त्या त्या लोकभाषेचा प्रभाव त्या त्या लोकगीतावर पडलेला पाहवयास मिळतो. लोकगीते लोकसमूहाच्या बोलीतच असतात आणि बोलीभाषेची प्रवृत्ती स्वतंत्र अशी असते. बोली मौखिक असल्यामुळे

प्रमाणभाषेची बंधने तिच्यावर मर्यादा घालू शकत नाही आणि त्यामुळेच तिच्यात आपल्याला चैतन्य दिसते. लोकगीते लोकसमूहाची सामुदायिक अभिव्यक्ती असल्यामुळे त्या समूहाच्या बोलीतूनच ती साकार होतात. लोकगीते बोलीभाषेतून साकार होत असल्याने ती सर्वसामान्यजनाच्या हृदयाला स्पर्श करतात.

लोकगीतांची भाषा सोपी असते. ही भाषा लोकजीवनात प्रचलित असल्याने ती जिवंत भाषा वाटते. लोकगीताच्या भाषेची जोपासना, जडण घडण परंपरेने होत असल्याने भाषेचे प्राचीन अवशेष त्यातून पाहवयास सापडतात. लोकगीतातील शब्द प्रत्यक्ष 'चालते बोलते' आहेत. लोकजीवनात रूढ झालेले, नेहमी वापरात असलेले व लोकजीवनातून साकार झालेले अर्थपूर्ण शब्द लोकगीतात गोडवा व आत्मियता निर्माण करतात.

लोकगीते बोलीभाषेतून आकारास येत असल्यामुळे त्यातून प्रादेशिक बोलीभाषेचे विशेष प्रत्ययास येतात. बोलीभाषेतील प्रत्येक शब्दांना लोकजीवनातील अर्थ प्राप्त होऊन वेगळेपण मिळते आणि वैभवसंपन्न बनते. नागरी भाषेतील ताठरपणा तिच्यात नसल्यामुळे लोकगीतांची भाषा अधिक जीवंत वाटते आणि यामुळेच लोकगीते डौलदार व घाटदार झालेली दिसतात.

लोकगीतांचे विशेष

लोकगीतांच्या स्वरूपाविषयीचा अभ्यास करताना लोकगीतातील अनेक विशेष आपल्या लक्षात येतात. वर्ण्यविषय, आशय आणि अभिव्यक्ती यादृष्टीने लोकगीतांचे प्रमुख विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. मौखिक परंपरेने चालत आलेली लोकगीते अनामिकांची असतात.
२. लोकगीते गाता येतात. त्यांच्या चाली परंपरेने चालत आलेल्या असतात.
३. लोकगीतात स्त्रीगीतांची संख्या विपुल प्रमाणात आढळते.
४. ओवीगीते स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहेत.
५. लोकगीतात सतत पवरिर्तन होत असले तरी मूळचा गाभा कायम असतो.
६. लोकगीतातून लोकजीवनाचा आविष्कार झालेला असतो.
७. लोकगीते कालातीत असतात.
८. लोकगीते मंत्रात्मक असतात.
९. लोकगीतात संबंध विधीशी असतो.
१०. लोकगीतात विविधता आढळते.
११. लोकगीते नृत्य, नाट्य, खेळ यांच्याशी अभिन्नपणे जोडलेली असतात.
१२. लोकगीते जीवनस्पर्शी असतात.
१३. लोकगीतात काही संकेत आढळतात.
१४. रचनेच्या दृष्टीने लोकगीतात यमक साधलेले असते.

१५. लोकगीताना त्यातील भाव, कल्पना, अलंकार आणि अर्थ यादृष्टीनी वाङ्मयीन मूल्य प्राप्त होते.

१६. लोकगीते प्रश्नोत्तररूपी आढळतात.

१७. लोकगीतातील वर्ण्य विषयावर पौराणिक घटनांचा प्रभाव पडलेला पाहवयास सापडतो.

१८. लोकगीतातून बोलीभाषेची वैशिष्टये दिसतात.

१९. लोकगीतातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

२०. लोकगीतांची भाषा चालती बोलती असते.

लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्य

लोकजीवनाच्या भावविश्वातून साकार झालेली लोकगीते वाङ्मयीन मूल्यानी संपन्न असलेली दिसतात. त्यातून भाषेच्या सौष्ठवा बरोबरच सौंदर्याचे दर्शन घडते. लोकगीतातील कल्पनेची क्षेप आणि भावविश्व मनाला मोहून टाकते. मराठी लोकगीताच्या बाबतीत तर त्यातील गोडवा आणि रसाळपणा इतरत्र क्वचितच सापडेल.

प्रस्तुत प्रकरणात लोकगीतातील वाङ्मयीन मूल्याचा शोध मराठी लोकगीतांच्या आधारे घेण्याचा प्रयत्न केला आहे. सौंदर्य, कल्पना, भावनाविष्कार आणि लालित्य ही प्रमुख वाङ्मयीन मूल्ये नजरेसमोर ठेऊन लोकगीतांचा विवेचक अभ्यास येथे करण्याचा प्रयत्न केला आहे. आपले श्रम हलके होण्याकरिता व मनाला विरंगुळा मिळण्याकरिता काही लोकगीतांची निर्मिती झालेली असते पण कधी कधी त्यात हिऱ्यासारखे चमकदार खडे सापडतात. लोकगीतातील प्रतिमादृष्टीही मनोहारी असल्याचे प्रत्ययास येते. थोर कवीच्या काव्यात आढळणारे वाङ्मयीन मूल्ये आपल्याला लोकगीतात आढळतात. त्यांच्या काव्यापेक्षा लोकगीते काही कमी दर्जाची नाहीत. उलट लोकगीते भाषासौंदर्याने भावसौंदर्याने, रसरंगाने आणि कल्पना विलासानी नटलेली दिसतात.

लोकगीतातील सौंदर्य

लोकगीतांचा आस्वाद घेताना आपण त्यातील विविध सौंदर्याने मोहून जातो. हे सौंदर्य भाषेचे, त्यातून व्यक्त होणाऱ्या भावनांचे अणि अर्थाचे तसेच कल्पनांचे असे असते.

सारजा सखी उठ कोंबडा बाग देते
गोठ्यातील गायमाय बोलाया हंबरते ॥

सारजा तुही माही सखी नांदो पृथ्वीवर
चांद सुर्या भाऊ तुझे आन मह्या घरावर ॥

या लोकगीतातील भाषा, शब्द योजना, अर्थ, लालित्य आणि त्यातील प्रसाद गुण यांचा मनोहारी मिलाप आपल्याला मोहून टाकतो. लोकगीतातील भाषेचे सौंदर्य संपन्न आहे. समर्पक शब्दाना जीवनाचा स्पर्श झाला असल्यामुळे ते जिवंत व अर्थपूर्ण वाटतात. लोकगीतातील सौंदर्य स्वयंसिद्ध असून त्यातील भावविश्व अनुपम आणि अर्थपूर्ण असते.

लोकगीतांची भाषा जिवंत असते कारण जानपदाची ही भाषा. तिच्यात अस्सल-पणाचा गोडवा असतो आणि ही भाषा त्यातील अर्थ संपन्न करण्यात कशी समर्थ असते हे पुढील ओवीवरून स्पष्ट होईल.

आपण दोघी बहिणी, दोन गावच्या बारवा
मध्ये चंदन हिरवा ।।

हीच कल्पना वेगळ्या शब्दात व्यक्त केलेली दिसते ती अशी

आपण दोघी बहिणी, दोन गावच्या नया
मध्ये झिरा पाणी पिया ।।

अर्थपूर्ण शब्द हे लोकभाषेचे प्रमुख वैशिष्ट्ये लोकगीतातही पाहवयास मिळते. सारांश, लोकगीतांची भाषा संपन्न आणि त्यातील आशय सहज आणि रमनीयपणे उकलून दाखविणारी असून जिवंतपणा हे तिचे प्रमुख लक्षण आहे.

लोकगीतातील भाव-सौंदर्य

मराठी लोकगीतातून मानवी जीवनातील विविध भावछटाचे मनोहारी व हृदयंगम दर्शन घडते. मराठी लोकगीतात स्त्रींगीतांची संख्या विपुल असल्यामुळे स्त्रीजीवनातील सुखदुःखाच्या, प्रणयाच्या, वात्सल्याच्या भावना लोकगीतातून हळुवार व्यक्त होतात. तर काही लोकगीतातून पुरूषार्थाचे दर्शन घडते. लोकगीतातील भावविश्व जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेले दिसते. बहिणीची भावावरची माया लोकगीतातून व्यक्त होते, तर कधी आपल्या 'माय बापा' बद्दलची कृतज्ञता दिसते, आपल्या सोनुल्याचे वात्सल्यपूर्ण रेखाटनही लोकगीतातून पाहवयास मिळते. तर पतीविषयीची नाजुक, साजुक प्रेमभाव-नाही लाजत व्यक्त होताना दिसते. देवाबद्दलची श्रद्धा ही स्त्रीगीतातून व्यक्त झाल्या-शिवाय राहत नाही.

लोकगीतातील प्रत्येक शब्द त्यातील भावनेने ओलाचिंब झालेला दिसतो आणि म्हणूनच लोकगीते हृदयस्पर्शी वाटतात.

परमेश्वराविषयीची अंतरीची श्रद्धा किती उत्कटतेने पुढील ओवीतून व्यक्त होते-

विटेवरी उभा, युग झाले अठ्ठाविस
सावळ्या इठलाला कुणी म्हणेना खाली बस ।।

तर पुढील ओवीत सूचक अर्थ किती सार्थपणे व्यक्त केला आहे–

भरत शत्रुघन ऱ्हायला मामीयाच्या घरी
सपन पडलं भारी, दशरथ नाही गादीवरी



आणि या ओवीतील भावना आणि प्रसंग किती अर्थपूर्ण !

एवढा वनवास, सीतं सारखं सयीला
लहु अंकुशाच्या येळी, डोई धुतली नदीला ॥

लोकगीतातून किती अर्थपूर्ण अर्थ सूचविता येतो हे पुढील ओवीत दिसते.

रुक्मिणीला साडी, सत्यभामाला लुगडी
दारी तुळस उघडी ।

'दारी तुळस उघडी' हे चरण पतिव्रतेची स्थिती सूचित करण्यासाठी किती समर्पकपणे योजिले आहे. अशा सूचक अर्थाची अनेक उदाहरणे लोकगीतात आढळतात. लोकगीतात स्त्रीगीतांची संख्या विपुल आढळते. जिव्हाळा या स्त्रीगीतांचा स्थायीभाव आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. स्त्रीगीतातील प्रत्येक ओवीला जिव्हाळ्याचा स्पर्श झालेला आहे.

पुढील ओव्या जिव्हाळा व्यक्त करणाऱ्या म्हणून उदाहरणासाठी देता येतील–

गोता मंदी गोत, काय करायचं गोताला
एका माऊली वाचूनी, कुणी धरीना हाताला ॥

या ओवीतून आणि पुढील ओवीतून लेक आपल्या आईची माया व्यक्त करते. आपल्या माऊलीबद्दलचा जिव्हाळा किती समर्थपणे ती व्यक्त करते–

जीव माझा गेला, सरण जळतय् सावलीला
दुःख झाले माझ्या माऊलीला ॥

अशा असंख्य ओव्या त्यातील भावसौंदर्याने नटलेल्या आपल्याला दिसतात.

लोकगीतातील कल्पना सौंदर्य

लोकगीतातील कल्पनेची झेप पल्लेदार आणि रम्य आहे. थोर कवींच्या काव्यात आढळतात त्या तुलनेत लोकगीतातील कल्पना काही कमी दर्जाच्या नाहीत. या कल्पना आकर्षक आणि अर्थपूर्ण आहेत.

'शिराळ शेठ' या लोकगीतातील पुढील कल्पना उपमा-उपमेय अलंकारांशी नटून अर्थपूर्ण झालेली दिसते.

देखली ही नार, हिज परमाणं
जशी पेटली हुवई, लावला अग्न

आणि याच गीतातील पुढील कल्पना

मैनंच चांगुलपण, गारंच्या पोटी
जन्मली हिऱ्याची खाण ॥

स्त्रीसौंदर्याचे वर्णन करण्यास समर्थ असल्याचे पटते. कधी कधी लोकगीतातील कल्पनासौंदर्य शाहीरी थाटणीचे असल्याचे आढळते. एखाद्या सुवर्णकारागिराने अलंकारात मोठ्या कौशल्याने हिरकण्या बसवून त्या अलंकाराचे सौंदर्य वाढवावे तशीच कलाकुसर पुढील लोकगीतातून आपल्याला आकर्षित करते– .

मैनानं केला सीणगार, उंची गजघाट
आंगी सत्वाची चोळी, कास बळकट
नेसली शालूची घटी, रेशीम काठ
माथ्यावर चंद्रसुर्वे, तारा तुट

आणि याच लोकगीतातील पुढील चरण–

हिचे दात दिसे दाळिंब, तांबडे ओठ
गळ्यात मोहन माळ, केवळ कंठ
नाजुक जाईच्या कळ्या, मैनाची बोट
जस केळीच सोपट, मैनाचं पोट

लोकगीतातील कल्पनेची झेप किती उंच आणि सार्थ आहे याची साक्ष देते.

लोकगीतातील प्रतिमासृष्टी

लोकजीवनाचा आविष्कार करणाऱ्या लोकगीतातील प्रतिमासृष्टी आकर्षक, नयनरम्य आणि अर्थपूर्ण आहे. लोकगीतातील प्रतिमा या लोकजीवनातीलच आहे. लोकजीवनातील अनुभवांची परंपरा या प्रतिमांच्या मागे आहे.

उगवले नारायण, उगवता दिसती लाल
पांघरली कोरी शाल, वरी जरीचा रुमाल

'कोरी शाल' 'जरीचा रुमाल' या प्रतिमा सूर्याचे तेज अर्थात पहाटची कोवळी किरणे या अर्थाने येथे वापरल्या आहेत. अर्थाच्या दृष्टीने लोकगीतांतील प्रतिमा किती सार्थ आहेत याचे जिवंत उदाहरण म्हणून पुढील ओवी पहा–

पयली माझी वयी ग, मायंच्या मायला
लोढणं वढाळच्या गायीला ॥
दुसरी माझी वयी ग, मायच्या बापाला
दोडकं लोवतं कुपाला ॥

यातील 'लोढण' 'दोडकं' या प्रतिमा अत्यंत साध्या असल्या तरी अर्थाने त्या ओतप्रोत भरून ओसंडताना दिसतात.

दोन बहिणीसाठी वापरलेली नद्याची, बारवाची प्रतिमा आणि भावासाठी झरा आणि चंदन या प्रतिमा अशाच अर्थपूर्ण आहेत. लोकगीतातून दिसणारी प्रतिमासृष्टी लोकजीवनातून साकार झालेली आहे. लोकगीतातील प्रतिमासृष्टी हा विषय स्वतंत्रग्रं थाचा होण्याइतपत मोठा आहे. येथे फक्त या प्रतिमासृष्टीचा ओझरता विचार केला आहे. लोकगीतातील काही प्रतिमा पुढीलप्रमाणे आहेत.

चांदा (चंद्र) = भाऊ
चांदणे = भावजय
हिरवा चंदन = भाऊ

लाल पिंजरीचा कुंकू, कंबरपट्टा, चिपाट, पिवळ हाडूळ सोनं
डोईचा मंदिल, शिंगी, चांद सुर्वे, शेवंतीच्या जाया,

अशा अनेकविध प्रतिमा लोकगीतात पाहवयास मिळतात.

० ० ०

संदर्भ

१. ना. रा. शेंडे : लोकसाहित्य संपदा पृ. ४२
२. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. ३७५
३. डॉ. सरोजिनी बाबर : मराठीतील स्त्रीधन
४. दुर्गा भागवत : उनि पृ. ३७८
५. डॉ. प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे स्वरूप पृ. २६२.

५. लोककथागीते : स्वरूप विशेष

- लोककथागीत म्हणजे काय ?
- लोककथागीतांचे स्वरूप
- आंधाचे 'दिंडार'
- लोककथागीतांचा विकासक्रम
- लोककथागीतांचे गायक
- लोककथागीतांचे वर्गीकरण
- कौटुंबिक व सामाजिक लोककथागीते
- पौराणिक कथागीते
- भगतांची देवताविषयक कथागीते
- पोवाडे
- ओवी आख्याने
- इतर लोककथागीते
- लोककथागीतांचे विशेष

लोककथागीत म्हणजे काय ?

मराठीत आढळणाऱ्या लोकगीतांचे स्थूलमानाने पुढील दोन प्रकारात वर्गीकरण करता येते.

१. कथाविरहित लोकगीते
२. लोककथागीते

कथात्मकता नसलेल्या लोकगीतांचे स्वरूप आपण यापूर्वीच्या प्रकरणात पाहिले आहे. प्रस्तुत प्रकरणात मराठी लोककथागीतांच्या आधारे लोककथागीतांच्या स्वरूपाचा व विशेषांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

लोककथागीतासाठी लोकगीतकथा, पोवाडा, लोकगाथा आणि लोककथागीत हे शब्द प्रचलित आहेत. महाराष्ट्रात बरीचशी लोककथागीते पोवाडे या सदरात मोडतात पण पोवाडे म्हणजेच लोककथागीते असे आपल्याला म्हणता येत नाही कारण 'पोवाडा' या लोककथागीतातून वीरांच्या कथा गायिलेल्या आढळतात, श्रेष्ठ पुरुषांच्या किंवा

पराक्रमी व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाच्या, शौर्याच्या प्रसंगावर आधारित कथागीते पोवाड्यात ऐकावयास मिळतात. लोककथागीतांचा पोवाडा हा एक प्रकार आहे असे आपल्याला म्हणता येईल.

कथागीतासाठी इंग्रजीत Ballad हा शब्द रूढ आहे. Ballare या लॅटिन भाषेतील शब्दापासून Ballad असा शब्द रूढ झाला असावा. Ballare या लॅटिन शब्दाचा अर्थ नृत्य करणे असा आहे. लोककथागीतांचे स्वरूप पाहू जाता नृत्य आणि कथागीते यांचा संबंध आपल्या लक्षात येतो. नृत्याच्या साथीने गायिल्या जाणाऱ्या कथागीताना Ballad हा शब्द उययोगात आणीत. आजही आपल्याला काही लोककथागीताना नृत्याची साथ असल्याचे दिसते. पाश्चात्य देशात लोककथागीतासाठी Ballad हा शब्द रूढ असल्याचे दिसते. भारतात कथात्मक लोकगीतासाठी विशिष्ट अशी संज्ञा प्रचलित नाही. प्रस्तुत प्रकरणात लोककथागीते हाच शब्द कथात्मकगीतासाठी योजिला आहे.

लोककथागीतांचे स्वरूप आणि विशेष यावर प्रकाश टाकण्याचा अनेक लोकसाहित्याच्या अभ्यासकानी प्रयत्न केला आहे. लोककथागीतांचे विशेष आणि स्वरूप पाहू जाता या अभ्यासकांच्या व्याख्यांचा विचार करणे हितावह होईल असे वाटते. लोककथागीतावर प्रकाश टाकणाऱ्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

- "लोकसमूहात मौखिक रूपाने प्रचलित असलेले वर्णनात्मक आणि निवेदनात्मक गीते म्हणजे लोककथागीते होत."

  —फ्रँक सिजविक

- "समाजातील लोकप्रिय आख्यान प्रभावी आणि प्रत्ययकारी स्वरूपात ज्या गीतात सांगितलेले अशा स्फूर्तिदायक गीताला लोककथागीत म्हणतात."

  —डॉ. मरे

  डॉ. मरे यांनी इंग्रजीत प्रचलित असलेल्या Ballad या लोककथागीतांचे विशेष स्पष्ट करताना लोककथागीताची केलेली ही व्याख्या त्यातील आशयावर व अभिव्यक्तीवर प्रकाश टाकणारी आहे.

- जी. एल. किटरेज यांच्या विचारानुसार गीतांच्या माध्यमातून सांगितलेल्या कथेस लोककथागीत म्हणतात. आपल्या व्याख्येतून किटरेज यांनी लोककथागीतातील गीतात्मकता आणि कथात्मकता या दोन प्रमुख विशेषांचा उल्लेख केलेला आढळतो.

- "लोककथागीत हे गायनानुकूल कथागीत असते व ते सामूहिक नृत्याशी संबंधित असते. अशा कथागीताना मौखिक परंपरा असते."

  —गुमेर एफ. बी.

- प्रसिद्ध अमेरिकन लोकसाहित्य विशारद मॅक एडवर्डलीच Ballad ची व्याख्या देताना प्रबंधात्मक किंवा आख्यानात्मक लोकगीताचा प्रकार असे वर्णन लोककथागीताचे करतात.
- इन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकात पुढीलप्रमाणे लोककथागीताची व्याख्या दिलेली आहे–

"लोककथागीत ही एक अशी पद्यशैली आहे की ज्याचा निर्माता अज्ञात असून ज्यात एखादे आख्यान वर्णिलेले असते. जी मौखिक परंपरेने प्रचलित असून ज्यात ललितकलांच्या सूक्ष्मतेचा अभाव असतो."

लोकसाहित्य विशारदांच्या वरील व्याख्यांचा अभ्यास करू जाता आपल्याला लोककथागीतांचे पुढील विशेष लक्षात येतात.

१. लोककथागीत हे कथात्मक असते.

२. त्याचा निर्माता अनामिक असतो.

३. त्याच्या पाठीमागे मौखिक परंपरा असते.

४. गेयता हे लोककथागीताचे अविभाज्य घटक होय.

५. लोककथागीत साधे आणि अनलंकृत असते.

६. लोककथागीतांना नृत्याची साथ असते.

लोककथागीतांचे स्वरूप

लोककथागीतांच्या वरील विशेषांच्या आधारे व मराठीत उपलब्ध असलेल्या लोककथागीताच्या आधारे लोककथागीतांचे स्वरूप आपल्या लक्षात येऊ शकते. लोकगीते जगातील सर्वच देशात म्हटली जातात. या लोकगीतात काही समान विशेष सर्वत्र दिसतात. लोककथागीतांच्या बाबतीतही सर्वत्र गायिल्या जाणाऱ्या लोककथागीतातून काही समान विशेष आपल्याला आढळतात.

मौखिक परंपरेतून चालत आलेले लोककथागीत हे कथात्मक व गीतात्मक असून त्याला नृत्याची साथ असते हे प्रमुख लक्षण लोककथागीताचे आहे हे आपण पाहिले. अशा लोककथागीताचे स्वरूप पाहू जाता पुढील काही बाबी या संदर्भात आढळून येतात.

१. लोककथागीताचे स्वरूप आपोआप ठरत असते.

२. प्रामुख्याने लोककथागीत गाण्याच्या तीन अवस्था आढळतात त्या अशा :

प्रारंभ मध्य आणि शेवट. या तीन अवस्थेमधून लोककथागीत जात असताना प्रारंभी त्यात संथपणा असतो पुढे त्यातील कथानकाला गति येते आणि शेवटी कथानक संथ बनते.

३. आशय आणि प्रसंग या दृष्टीने लोककथागीतात सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तीचा संघर्ष दर्शविलेला असतो.

४. परस्परविरोधी पात्रांचे आयोजन कथागीतातून केलेले आढळते. मूर्ख राजा त्याचा हुशार वजीर, लहान मूल आणि बलाढ्य राक्षस, दुष्ट राजा त्याचा सुस्वभावी पुत्र असे परस्परविरोधी पात्रे आणि त्यांच्या संघर्षातून गति घेणारे कथानक लोककथागीतातून विकसित होत असते.

५. लोककथागीताचा प्रारंभ नायकाच्या कारुण्यपूर्ण स्थितीने होतो आणि शेवट आनंदी प्रसंगाने होतो.

६. निवेदन आणि गीत यांचा सुंदर मिलाप लोककथागीतात पाहवयास मिळतो.

७. लोककथागीतात नाट्य, संगीत आणि अभिनय यांचा संगम असतो आणि नृत्याची साथ ही या गीताना असते.

८. लोककथागीतांचा उद्देश मुख्यत: मनोरंजन हा असल्याने मधून मधून विनोदाची पखरणही केलेली असते.

९. कथेतील प्रमुख पात्रावर सतत लक्ष केंद्रित केलेले असते.

१०. लोककथागीतात चरणाची पुनरावृत्ती असते.

११. लोककथागीतांचे एक ठरीव रचना तंत्र असते.

आंधाचे 'दिंडार'

लोककथागीतांची ही प्रमुख लक्षणे बहुतेक लोककथागीतातून पाहवयास मिळतात. मराठी लोककथागीताचा अभ्यास करताना वरील लक्षणे आंध या आदिवासी जमातीच्या 'दिढार' किंवा 'दिडारण्' या लोककथागीतात पाहवयास मिळतात. 'दंडारी' हा प्रतिशब्द 'दिढार' या लोककथागीताच्या प्रकारासाठी काही भागात वापरला जातो. या 'दिंडार' बद्दल लिहिताना डॉ. भाऊ मांडवकर लिहितात,

"दंडारी" (दंडधारी) हा एक नृत्याचा प्रकार आहे. यात नृत्यासोबत गीत गायिले जाते. नृत्यगीताच्या या कार्यक्रमात लोक नकलाही करतात."[१]

लोकगीतातील या लोककथागीताचे बीज आपल्याला आंधाच्या या 'दिंडारात' सापडते. 'दिंडार' हा आदिवासींच्या लोकनृत्याचाच एक भाग असला पाहिजे. नृत्यासोबत गीत गाण्याची प्रथा आदिवासीत आहेच. या 'दिंडारा'तील मूळ गीतांचे स्वरूप बदलून त्याना कथागीतांचे स्वरूप आले आहे व आताचे दिंडार म्हणजेच लोककथागीत होय असे म्हणता येते. नृत्य, गीत, नाट्य, कथा यांच्या जोडीला संगीताची साज आजच्या आंधाच्या दिंडाराला लाभली आहे. या दिंडारात कमीतकमी पाच ते सहा पात्रे असतात. कधी कधी पात्रांची ही संख्या दहा पर्यंत जाते. दिंडारातील प्रमुख पात्रे पुढीलप्रमाणे असतात.

१. राजा
२. प्रधान
३. सोंगाड्या
४. निवेदक
५. खलनायक

या पात्रांच्या जोडीला कथानकाप्रमाणें राणी, सरदार इत्यादी पात्रे असतात. मनोरंजन हा मुख्य उद्देश या दिंडाराचा असतो. आंध या आदिवासी जमातीत दिंडाराच्या कलावंताचा एक समूहच असतो. हा समूह म्हणजे एक छोटीशी नाट्यसंस्थाच. सण, उत्सवाप्रसंगी 'दिंडार' करण्याची पद्धती आहे. कधी कधी फुरसतीच्या वेळी लोक-मनोरंजनासाठीही रात्रीच्यावेळी 'दिंडार' 'उभे' केले जाते. स्त्रीपात्रांची कामे पुरूषच करतात. रंगमंच व्यवस्था आणि प्रसंगाप्रमाणे त्यात होणारा दृश्यांचा बदल याची फारशी दखल दिंडारात घेतली जात नाही. तर हे काम निवेदक आपल्या निवेदनाने करतो.

आंधाच्या या दिंडाराला कथानक असते. म्हणजेच हे दिंडार कथात्मक असते. हिंगोली तालुक्यातील आंध या जमातीतील या दिंडाराच्या कथा पौराणिक घटनावर किंवा प्रसंगावर आधारलेल्या आढळतात. इक्कामराजाची कथा, हरिश्चंद्राची कथा, भीमसेनाची कथा, वीरसेनाची कथा, जायाराणीची कथा इत्यादी कथानक असलेले दिंडारातून ऐकावयास मिळाले. निवेदन आणि गीत यांच्या माध्यमातून नाट्यपूर्णरीत्या ही कथा रसिकापुढे दिंडारातून मांडली जाते. रसिकांना कंटाळा येऊ नये म्हणून मधून मधून विनोद आणि उखाणें यांचीही मदत घेतली जाते. असे हे दिंडार रात्रभर चालत असते.

आंधाच्या या दिंडाराचा उल्लेख यासाठीच की लोकसाहित्य विशारदानी लोककथागीतांचे जे विशेष सांगितले त्यातील बहुसंख्य विशेष 'दिंडारात' पाहवयास सापडतात. या दिंडाराच्या माध्यमातून मांडलेल्या लोककथागीतेतील कथाकनात काही कल्पनाबंधही आपल्याला पाहवयास मिळतात. यातील काही कल्पनाबंध पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. दैवामुळे माणूस सुखी किंवा दुःखी बनतो.
२. मानवाचे पक्ष्यात किंवा प्राण्यात रुपांतर होते.
३. निर्जीव वस्तू सजीवाप्रमाणे वागतात.
४. जादूच्या अद्‌भूत घटना.
५. वृक्ष मानवाला त्याच्या कामी सहकार्य करतात.
६. राजाच्या दोन राण्या : एक आवडती दुसरी नावडती.

७. स्त्रियांच्या तोंडून गौप्य स्फोट
८. हुशार प्रधान.
९. शूर राजपुत्र.
१०. सावत्र आई मुलाला छळते.
११. सुष्टांचा दुष्टावर विजय.
१२. राजाचे दगडात रुपांतर होणे.
१३. उडणारे घोडे.
१४. मानवाचे मरण पक्ष्यात असणे.

आंधाच्या या 'दिडारा' वरून आपल्याला लोककथागीतांचे विविध स्वरूप कळते.

लोककथागीतांचा विकासक्रम

लोकसमूहात मौखिक परंपरेने चालत आलेले कथात्मक लोकगीतांचा आपला स्वतःचा असा विकासक्रम असलेला पाहवयास मिळतो. रचनेच्या व विकासक्रमाच्या बाबतीत या लोककथागीताची तुलना महाकाव्याच्या विकासक्रमाशी केली तर ती विसंगत ठरू नये असे वाटते. लोककथागीताचा विकासक्रम पुढीलप्रमाणे देता येतो.[२]

१. मानवाच्या आंतरिक भावनेचा आविष्कार करण्यासाठी सामूहिक नृत्यासह म्हटलेले गीत.
२. आख्यानक नृत्यगीत.
३. आख्यान आणि लोककथागीत.
४. लोककथागीत चक्र.

अशा या लोककथागीताचे मूळ आपल्याला आदिवासींच्या लोकनृत्यात पाहवयास मिळते. मनोरंजनासाठी आदिवासी जमातीत लोकनृत्य करण्याची प्रथा आहे. सुरूवातीस नृत्याच्या साहाय्याने केवळ अभिनयाने एखादी कथा (लहानशी) व्यक्त केली जात असे. पुढे या लोकनृत्याला गीताची साथ मिळाली व त्यानंतर या गीतांना कथेचा आश्रय मिळाला. लोककथागीतात परिवर्तन अपरिहार्य ठरल्यामुळे त्यातील कथा आणि कथेतील पात्रे यात सतत परिवर्तन होत गेले. अनेक कथागीते अस्तित्वात आली आणि लोकसमूहात रूढ झाली.

लोककथागीत आणि महाकाव्य यांची तुलना करता एक मुख्य गोष्ट आपल्या लक्षात येते ती म्हणजे लोककथागीत हे मौखिक असते तर महाकाव्य लिखीत असते. लोककथागीतात सतत परिवर्तन होते तर महाकाव्य स्थिर स्वरूपातच राहतात. लोककथागीत सहजस्फूर्त असून अनलंकृत असतात तर महाकाव्यात पांडित्याचा प्रभाव दिसतो. लोककथागीतात सहजता, स्वाभाविकता दिसते.

लोककथागीतांचे गायक

भारतात लोकगीतांची परंपरा संपन्न आहे. प्राचीन भारतीय ग्रंथात मौखिक परंपरेवर आधारित गीतासाठी गाथा शब्द वापरल्याचा उल्लेख आढळतो. याचाच अर्थ असा की लोकगीतांच्या पाठीमागे कित्येक शतकांची परंपरा आहे आणि भारतात तर ही परंपरा विशेषत्वाने जाणवते. प्राचीन भारतीय ग्रंथात लोक गायकांच्या परंपरेचाही उल्लेख असल्याचे प हवयास मिळतात. समाजाचे नैतिक आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी लोकगायकांची परंपरा अस्तित्वात आली असावे असे वाटते कारण या लोकगायकांच्या गीतातून नितिमत्तेचे पाठ देणारे, उपदेशपर लोकगीतांचा प्रामुख्याने आढळ होतो. प्राचीन काळी आणि आताही काही जातीच्या लोकांचा लोककथागीते गाण्याचा, समाजाची नैतिक पातळी या माध्यमातून उंचावण्याचा आणि या गायनातून आपले पोट भरण्याचा व्यवसाय होता. याचे उदाहरण आजही आपल्याला वासुदेव, गोंधळी, वाघ्ये, पोतराज या लोकगायकांच्या अस्तित्वात असलेल्या संस्थाचा अभ्यास केल्यावर पटते आणि या लोकगायकामुळेच समाजात लोकगीतांचा व लोककथागीतांचा प्रसार होत असते.

प्राचीन भारतात सूत, मागध, चारण, बंदी कुशीलव, वैतालिक भाट आणि जोगी या जातीत लोकगायकांची परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात आणि अशीच लोकगायकांची परंपरा महाराष्ट्रातही प्राचीन काळापासून तो आजतागायत असल्याचे पाहवयास मिळते. महाराष्ट्रात लोकगायकांच्या परंपरेत वासुदेव, गोंधळी, भराडी, पोतराज, जोगती, वाघे, इत्यादी जातीतील लोकगायकांचा समावेश करता येतो. हे लोकगायक पारंपरिक लोककथागीते गाऊन आपले पोट भरताना दिसतात. आजच्या सामाजिक पुनर्रचनेत या जमातीच्या लोकात व्यवसायात थोडासा बदल होत असला तरी त्यांच्यातील लोकगायकांची परंपरा सध्याही चालू असल्याचे दिसते.

या लोकगायकाशिवाय कथागीते गाऊन सर्पदंश उतरविणाऱ्या मांत्रिकाचा एक वर्गही महाराष्ट्रात आढळतो.

याशिवाय आंध जमातीतील लोक 'दिंडारा'च्या माध्यमातून कथागीते म्हणतात. भिल्ल, कहार, कुंभार, उक्कलवार, वैद्यु, कैकाडी, घिसाडी इत्यादी जमातीतील लोक लोककथागीत सण, उत्सवप्रसंगी गाताना दिसतात. नागपंचमीच्या सणाचे दिवशी स्त्रिया फेर धरून गाणी म्हणतात. त्यात काही कथागीतांचाही समावेश असतो. याप्रसंगी मुद्दाम म्हटले जाणारे 'शिराळ शेठ' हे लोककथागीताचे चांगले उदाहरण आहे. भारतात असलेल्या लोकगायकांच्या परंपरेचा हा ओझरता उल्लेख आहे. प्रत्येक जमातीतील लोकगायकांच्या लोककथागीतांचा सविस्तर अभ्यास केला तर या प्रत्येक संस्थेवर छोटासा ग्रंथ तयार होऊ शकतो.

लोककथागीतांचे वर्गीकरण

पाश्चात्य लोकसाहित्य विशारदांनी लोककथागीतांचा शास्त्रीय अभ्यास करून या लोकगीतांच्या विविध पैलूंचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोककथागीतांच्या प्रकाशवर गूमर आणि कीटरेज यांनी अभ्यासपूर्ण टिपणे तयार करून त्यांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

लोककथागीतांचे वर्गीकरण गूमर पुढीलप्रमाणे करतो–

१. प्राचीनतम लोककथागीते
२. कौटुंबिक लोककथागीते
३. पौराणिक लोककथागीते
४. अलौकिक लोककथागीते
५. सीमांत लोककथागीते
६. आख्यक लोककथागीते

या वर्गीकरणाचा सखोल अभ्यास करू जाता आपल्या लक्षात येते की प्राचीनतम लोककथागीते ही समस्याप्रधान असून त्यात पृथ्वी, नक्षत्र, आकाश आणि ऋतू यांच्या विषयीचा आशय आढळतो. तर दुसऱ्या प्रकारात कौटुंबिक जीवनाचे त्यातील नात्याचे चित्रण आढळते. अशा प्रकारची लोककथागीते मला हिंगोली तालुक्यात उपलब्ध झाली असून कौटुंबिक जीवनातील व्यक्तींच्या परस्परसंबंधाचे भावपूर्ण चित्रण या लोककथा-गीतातून केलेले आढळते. 'आईचं काळीज' आणि 'बहिणीनं मारला भाऊ' ही मराठी लोककथागीते या प्रकारचे एक उत्तम उदाहरण म्हणून देता येतात. पौराणिक कथागीते ही दंतकथावर आधारलेली असतात. पौराणिक आख्यानांची गुंफण या लोककथागीतात आढळते. 'श्रावण बाळ', 'चांगुणा', 'इक्कामराजा' ही उदाहरणे या लोककथागीतांची उपलब्ध लोककथागीतांच्या आधारे देता येतात. अलौकिक कथागीतात लोकभ्रम किंवा लोकसमजुतीवर आधारलेले कथानक तसेच जादूच्या घटनेवर आधारित कथानक या लोककथागीतातून पाहवयास मिळते. आंध जमातीत 'जायाराणी' नावाचे या प्रकारातील लोककथागीत गायिले जाते. तर युद्धाच्या कथा सीमांत लोककथागीतात आढळतात. आख्यक कथागीतातून रानावनात घडलेल्या साहसाच्या कथा व नायकाच्या पराक्रमांचे वर्णन या लोककथागीतातून पाहवयास मिळते.

कीटरेज या लोकसाहित्य विशारदाने लोककथागीतांचे दोन भागात वर्गीकरण केले ते असे–

१. लोकगायकांची कथागीते
२. पारंपरिक लोककथागीते

यातील पहिल्या प्रकारात समाजातील विशिष्ट जातीत म्हटल्या जाणाऱ्या लोककथागीतांचा समावेश होतो. पारंपारिक लोककथागीतात परंपरेने चालत आलेल्या

लोककथागीतांचा समावेश करता येतो. कीटरेजचे हे वर्गीकरण स्थूल मानाने केलेले वर्गीकरण आहे.

महाराष्ट्रात आशय, स्वरूप आणि अभिव्यक्ती आणि गायक यादृष्टीने विविध स्वरूपात लोककथागीते उपलब्ध आहेत. याच वैशिष्ट्यांच्या आधारे डॉ. प्रभाकर मांडे[३] यानी महाराष्ट्रातील लोककथागीतांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे ते अधिक शास्त्रीय वाटते.

१. कौटुंबिक आणि सामाजिक कथागीते.
२. पौराणिक कथागीते.
३. भगतांची देवताविषयक कथागीते.
४. शौर्यात्मक कथागीते किंवा पोवाडे.
५. ओवी आख्याने
६. गद्यपद्यमिश्रीत कथा
७. इतर कथागीते

डॉ. प्रभाकर मांडे यानी लोककथागीतांच्या केलेल्या या वर्गीकरणाच्या आधारेच आपण त्यातील लोककथागीताचे स्वरूप पाहू या.

कौटुंबिक व सामाजिक लोककथागीते

मराठी लोककथागीतात कौटुंबिक आणि सामाजिक कथानक असलेली लोककथागीते आढळतात. 'आईचं काळीज' आणि 'बहिणीनं मारला भाऊ' ही कौटुंबिक कथा असलेली हृदयस्पर्शी लोककथागीते मला हिंगोलीच्या परिसरात ऐकता आली. 'आईचं काळीज' या लोककथागीतातून आई आणि तिचा मुलगा यांच्या मायेचे आणि सूनेच्या दुष्टबुद्धीचे हृदयस्पर्शी वर्णन या कथागीतात केलेले आढळते. पत्नीच्या सांगण्यावरून पती आपल्या आईला ठार मारून तिचे काळीज पत्नीला आणून देतो हे मुख्य कथानक या लोककथागीताचे. आपल्या मुलाने कितीही त्रास दिला तरी आईची माया काही कमी होत नाही हे पुढील याच लोककथागीतातून कळते.

फोकीचा मार चालला देहावर
तुवा शिक्या वरलं काळीज फडफड करं
काळीज सरकारच्या पाया पड
म्हणे मह्या बाळाला सोड
आली सरकारा दया, ते भी रडं

करूणरसाचा आविष्कार आणि भावनोत्कटता याचा प्रकर्षाने झालेला आविष्कार या लोककथागीतातून आढळतो.

'बहिणीनं मारला भाऊ' हे लोककथागीत संपत्तीच्या लालसेने बहिण आपल्या भावाला ठार मारते यांचे हृदयस्पर्शी वर्णन करते. त्यातील एक प्रसंग असा–

शिर मंग सांगे बहिणीला गोष्ट
बाई म्या काय केलं वाईट
तोडिली माय बापाची भेट ॥

या लोककथागीता प्रमाणेच 'शिराळ शेठ' 'येललाळबाई' ही मराठीतील लोककथागीते कौटुंबिक व सामाजिक कथानक असलेली आहेत. नागपंचमीच्या दिवशी स्त्रिया फेराच्या गाण्यातही अशाच प्रकारची लोककथागीते गातात. अशा प्रकारच्या लोककथागीतातून सासू-सुनेचे भांडण, नणंद-भावजय यांच्यातील परस्पर संघर्ष, माय-लेकाचे प्रेम, काळ्या-गोरीचा संवाद, इत्यादी कौटुंबिक जीवनाचे विविधरूपी चित्रण पाहवयास मिळते.

स्वाभाविकता, कुशल शब्दयोजना आणि कल्पनाचातुर्य आणि रसाचा परिपोष ही अशा प्रकारच्या लोककथागीतांची वैशिष्ट्ये होत.

पौराणिक कथागीते

लोककथागीतात पौराणिक कथानकावर आधारित लोककथागीतांची संख्या विपुल प्रमाणात आढळते. पौराणिक कथागीतांचे विषय 'हरिविजय', 'पांडव प्रताप' या ग्रंथातील घटनेवर तसेच रामायण-भारतातील प्रसंगावर आधारित असते. चांगुणा, सरावण बाळ, सखुबाई, लक्ष्मणाला शक्ती लागते, श्रीकृष्ण-रुक्मिणी संवाद, हरिश्चंद्र तारामती, सीतेचा वनवास, भीम पराक्रम इत्यादी लोककथागीते या लोककथागीतांची उदाहरणे म्हणून देता येतात. कौटुंबिक आणि सामाजिक लोककथागीतापेक्षा पौराणिक कथागीते मराठी लोकजीवनात अधिक प्रचलित असल्याचे आढळते याला कारण या कथागीतातील पौराणिक कथानक आणि त्यातील हृद्य व आदरनीय प्रसंग आणि संताची कामगिरी होय. लोकांच्यात जाऊन, त्यांच्यात मिसळून, आणि त्यांच्याच भाषेतून संत त्यांना पौराणिक कथा सांगत. संतानी अलौकिक आशयाला लौकिक रूप देऊन लोकजीवनात या आशयाला लोकसाहित्याचे स्थान प्राप्त करून दिले. संतानी लोकरूढ भाषेचा आश्रय घेऊन पौराणिक कथा लोकजीवनात रूजविल्या, पचविल्या आणि याच पौराणिक कथा पुढे लोकजीवनातून लोककथागीतांचा आकार घेऊन लोकजीवनात रममाण झाल्या. अशा लोककथागीतांची भाषाही सहजस्फूर्त आहे याचे पुढील उदाहरण देता येते–

भगतांची देवताविषयक कथागीते

जुन्या काळात मराठी लोकसंस्कृतीत भगताना महत्त्वाचे स्थान होते. आजही मराठी लोकसंस्कृतीत आणि लोकजीवनात काही भगताना महत्त्वाचे स्थान असल्याचे आढळते. या भगताना लोकसाहित्याचे अभ्यासक व प्रसिद्ध संशोधक रा. चि. ढेरे 'लोकसंस्कृतीचे उपासक' म्हणून संबोधतात. लोकजीवनाचे नैतिक आरोग्य अबाधित राखण्याचे काम या संस्था करीत. लोकात धर्मभावना जागृत करणे, लोकदेवताविषयी

लोकमानसात आदर निर्माण करणे, नीतिनियमांचे महत्त्व पटविणे इत्यादी कामे लोकसंस्कृतीच्या या उपासकाकडून घडविली जात. मनोरंजनातून उद्‌बोधन घडविणे हाही एक विशेष या भगताचा असतो आणि ही सर्वकामे हे भगत लोकगीतांच्या, लोककथागीतांच्या माध्यमातून करीत असतात.

गोंधळी, वासुदेव, मसणजोगी, नाथजोगी, पोतराज, वाघ्ये, गोसावी, पांगूळ, कुडमुड्या जोशी, भुत्या, वाघ्यामुरळी, भराडी इत्यादी भगतांचा मराठी लोकसंस्कृतीच्या जडण घडणीत महत्त्वाचा वाटा आहे. हे विसरून चालणार नाही.

देवाचे भगत असल्यामुळे लोकांची श्रद्धा त्यांच्यावर असते. लोकजीवनात या भगताना प्राचीन काळी अत्यंत मानाचे, आदराचे स्थान होते. सध्या मात्र यातील काही भगताना वाईट स्थिती आल्यासारखे दिसते. काही भगताकडे 'भणंग भिकारी' म्हणून पाहिले जाते. याला कारण समाजाची बदलती स्थिती, समाजात घडणारे विचार परिवर्तन होय. ग्रामीण जीवनात मात्र गोंधळी, वासुदेव, वाघ्या यांच्याकडे आदराने पाहण्याची दृष्टी आजही आढळते.

लोकजीवनात आदराचे स्थान असलेल्या या भगतानी लोककथागीतांच्या माध्यमातून देवदेवतांची उपासनागीते, पौराणिक कथानकावर आधारित कथागीते लोकजीवनात रूढ केली. आपल्या लोककथागीतातून हे भगत श्रीकृष्ण, राम, पांडव यांच्या कथा गातात तर काही भगत रेणुका, तुळजाभवानी, अंबामाता बाणाई या कथा आळवितात. खंडोबा, मसोबा, बिरोबा, मरीआई इत्यादी देवदेवतांच्या कथाही लोकगीतातून लोकजीवनात मांडल्या जातात.

० धरून मातेनं चिलया बाळ, भूमिवर तऱ्हाटिला
टाक्या बाण लाविला, शिरावर करवत ठेविला
डावा करी रोजना, उजवा नेत्र हसला
सवर्णाच्या मडक्यामंदी, चिलया बाळ चढविला.
(चांगुणा)

› जसी रामाची सीता
तिला काय उण
जसी पांडवाची द्रुपता
राहे रूक्मिण
हरिचंदर तारामती
गेले संगतीन
नळाची दमयंती भोगलं वन ॥
(चांद बोधल्या)

कल्पना, भावनाविष्कार आणि रचनेत आणि अभिव्यक्तीत स्वाभाविकता व त्यातील आशय लोकश्रद्धेचा यामुळे पौराणिक लोककथागीतांना लोकजीवनात आगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. पौराणिक लोककथागीताचे प्रमुख विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. पौराणिक व्यक्तींच्या गुणविशेषांचा आविष्कार.
२. मुख्य कल्पनेभोवती प्रसंगाची कलात्मक गुंफण.
३. आदर्शाचे चित्रण.
४. भाविकता, उदात्तता यांचा आविष्कार.
५. रंजन आणि उद्‌बोधन.
६. रचनेतील प्रासादिकता आणि स्वाभाविकता.
७. दीर्घ कथानक.
८. मानवी स्वभावांचे व प्रवृत्तींचे कुशल दिग्दर्शन.

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

या भगतांच्या लोककथागीतांचे स्वरूप पाहू जाता त्यातील विविधता आपल्या लक्षात येते. काही समान विशेषही या लोककथागीतातून पाहवयास मिळतात. भगतांच्या लोककथागीतांचे काही सारखे विशेष पुढीलप्रमाणे आहेत.

१. यांच्या लोककथागीतांना नृत्य आणि संगीत यांची साथ असते.
२. लोककथागीतातून देवदेवतांना मानवीजीवनाचा आकार दिलेला असतो.
३. मनोरंजनातून उद्‌बोधन या तत्त्वाचा स्वीकार.

या भगतांच्या लोककथागीतांच्या स्वरूपावर अधिक प्रकाश टाकण्यासाठी आपल्याला त्यांच्यातील काही वैशिष्ट्यांची ओळख करून घेणे आवश्यक वाटते. त्यांच्या लोककथागीतांच्या संबंधीत पुढील घटकही महत्त्वाचे आहेत.

भगत	देवदेवता	वाद्य
१. वासुदेव	श्रीकृष्ण	टाळ, बासरी
२. गोंधळी	देवी	संबळ, तुणतुणे
३. पोतराज	मरीआई	झलकी
४. वाघ्या	खंडोबा	डफ, तुणतुणे
५. मसणजोगी	महादेव	शंख, घंटा

संगीताच्या माध्यमातून लोककथागीते गायिल्यामुळे त्यातील कथानक लोकजीवनात अधिक मान्यता प्राप्त होत असे. वरील भगतांच्या लोककथागीतांचे संगीत हे अविभाज्य अंग आहे. यामुळे कथागीते रंजक होऊन लोकमनाची पकड घेत.

मराठी लोकसंस्कृतीत आणि लोकजीवनात काही विधींना कुळाचाराना अत्यंत महत्त्व आहे. याप्रसंगी या भगताना मानाचे स्थान असते व या विधीत, कुळाचारात हे भगत आपली कथागीते गात असतात.

महाराष्ट्रात मंगल कार्याच्या वेळी कुळाचार म्हणून आजही गोंधळ घालण्याची प्रथा आहे. गोंधळ हा देवीच्या उपासनेचा एक महत्त्वाचा भाग. या गोंधळाच्या प्रसंगी गोंधळी आपल्या साथीदारासह संबळ व तुणतुणे या वाद्याच्या संगीताच्या साजाने पौराणिक कथानकावर आधारलेली कथागीते गातो. याला जागर किंवा गोंधळ म्हणतात. याप्रसंगी म्हटली जाणारी लोककथागीते रंजक व उद्‌बोधक असतात. गोंधळाप्रमाणेच मराठी लोकजीवनात वाघ्या-मुरळीच्या कथागीताना महत्त्व आहे. या कथागीतातून वाघ्या-मुरळी, खंडोबा, बाणाई, म्हाळसा या देवदेवताविषयीचे कथानक, नृत्य, अभिनय संगीत याच्यासह सादर करतात. देवदेवतांच्या माध्यमातून मानवीजीवनाचा हृद्य व मनोहर आविष्कार हा या लोककथागीतांचा एक प्रमुख विशेष होय. वाघ्या-मुरळीची ही कथागीते शाहीरी थाटाची असतात. भुत्या, पोतराज आणि भोपे यांच्या कथागीतातून देवीच्या उपासनेचे कथानक असते.

लोकसंस्कृतीच्या या व इतर लोककथागीताशिवाय धनगर, आंध या जमातीतही लोककथागीते गायिली जातात. धनगर जातीत देवदेवतांच्या उपासनाविधीच्या प्रसंगी गायिल्या जाणाऱ्या लोककथागीतांचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण असते.

पोवाडे

पोवाड्याची भारतीय परंपरा फार प्राचीन आहे. वेदवाङ्मयाच्या गाथेत पोवाड्याचे बीज आपणास सापडते. नाराशंसी किंवा नरप्रधान गाथेतून श्रेष्ठ पुरूषांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनेवर, पराक्रमावर व उदात्त गुणावर वर्णन केलेली कथागीते पाहवयास मिळतात. ही कथागीते आज लोकजीवनात रूढ झालेले पोवाडे यांच्यात बरेच साम्य आढळून येते. युरोपमध्ये प्रचलित असलेल्या पोवाड्यांचे स्वरूप मात्र काहीसे भिन्न वाटते. अथर्ववेदातील परीक्षित गाथेतील परीक्षित राजा हा भारतीय पोवाड्यातील पहिला ज्ञात नायक होय असे दुर्गा भागवत म्हणतात ते सयुक्तिक आहे. पोवाड्याचे विषय अनेकविध असल्याचे आढळते. भारतात रचनेच्या दृष्टीने प्रांताप्रांतातील पोवाड्यांची रचना काहीशी भिन्न असली तर आशयादृष्टीने या पोवाड्यांत बरेच साम्य दिसते.

श्रेष्ठ पुरूषांच्या साहसाच्या, पराक्रमांच्या कथानकाना लोककथागीतांचे स्वरूप दिलेले आढळते त्याचप्रमाणे विशुद्ध प्रेमभावनेवर आधारित पोवाडेही ऐकावयास मिळतात. महाराष्ट्रातील पोवाड्यात मात्र पराक्रमगाथा किंवा शौर्यगाथांचेच वर्णन आढळते. तानाजीचा पोवाडा, शिवाजीचा पोवाडा, उमाजी नाईकाचा पोवाडा इत्यादी उदाहरणे या लोककथागीतांची देता येतात. कै. शाळीग्राम व श्री. य. न. केळकर यांनी महाराष्ट्रातील पोवाड्यांचा संग्रह करून एक टिपणीही तयार केली त्यावरून मराठ्यांच्या पोवाड्यांचे स्वरूप कळून येते. मराठ्यांच्या पोवाडे स्वरूप शाहिरी धाटणीचे आहे. अशा या पोवाड्यातून आपल्याला इतिहासातील काही महत्त्वाच्या घटना लक्षात येऊ शकतात–मात्र यासाठी त्यातील दंतकथा वेगळ्या काढाव्या लागतात.

ओवी आख्याने

लोकगीतात ओवींची संख्या विपुल प्रमाणात आढळते. यातील काही ओव्यांचे स्वरूप भावकाव्यासारखे असते. काही काही ओव्या त्यातील आशयाच्या दृष्टीने स्वयंपूर्ण असतात. अशा ओव्यातून सामूहिक पातळीवरचा भावाविष्कार पाहवयास मिळतो. पण काही ओव्यातून भाविकता, परमेश्वराविषयीची श्रद्धा व्यक्त झालेली असते. पौराणिक घटना, प्रसंग ओवीच्या समुच्चयातून सांगण्याचा प्रयत्न काही ओव्यातून केलेला दिसतो. पौराणिक व्यक्तीना मानवी जीवनाचे स्वरूप देऊन व प्रसंगाच्या गुंफणाने सूत्रबद्ध कथागीते ओवीच्या माध्यमातून आकार घेत असतात. अशा ओव्यात कथात्मकता असते. अशा ओव्यातून आकारास येणारी कथा, आख्यान म्हणजे ओवी कथागीते म्हणता येतील. अशा ओवी कथागीतांचे रचनात्मक स्वरूप इतर प्रकारच्या लोककथागीता सारखे नसते.

अशा ओवी कथागीतातून राम, सीता, विठ्ठल, कृष्ण, पांडव यांच्याविषयीचे कथानक आढळते. त्यातून या पौराणिक देवदेवताविषयीची श्रद्धा व्यक्त होताना दिसते. देवदेवताना अलौकिक पातळीवरून लौकिक पातळीवर आणून मानवीजीवनाचा आविष्कार त्यातून घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

इतर लोककथागीते

अध्यात्मिक आशय असलेले कथानक, मनोरंजनाच्या उद्देशाने गुंफलेले कथानक आणि विशिष्ट प्रसंगीच गायिल्या जाणारे कथानक असलेल्या लोककथागीतांचा यात प्रामुख्याने समावेश केलेला आहे. अशा प्रकारच्या लोककथागीतातून कूटाच्या माध्यमातून कधी अध्यात्मिक आशय व्यक्त केलेला असतो तर कधी मनोरंजनासाठी चुटकेही या लोककथागीतातून नाट्यपूर्ण सांगितले जातात.

आंध्राच्या लोककथागीतांचा समावेश प्रामुख्याने या सदरात आपल्याला करता येईल. 'जायाराणी' हे आंध्र जमातीचे लोककथागीत, 'घोडा–बैल संवाद', 'एडका' ही लोककथागीतेही आपल्याला या वर्गात घेता येतील. या वर्गात डॉ. प्रभाकर मांडे[५] यानी 'बाऱ्याच्या भजनातील' काही कथागीतांचाही समावेश केला आहे.

येथपर्यंत आपण लोककथागीतांचे विविध स्वरूप पाहिले. याशिवाय लोकसाहित्यात काही भाग असा असतो की ज्यात अधिक काव्यात्मकता असते. त्यांची रचना गद्यापेक्षा पद्याकडे अधिक झालेली असते. अशा लोकसाहित्याच्या भागात गद्य आणि पद्य यांची अजोड सांगड घातलेली दिसते. अशा गीतात्मक कथांचा समावेश लोककथागीतात करता येईल काय ? हा प्रश्न जरा वादाचाच ठरावा असे वाटते. म्हटलं तर कथा म्हटलं तर गीत असे स्वरूप या गीतात्मक कथांचे असते. अशा गीतात्मक कथांची धाटणी वेगळी पण आगळी असते. भाषा, सुटसुटीत आणि स्वाभाविक असते.

लोककथागीतांचे विशेष

आतापर्यंत आपण लोककथागीतांच्या विविध स्वरूपांची चर्चा केली. लोककथागीतातील आशय, अभिव्यक्ती आणि त्यापाठी असलेल्या परंपरा यांच्या अनुषंगाने आपणास लोककथागीतांचे काही विशेष विशेषत: जाणवतात. लोककथागीतांचे हे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. लोककथागीतांच्या मागे मौखिक परंपरा असते.
२. लोककथागीते गेय असतात.
३. लोककथागीताना संगीत, नृत्य, अभिनय यांची साथ असते.
४. स्वाभाविकता आणि साधेपणा लोककथागीतात आढळतात.
५. त्यांचा कर्ता अनामिक असतो.
६. लोककथागीतात कथानक असते.
७. लोककथागीतांचे स्वरूप आपोआप घडत असते.
८. लोककथागीतातील कथानकाला आद्य, मध्य आणि अंत्य असे ठराविक ठिकाण असते.
९. लोककथागीतात चरणांची पुनरावृत्ती आढळते.
१०. लोककथागीतातील कथानकात सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्तीचा संघर्ष दाखविलेला असतो.
११. कथानकात एकात्मता असते.
१२. कथानकातून विशिष्ट कल्पनाबंध आढळतात.
१३. लोकगायक आणि लोककथागीते यांचा जवळचा संबंध असतो.
१४. मनोरंजनातून उद्‌बोधन हे तत्त्व त्यात असते.
१५. लोककथागीतांचे विशिष्ट असे रचनातंत्र असते.

० ० ०

संदर्भ

१. डॉ. भाऊ मांडवकर : कोलाम पृ. ३७
२. डॉ. प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे स्वरूप पृ. २६७–६८
३. डॉ. प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे स्वरूप पृ. २८२
४. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. ३८६
५. डॉ. प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचे स्वरूप पृ. २८९

६. लोककथा

- लोकजीवनात लोककथांचे स्थान
- लोककथांचे स्वरूप
- लोककथांची भारतीय परंपरा
- लोककथांच्या अभ्यासाचे प्रयत्न
- लोककथांचे वर्गीकरण
- दैवतकथा
- अद्‌भूतकथा
- दंतकथा
- नीतिकथा
- वीरकथा
- हास्यकथा
- व्रतवैकल्याच्या कथा
- लोककथांचे मूलघटक

लोकजीवनात लोककथाचे स्थान

लोकसाहित्याची विभागणी प्रामुख्याने दोन प्रकारात करता येते. ते प्रकार म्हणजे पद्य व गद्य हे होत. पद्य या प्रकारात लोकगीते आणि लोककथागीते यांचा समावेश होतो तर गद्य या प्रकारात लोककथा, उखाणे, म्हणी इत्यादींचा समावेश करता येतो. प्रस्तुत प्रकरणात लोककथांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकजीवनात लोककथाना महत्त्वाचे स्थान असल्यामुळे लोककथा विपुल प्रमाणात उपलब्ध होतात. अशा या लोककथांचे लोकसाहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. लोककथा हे लोकमनोरंजनाचे माध्यम असल्यामुळे लोकजीवनात लोककथा आणि त्या सांगण्याची प्रथा रूढ झाली. काही जमातीत तर लोककथांचा संबंध एखाद्या विधीशी जोडलेला असतो. बंजारा या जमातीत लग्नविधीत भोजनप्रसंगी वधु-वराकडील लोकानी परस्परांना कथा सांगावयाची प्रथा आजही पाहवयास मिळते. तर मेढग्या जोशी या जातीत लोककथांचा संबंध मृत्यूविधीशी जोडलेला आढळतो. या जातीतील एखादी व्यक्ती मृत झाली तर त्याच्या दहाव्या दिवसापासून तेराव्या दिवसापर्यंत रोज रात्री पारंपारिक कथा सांगण्याची पद्धती आहे. विधी आणि लोककथा यांचा हा संबंध फार प्राचीन काळापासून चालत आला आहे. लोकमनावर लोककथांचा विलक्षण परिणाम दिसून येतो. भारतात लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. लोककथाकडे-कहाण्याकडे

पाहण्याची भारतीय दृष्टी अभ्यसनीय आहे. कहाणी सांगितल्याने-ऐकल्याने मनाच्या इच्छा पूर्ण होतात, पुण्य प्राप्त होते अशी एक समजुत लोकजीवनात रूढ आहे. कथेकडे पाहण्याची दृष्टी भारतीयांची श्रद्धेची, भाविकतेची असल्याचे आढळते. व्रते आणि धार्मिक विधी यांच्याशी लोककथाची अजोड सांगड भारतीयानी घातली आहे. त्यामुळे लोकजीवनात लोककथांचे महत्त्वाचे स्थान आहे. अशा लोककथाना लोकसाहित्यातही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

लोककथांचे स्वरूप

भारतीय लोककथांचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. विविध वैशिष्ट्यांनी नटलेल्या लोककथा लोकजीवनात प्रचलित झालेल्या आहेत.

लोककथेच्या स्वरूपावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न लोकसाहित्य विशारदानी केला आहे. अमर, भरत यानी कथेच्या वैशिष्ट्यांचा व लक्षणाचा विचार केल्याचे आढळते. 'जे सांगण्यासारखे आहे त्याची रचना कल्पनेने करणे म्हणजे कथा' अशी व्याख्या कथेची ते करतात. भारतीय साहित्यशास्त्रज्ञानी कथेचे स्वरूप विशद करताना त्यातील गद्य आणि पद्य याचाही विचार केलेला पाहवयास मिळतो.

लोककथांचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की कथाविशेषाच्या मूल घटकांची त्यात गुंफण असते. कथाविशेषाच्या मूलघटकाला कल्पनाबंध म्हणतात. बऱ्याच लोककथातून समान कल्पनाबंध पाहवयास मिळतात. कल्पनाबंध समान असले तरी त्यातील घटना, रचना भिन्न असतात. कल्पनाबंध हा लोककथेचा आत्मा आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. कल्पनाबंधाशिवाय लोककथेला अर्थच उरत नाही. लोककथेच्या सर्व अंगाना कल्पनाबंधाची वीण असते.

लोककथेत कर्ता, वस्तू आणि घटना या घटकाना महत्त्वाचे स्थान आहे. या घटकांच्या आधारेच लोककथा विकसित होत असते. कथक, श्रोते, वातावरण, कथेचा हेतू व प्रादेशिकता यामुळे कथेचे विविध पर्याय आढळतात.

आशयाच्या दृष्टीने लोककथांचे स्वरूप पाहू जाता त्यात बराच भाग उपदेशात्मक असतो. एखाद्या घटने/प्रसंगाच्या आधारे त्यातून नीतितत्व सांगितलेले असते. (नीतिकथा) तर काही कथातून धर्मसंबंधीत, सृष्टीसंबंधीत स्पष्टीकरण आलेले असते. (दैवतकथा) संस्कृतीसंबंधी, अतिमानवी योनीतील व्यक्तींचे काही लोककथातून आपणास दर्शन होते. (परीकथा) अशा कथातून आदि मानवी संस्कृतीचे अवशेषही आपणास पाहवयास मिळतात. काही कथांचे स्वरूप व्यक्तीचे पराक्रम गाथा सांगणारी असते. (वीरकथा) तर काही कथातून खेळकर विनोद आपणास हसवीतो. (हास्यकथा) काही लोककथांना स्त्री-जीवनात महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते. (व्रत वैकल्याच्या कथा) अशा लोककथांची धाटणी वेगळी पण आगळी असते. असे अनेकविध स्वरूप आपणास लोककथांचे पाहवयास मिळते.

लोककथांची भाषाशैलीही अगदी निराळी भासते. लोककथांची भाषा ही सर्वस्वी लोकांची असते, त्यांच्या हृदयाचा ठाव घेणारी असते. लोककथा एका विशिष्ट वृत्तीच्या द्योतक असल्याचे कळते. लोकसाहित्यातील लोककथांचे हे दालन भव्य आणि विविध वैशिष्ट्यांनी नटलेले असे आहे. समाजातील सर्व स्तरात या लोककथा प्रचलित आहेत. आशय, रचना, अभिव्यक्ती आणि उद्देश या दृष्टीनीयुक्त अशा लोककथांचा त्यांच्या वर्गीकरणासह व त्यातील मूलघटकान्वये त्यांच्या स्वरूप वैशिष्ट्यांचा स्वतंत्रपणे पुढे अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे त्यावरून लोककथांचे स्वरूप लक्षात येईलच.

लोककथांची भारतीय परंपरा

भारतात लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. प्राचीन काळात धार्मिक ज्ञान देण्यासाठी कथांचे माध्यम वापरल्या जात असे. अशा स्वरूपाच्या कथा आपणास श्रौत वाङ्मयात पाहवयास मिळतात. ऋग्वेदातही आपणास अनेक कथासूत्रे सापडतात. ब्राह्मण ग्रंथात व उपनिषदातही अनेक कथांचे उल्लेख आहेत. उपनिषदातील तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण करताना गुरु आपल्या शिष्याना मधून मधून कथा सांगत वेदाप्रमाणेच पुराणातही अनेक कथांचे उल्लेख आढळतात.

बृहत्कथेला भारतीय लोककथांच्या परंपरेत महत्त्वाचे स्थान आहे. बृहत्कथा हा भारतीय कथांचा संग्रह असून त्यात लोककथांची विविध वैशिष्ट्ये पाहवयास मिळतात. या कथाग्रंथात राजाविषयीच्या कथा, सामान्याच्या कथा, पशूकथा, अद्भूतकथा आणि नीतिकथा यांचा समावेश आहे. या कथासंग्रहात कथांचे लौकिक स्वरूप कायम ठेवण्याचा संग्राहकाचा प्रयत्न स्तुत्य आहे. वेदकाळापासून ते उपनिषत्कालापर्यंत कथा धार्मिक ज्ञानातून विकसित झालेली दिसते. तसेच बृहत्कथेतील लौकिक आविष्कार दोन्ही प्रवाह भारतीय लोकजीवनात परंपरेने चालत आलेले असल्याचे आपणास कळते. यानंतर लोकजीवनात पंचतंत्र, हितोपदेश आणि वेताळ पंचविशीतील कथा लोकप्रिय होऊ लागल्या. प्राचीन भारतीय लोककथात पंचतंत्राचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. पंचतंत्रात विष्णु शर्मा याने मित्रभेद, मित्रप्राप्ती, ककोलूकयिम, लब्धप्राणाशाम आणि अपरीक्षित कारकम या तंत्रानुसार अनेक कथा सांगितल्या आहेत. पंचतंत्रातील कथांचा प्रसार जगभर झाला असून अनेक भाषातून त्यांचे भाषांतरे झाली आहेत. लोककथांचे भारत उगमस्थान आहे असे म्हणतात याला मुख्य कारण म्हणजे पंचतंत्र. एका कथेत अनेक उपकथा घालून एका कथेतून दुसरी कथा, दुसरीतून तिसरी अशा रीतीने गुंफलेली कथांची साखळी पंचतंत्रात आढळते. याच तंत्राचा स्वीकार पुढे कथेच्या बाबतीत भारतात व भारताबाहेर होऊन या पद्धतीच्या अनेक कथा लोकजीवनात रूढ झाल्या.

लोककथांच्या भारतीय परंपरेत हितोपदेशाचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे. यातील बोधकथा लोक आवडीने वाचीत. भारतीय लोककथेत वेताळपंचविशी, सिंहासन-द्वात्रिंशिका, शुकसप्तती, माधवालनकथा, कथार्णव, पुरूषपरीक्षा इत्यादी कथासंग्रहातील कथा भारतीय लोककथांचे स्वरूप स्पष्ट होण्यास अभ्यसनीय आहेत.

भारतीय लोककथांच्या परंपरेत बौद्ध आणि जैन धर्मीयांच्या कथांचेही स्थान अद्वितीय आहे. जातककथा या बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या कथा होत. या एकंदर ५४७ कथा आहेत. या कथेतून बुद्धाचे विविध स्वरूपात दर्शन घडते. नायक, दुय्यम व्यक्ती आणि प्रेक्षक या रूपातून बुद्ध या कथातून सहभागी झालेला दिसतो. जातककथांचे स्वरूप नीतिकथा सारखे असले तरी या कथांचे स्वत:चे असे वैशिष्ट्य आहे.

जातककथांचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की या कथांचे स्वरूप लोककथासारखे आहे. या कथांचा प्रसार परदेशातही झालेला आढळतो. पाश्चात्य लोकसाहित्य विशारद विंटरनीझ या कथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करतो–

१. नीतीसंबंधीकथा २. पशुकथा ३. रोमांचकारीकथा ४. धार्मिककथा ५. विनोदी कथा.

तसेच या कथांच्या निवेदनपद्धतीचाही अभ्यास विंटरनीझ याने करून या पद्धतीचे विवेचनही केले आहे. या सर्व जातककथाच्या पाठीमागे धार्मिक प्रेरणा असावी असे वाटते.

जैन धर्मीयानी संग्रह केलेल्या जैनांच्या कथाना चूर्णी किंवा चूर्णक म्हणतात. या कथांचे स्वरूप जातककथाप्रमाणेच नीतीकथा सारखेच आहे. या कथातून मनोरंजन आणि उद्बोधन यांचा सुंदर मिलाप पाहवयास मिळतो.

भारतीय लोककथांची परंपरा पाहू जाता आपल्या लक्षात येते की, सध्या समाजात प्रचलित असलेल्या लोककथा ह्या पारंपारिक वैशिष्ट्यांनी नटलेल्या आहेत. प्राचीन कथांचे स्वरूप धार्मिक होते. बौद्ध जातके आणि जैन चूर्णी म्हणजेच नैतिक लोककथा होत.[१] रामायण, महाभारतातील नीतिकथाचे स्वरूपही नैतिक लोककथा सारखेच होते. हे परंपरागत कथासाहित्य आपणास धार्मिक कथाच्या (रामायण, महाभारत), स्वतंत्र कथासंग्रहाच्या (बौद्ध जातके, जैन चूर्णी, पंचतंत्र) आणि पारंपारिक अद्भूत कथेच्या स्वरूपात प्राप्त होते. डॉ. विंटरनीझ यांच्या मते संस्कृत साहित्यातील सर्व ललित वाङ्मयाला लोकामध्ये चालत आलेल्या पारंपारिक कथांचा आधार आहे.[२] डॉ. केतकरांच्या मते बुद्धपूर्व काळात जाति दैवते दुय्यम झाली कारण याच काळात सर्वव्यापी परमेश्वराची कल्पना रूढ झाली व पौराणिक वीराना महत्त्व आले आणि त्यानी जनमनाची पकड घेतली. त्यांच्या मते भारतीय वाङ्मयात कथावाङ्मयाचे महत्त्वाचे स्थान आहे.[३] डॉ. केतकरांचे हे मत लोककथेच्या संदर्भात लक्षात घेण्याजोगे आहे.

भारतीय लोककथांची ही परंपरा पाहू जाता आपल्या लक्षात येते की कथेकडे पाहण्याचा भारतीयांचा दृष्टीकोनच इतरापेक्षा अत्यंत वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण होता.

डॉ. विंटरनीझ यांनी सांगितलेला ललित वाङ्मयविषयक सिद्धांत आणि डॉ. केतकरांचे कथाविषयक मत तपासू जाता आपल्या लक्षात येते की, भारतात वेदकालापासून लोककथांची परंपरा आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासात भारतीय कथा परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

लोककथांच्या अभ्यासाचे प्रयत्न

ग्रिमबंधूनी लोककथांचा अभ्यास करून लोककथांचे स्वरूप उजेडात आणण्याचा प्रयत्न करून लोकसाहित्याच्या अभ्यासकांना हे दालन उघडे करून दिले असे म्हणावयास हरकत नाही. लोककथांचा भाषाशास्त्रीयदृष्टचा अभ्यास करण्याचे श्रेय ग्रिमबंधू व मॅक्समूलर या पाश्चात्य लोकसाहित्य विशारदाकडे जाते. भारतीय कथा-वाङ्मय म्हणजे जागतिक कथा-वाङ्मयाचे मूलस्त्रोत आहे. या सिद्धांताचा स्वीकार व पुरस्कार मॅक्समूलरने केला. थिओडार बेनेफ या लोकसाहित्य विशारदाने पंचतंत्राचे भाषांतर करून त्याला एक प्रदीर्घ प्रस्तावना लिहून लोककथेच्या अभ्यासात महत्त्वाची भर घातली यात संशय नाही. ऱ्हीस, डेव्हिडस, सर जॉर्ज क्रॉक्स यानी भारत मूलक सिद्धांताला (Indianist theory) उचलून धरून लोककथा भारतातून पश्चिमेकडे कशी गेली हे सप्रमाण सिद्ध केले. लोककथेच्या अभ्यासात डॉ. अलेक्झांडर क्राप याची कामगिरी अत्यंत मोलाची वाटते. त्यानी आपल्या (The Science of Folklore) ग्रंथात लोककथेची सविस्तर चर्चा करून लोककथांचे शास्त्रशुद्ध वर्गीकरणही केले आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासात जे निरनिराळे संप्रदाय उदयास आले त्या संप्रदायाच्या पुरस्कर्त्यानीही लोककथांचा अभ्यास आपापल्या विचारप्रणालीनुसार करून लोककथांचे विशेष स्पष्ट केले. येथपर्यंत आपण पाश्चात्य लोकसाहित्य विशारदानी लोककथेच्या अभ्यासाच्या केलेल्या प्रयत्नांचा थोडक्यात परामर्श घेतला. आता आपण मराठीत लोककथांच्या अभ्यासाच्या झालेल्या प्रयत्नांचा मागोवा संक्षेपाने घेऊ या.

सन् १८६८ पासून मराठीत लोककथेच्या संकलनास सुरूवात झाली असली तरी या कथांचे स्वरूप मर्यादितच होते. सर्वश्री गोविंद आपटे, विष्णु दिगंबर वैद्य, राजवाडे यानी लोककथेच्या अभ्यासास सुरूवात करून लोककथाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सन् १९३० मध्ये शं. गो. दाते यानी लोककथांचा संग्रह करून प्रकाशित केला. यानंतर सर्वश्री ना. गो. चापेकर, म. वि. डोंगरे आदीनी लोककथाविषयक केलेले विवेचन महत्त्वाचे आहे. कै. वि. का. राजवाडे यानी १९२५ साली 'लोककथा' आणि 'लोकगीते' असे पारिभाषिक शब्द रूढ केले. कहाणीविषयी राजवाडे यानी व्यक्त केलेले विचार मूलगामी स्वरूपाचे आहेत. यानंतर महाराष्ट्र–साहित्य पत्रिकेतून लोककथा प्रकाशित होऊ लागल्या. महाराष्ट्र लोकसाहित्य मालेतूनही लोककथा व तदविषयक विवेचन प्रकाशित झालेले आहेच. डॉ. सरोजिनी बाबर यानी लोककथेचे स्वरूप स्पष्ट करताना लोककथेच्या उद्गमाची व विकासाची केलेली चर्चा अभ्यसनीय आहे. दुर्गा

भागवत यानी आपल्या "लोकसाहित्याची रूपरेखा" या ग्रंथात लोककथेचे शास्त्रीय व सविस्तर विवेचन करून लोककथांचे विविध स्वरूप अभ्यासकापुढे मांडले आहे. त्यांचा हा ग्रंथ लोककथेच्याच नव्हे तर एकूण लोकसाहित्याच्या अभ्यासकाना व संशोधकाना अत्यंत उपयुक्त ठरला आहे. डॉ. यू. म. पठाण यानी 'मराठवाड्यातील लोककथा' करून लोककथेतून व्यक्त होणारी प्रादेशिक वैशिष्टये स्पष्ट केली. डॉ. प्रभाकर मांडे यानी आपल्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथातून लोककथांचा शास्त्रीय अभ्यास करून लोककथेच्या स्वरूपावर प्रकाश टाकला आहे.

लोककथांचे वर्गीकरण

लोककथांचा संग्रह करून त्यातील आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने लोककथांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न आतापर्यंत लोकसाहित्याच्या बऱ्याच अभ्यासकानी केलेला आहे. लोककथांच्या वर्गीकरणाच्या प्रयत्नांचा मागोवा घेऊन लोककथांचे प्रकार कोणते याचा विचार प्रस्तुत प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतातील प्राचीन आचार्यानी कथा व आख्यायिका असे दोन वर्ग लोककथांचे केलेले आढळतात. आनंदवर्धनाचार्य यानी कथाचे वर्गीकरण पुढील तीन विभागात केलेले पाहवयास मिळते.

१. परीकथा २. खंडकथा ३. सकलकथा

हेमचंद्रानी सकलकथेसाठी चरित्रकथा असा शब्द वापरला आहे. अद्‌भूत आणि अतिमानवी सृष्टी आढळणाऱ्या कथेस परीकथा म्हटलेले आहे तर प्रादेशिक वैशिष्ट्यांनी नटलेल्या कथाना आनंदवर्धनाचार्य खंडकथा म्हणतात. सकलकथाना पूर्णकथाही म्हटले आहे.

ब्रह्मजाल सुत्रात पुढील कथा प्रकार सांगितले आहेत.[१]

१. राजकथा	२. चोरकथा	३. महामात्रकथा
४. सेनाकथा	५. भयकथा	६. युद्धकथा
७. अन्नकथा	८. पानकथा	९. वस्त्रकथा
१०. शयनकथा	११. मालाकथा	१२. गंधकथा
१३. ज्ञातिकथा	१४. यानकथा	१५. ग्रामकथा
१६. निगमकथा	१७. नगरकथा	१८. जनपदकथा
१९. स्त्रीकथा	२०. पुरुषकथा	२१. शूरकथा
२२. विशिखाकथा	२३. अद्‌भूतकथा	२४. पूर्वकथा
२५. निरर्थककथा	२६. लोकाख्यायिका	२७. समुद्राख्यायिका इत्यादी.

पाश्चात्य लोकसाहित्य विशारदानी लोककथेचे केलेले वर्गीकरणही अभ्यसनीय व मार्गदर्शक आहे. सर रिचर्ड टेंपल यानी लोककथांचे वर्गीकरण केले ते पुढील घटकांच्या आधारे–

१. कथेतील व्यक्ती २. कथेची अभिवृद्धी ३. पूरक साधने आणि ४. संकीर्ण.

काही लोकसाहित्य विशारदानी लोककथेच्या वर्गीकरणात त्यातील कल्पनाबंधांचा आधार घेतलेला दिसतो. लोककथेच्या रचनातंत्राच्या दृष्टीनेही लोककथांचे वर्गीकरण करण्याचा लोकसाहित्य विशारदानी प्रयत्न केलेला आढळतो. रचनेच्या दृष्टीने लोककथेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. गद्यकथा २. पद्यकथा (लोककथागीत) आणि ३. कहाणी.
(गद्य आणि पद्य यांच्या सीमेवर असलेली कथा)

तर सर जॉर्ज गॉम हा लोककथेचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करतो.[५]

१. लोककथा २. पराक्रमकथा ३. लोककथागीत ४. दंतकथा.

अॅन्टी अर्ने यानी प्राणीकथा, लोककथा आणि परिहासकथा असे लोककथांचे तीन वर्ग केले आहेत.

स्टीथ थॉमसन या पाश्चात्य लोकसाहित्य विशारदानी लोककथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करून त्यांचे स्वरूप स्पष्ट केले आहे.

१. स्थानिक दंतकथा/आख्यायिका/लोकगीतकथा
२. परीकथा/अद्भूतकथा
३. पशुकथा/प्राणीकथा
४. नीतिकथा
५. दैवतकथा.

लोककथेतील आशय, कथेभागील उद्देश आणि रचनातंत्र यादृष्टीनी डॉ दिनेशचंद्र सेन यानी लोककथेची विभागणी चार वर्गात केली आहे ते वर्ग असे–

१. रुपककथा
२. हास्यकथा
३. व्रतकथा
४. गीतकथा

लोककथेच्या वर्गीकरण संदर्भात डॉ. सत्येंद्र यानी लोककथांचे केलेले वर्गीकरण आणि डॉ. कृष्णदेव उपाध्याय यानी केलेले वर्गीकरण स्थूल स्वरूपाचे असले तरी लोककथेचे स्वरूप स्पष्ट करण्यास हे वर्गीकरण सहाय्यभूत ठरणारे असेच आहे.

लोककथेच्या वर्गीकरणात बऱ्याच अडचणी येत असल्यामुळे उपलब्ध लोककथांचा समावेश करता येईल असे शास्त्रीय वर्गीकरण करता येणे सहजशक्य होईल असे वाटत नाही. लोककथात लोककथेचे मौखिक स्वरूप निराळे असू शकते, त्यांचे वेगवेगळे पर्याय आढळू शकतात याशिवाय लोककथेच्या संदर्भातील संबंधित विविध घटकांचा (श्रोता, कथक, प्रदेश, विषय, रचना इत्यादी) प्रभाव लोककथेवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पडत असल्यामुळे लोककथांच्या वर्गीकरणात बऱ्याच अडचणी येतात.

मराठीत उपलब्ध लोककथांच्या स्वरूपाधारे, त्यातील आशयाप्रमाणे, तसेच लोककथाचा निर्मिती उद्देश, रचना आणि त्यातील कथाविशेषाच्या अनुषंगाने लोककथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल–

१. दैवतकथा, २. अद्‌भूतकथा ३. दंतकथा ४. नीतिकथा ५. वीरकथा ६. हास्यकथा ७. व्रतवैकल्याच्या कथा.

लोककथेच्या या वर्गीकरणा आधारे आता आपण मराठीत उपलब्ध असलेल्या कथाप्रकारांचा थोडक्यात परामर्श घेऊ या.

१. दैवतकथा

दैवतकथा या प्राचीनकथा होत. यानाच पुराणकथा असेही म्हणतात. लोककथेत दैवतकथाना अनन्यसाधारण महत्त्व आहे. अँण्ड्रू लाँगच्या मते दैवतकथा म्हणजे मानवजातीचा प्रारंभकालाचा इतिहास असून ते आधिभौतिक शास्त्रही आहे. संपूर्ण जगभर दैवतकथा आढळतात.

दैवतकथांचे स्वरूप पाहू जाता आपल्या लक्षात येते की या कथांचा संबंध धर्माशी येतो. त्या धर्मसंप्रदायातून जन्माला आल्या आहेत. आज उपलब्ध असलेल्या परीकथेचे मूळ आपणास दैवतकथेतच सापडते. दैवतकथाकडे पाहण्याची दृष्टी पूज्य असल्याने त्या पवित्र मानल्या जातात. दैवतकथातून धर्मकल्पना विकसित झाली असे आपणास त्यांचा अभ्यास करताना कळते. पुढे या धर्मकल्पना गळून पडल्या तरी दैवतकथाचे अस्तित्व टिकून राहिले हे विशेष होय.

इंद्रकथा, उत्पत्तिकथा, जोतिष्कथा, नक्षत्रकथा हे दैवतकथांचेच प्रकार आहेत असे दुर्गा भागवत म्हणतात.[१]

अशा या दैवतकथेत सृष्टीची उत्पत्ती, रचना, विनाश या सोबतच दैवी घटना यांची वर्णने असून या कथा सृष्टीच्या महान शक्तीशी संबंधित असतात. निसर्गदृश्यांचा अर्थ लावण्यासाठी या कथांची निर्मिती झालेली असते. दैवतकथांचे एक प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे निसर्गातील दृश्याचा अर्थ लावताना त्यांचे मानवीकरण केले जाते व त्यातून अर्थ प्रकट केला जातो हे होय. विश्वातील पंचमहाभूतादिकांच्या नियत हालचाली व

त्यापासून मनुष्याला मिळणारे सुखदुःख इत्यादीची उत्पत्ती दैवतकथातून सांगितली जाते. अमूर्त गोष्टीना मूर्त रूप देण्याची किमया आपल्याला या प्रकारच्या कथेतून पाहवयास मिळते. अध्यात्म, धर्म यांची जोड या कथाना मिळाल्यामुळे जनमनात त्याना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

लोककथात दैवतकथांचे स्थान ठरविताना या कथांच्या निर्मिती मागील प्रेरणा व त्यातील आशय यांचा अभ्यास करू जाता या दैवतकथा मानव समाजाच्या बाल्यावस्थेतील आरंभीचे वाङ्मय, इतिहास किंवा आधिभौतिक शास्त्र असल्याची साक्ष पटते.

दैवतकथातून देवतासंबंधीची उपासना किंवा देवताचारांचा आणि काही लोकाचारांचा समावेश झालेला आढळतो. सूर्य, चंद्र, पृथ्वी, ग्रह, तारे, धूमकेतू, इंद्रधनुष्य, धरणीकंप, वृक्षवनस्पतींची पूजा, प्राणीपूजा, भूतबाधा, नवसकुळधर्म, शकुन, गर्भ-जनन संस्कार, लग्न संस्कार, व्रतवैकल्ये इत्यादींचा उल्लेख या कथातून आलेले आढळतात.

'गोहत्त्येच्या पापाचा वाटेकरी सांग', 'वंशवृक्षाची वंशनिर्मिती', देवळातील घंटा', 'बत्तीस शिराळे', 'वाघदेव', 'कुशाव्रत', 'औदुंबर', 'वड आणि पिंपळ', 'वस्त्रहरण करणारे पिशाच्च' इत्यादी मराठीतील लोककथांचे उदाहरण या दैवतकथांचे म्हणून देता येतील.

दैवतकथेचाच एक भाग म्हणून आपल्याला उत्पत्ती कथा म्हणून संबोधता येईल. दैवतकथांचे उत्पत्तीकथांचे स्वरूप पाहू जाता उत्पत्तीकथांचा समावेश दैवतकथातच करणे अधिक संयुक्तिक वाटते.

सृष्टीच्या उत्पत्तीसंबंधीच्या व मानवी देहासंबंधीच्या उत्पत्तीविषयी या कथातून वर्णन केलेले असते. तसेच वनस्पती, नक्षत्रे इत्यादी संबंधीचेही वर्णन असलेल्या कथांना उत्पत्तीकथा म्हणून काही लोकसाहित्य विशारद स्वतंत्र वर्ग देतात. पण दैवतकथेचे क्षेत्र विशाल असल्यामुळे अशा प्रकारच्या कथा दैवतकथेत समाविष्ट करता येतात.

२. अद्‌भूतकथा

लोककथेच्या या प्रकाराचे दालन संपन्न असल्याचे आढळते. अद्‌भुतकथानाच परीकथा असेही म्हणतात. अलेक्झांडर क्रॉप याने अद्‌भूतकथा किंवा परीकथा यांच्या स्वरूपाविषयी विवेचन केले आहे. ऐतिहासिक वातावरणापासून अद्‌भूतकथेतील बऱ्याच बाबी दूर राहिल्याचे जाणवते. या प्रकारच्या कथांचा आणि संस्कृती विकासाचा अत्यंत जवळचा संबंध असतो. आदिमानवी संस्कृतीचे अवशेष या कथातून पाहवयास मिळतात.

अद्‌भूतकथेचा आशयाच्या दृष्टीने अभ्यास करू जाता आपल्या लक्षात येते की या कथेत पुरूष किंवा स्त्री ही प्रमुख व्यक्ती असून या व्यक्तीभोवती अद्‌भूततेचे वलय निर्माण केलेले असते. हे वलय चमत्कार, पराक्रम इत्यादी घटकानी निर्माण केलेले

असते. सुष्ट-दुष्ट व्यक्तींचा संघर्ष दाखवून सुष्टानी दुष्टावर मिळविलेल्या विजयाचे वर्णन अद्‌भूतकथेत आढळते. कथेचा प्रारंभ त्यातील प्रमुख व्यक्तीच्या दुःखाने होऊन शेवट सुखाने केला जातो.

अद्‌भूतकथेत सावत्र आईची मुलगी, बंदिस्त स्त्री, सावत्र बहिण, अशी पात्रे असून नायक लहान, नावडतीचा मुलगा असून पुढे चमत्काराने त्यांच्या अंगी पराक्रम बाणविल्या जातो. खलनायकाची निर्मिती हेही अशा प्रकारच्या कथांचे एक वैशिष्ट्य सांगता येईल. अद्‌भूतकथेत दैवाचे किंवा नशीबाचे प्राबल्य असून कथेत अतिमानवी शक्ती, अद्‌भूत शक्ती, प्राणी, इत्यादी नायकास मदत करीत असतात.

अद्‌भूतकथेचा मुख्य उद्देश मनोरंजन असल्याने त्यातील अद्‌भूततेचे वलय अधिक चमत्कारानी गुफलेले आढळते. त्यातील कल्पनाबंधांची रचना अत्यंत गुंतागुंतीची असून ती शोभादर्शक यंत्रातील काचेच्या तुकड्यासारखी दिसते. अतिमानवी योनीतील व्यक्ती, यक्ष, गंधर्व, पऱ्या, किन्नर, राक्षस, नाग, पक्षी इत्यादी या प्रकारच्या लोककथातून आढळतात. अद्‌भुतकथेतील बहुतेक कथा राक्षसांच्या दुष्ट कृत्यानी भरलेल्या पाहवयास मिळतात. कथेतील खलनायकाचे काम राक्षसाकडे, सावत्र आईकडे असते.

मराठी लोककथेतील अशा स्वरूपांच्या कथेतील कल्पनाबंधाचा अभ्यास करू जाता पुढील कल्पनाबंध या कथेतून आढळतात.

१. राक्षसाना सुंदर मुली असतात.
२. राक्षस आपल्या मुलीना बंदिस्त करतो.
३. राक्षसाच्या या मुली आपल्या पित्याविरुद्ध कथानायकास मदत करतात.
४. राक्षसाला बहिण किंवा मुलगी असते.
५. राक्षस मूर्ख असतात.
६. राक्षसाचे मरण पक्ष्यात असते.
७. राक्षसाचा मोठा वाडा असतो.
८. राक्षसाचा घात व नायकाचा विजय होतो.

राक्षसाविषयीच्या या कल्पनाबंधाशिवाय पुढील कल्पनाबंधही अशा स्वरूपाच्या कथेतून आढळतात.

१. पक्षाना माणसाप्रमाणे बोलता येते.
२. पक्ष्यांना मानवाचे भविष्य कळते.
३. सावत्र आई सावत्र मुलीचा छळ करते.
४. मानवी नायकाला प्राण्याची मदत असते.
५. राजाचे दगडात रुपांतर.
६. अतिमानवी योनीतील व्यक्तीना मायिक सिद्धी प्राप्त असते.
७. त्यांना स्वतःचे रूप पालटता येते, अदृश्य होता येते.

या कल्पनाबंधाभोवती प्रसंगाची आणि घटनाची गुंफण करून कथेचा विकास केलेला आपणास पाहवयास मिळतो.

३. दंतकथा किंवा आख्यायिका

लोकजीवनात मौखिक परंपरेने चालत आलेली कथा जी एखाद्या ऐतिहासिक घटनेवर आधारित असते पण मौखिक परंपरेत या कथेचे स्वरूप संपूर्णतः बदलले असते तिला दंतकथा किंवा आख्यायिका म्हणतात. दंतकथा सत्यावर आधारित असते पण ते कल्पनेच्या अवगुठणात इतके गुरफटलेले असते की त्याचे अस्तित्व जाणवतच नाही. दंतकथा म्हणजे एतिहासिक आख्यायिका. आशयाच्या दृष्टीने दंतकथेचे स्वरूप विविध प्रकारचे पाहवयास मिळते.

वस्तुस्थितीला उठाव येण्यासाठी संबंधित व्यक्तीला देवतास्वरूप प्राप्त करून देणे, विशिष्ट स्थलाशी देवतातुल्य व्यक्तींचा संबंध जोडणे आणि ऐतिहासिक सत्याशी संबंध प्रस्थापित करणे इत्यादी प्रयत्न दंतकथातून केलेले आढळतात.

दंतकथातील आशयाच्या-विषयाच्या आधारे या कथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

१. स्थलासंबंधीच्या दंतकथा.
२. ऐतिहासिक व्यक्ती किंवा घटना यांच्या संबंधित दंतकथा.
३. पुरलेल्या धनासंबंधीच्या कथा.
४. वास्तू, घराणे, वस्तू, भूत-पिशाच्च यांच्या संबंधित दंतकथा.

अशा प्रकारच्या दंतकथांचा साकल्याने विचार करू जाता आपल्या लक्षात येते की काही दंतकथा मंदीर, वाडा कोणी बांधला यांचे स्पष्टीकरण करणाऱ्या असतात तसेच एखाद्या वास्तूत भूतांचे वास्तव्य असणे याचीही माहिती काही कथांतून मिळते. तीर्थक्षेत्रे, नदी, डोंगर, देवस्थाने इत्यादी संबंधीच्या दंतकथाही मराठीत उपलब्ध आहेत. स्थानिक दंतकथा गावोगाव ऐकावयास मिळतात.

औंढ्यानागनाथची दंतकथा, नामदेवाच्या चरित्रातील दंतकथा, नरसी (नामदेव) ची दंतकथा, पडक्या वाड्याची दंतकथा, गुप्तधनाची कथा, चिंचेच्या झाडाची कथा इत्यादी दंतकथांची म्हणून उदाहरणे देता येतात.

अशा या दंतकथाचे काही लोकसाहित्य अभ्यासक दोन वर्ग पाडतात ते असे– १. भटकी दंतकथा व २. स्थानिक दंतकथा.

भटक्या दंतकथेचे पर्याय मर्यादित असतात. अशा प्रकारच्या कथा दूरवर पसरलेल्या दिसतात. या दंतकथेचे विस्तार क्षेत्र स्थानिक दंतकथेपेक्षा विशाल असते. वर उल्लेखिलेले वर्गीकरण हे स्थानिक दंतकथाचेच आहे.

स्थानिक दंतकथातून पुढील कल्पनाबंध पाहवयास मिळतात.

१. भूताचा वाडा.
२. अमावस्येच्या रात्री भूत दिसणे.
३. भूत लागणे.
४. श्रीमंत पण चिक्कू सावकार.
५ तांब्याच्या मोठ्या हंडचात धन पुरून ठेवणे.
६. पुरलेल्या धनावर भुजंगाचे राखण.
७. धनप्राप्तीसाठी बळी.
८. रात्री स्वप्नात धन दिसणे.
९. पुरलेले धन काढताना मृत्यू.
१०. वंश बुडणे.
११. भक्तासाठी देव स्वतःची जागा बदलतो.
१२. पाप धुणारी नदी.

इत्यादी कल्पनाबंध आपणास दंतकथांतून पाहवयास मिळतात.

दंतकथा आणि दैवतकथा यांचा जवळचा संबंध असतो. दंतकथातील पात्रे जेव्हा देवदेवताप्रमाणे वागतात तेव्हा या दंतकथांना दैवतकथाचे स्थान प्राप्त होते. बऱ्याचशा दंतकथा या ऐतिहासिक आख्यायिका असल्यामुळे त्यांना पौराणिक घटनांचा पेहराव मिळतो. तरी त्यांचा मूळ गाभा सत्य सृष्टीतलाच असतो त्यामुळे पुढे अशा कथांना दैवतकथाचा दर्जा मिळतो.

४. नीतिकथा

लोककथेच्या या प्रकारास प्राणीकथा किंवा कल्पितकथा असेही म्हणतात. या कथेतील कथानक कल्पित असून एखाद्या घटनेतून एखादे नीतितत्व सूचित केलेले असते. या कथेतील पात्रे बहुधा प्राणीच असतात. आर्ने आणि थॉमसन यानी प्राण्याच्या प्रकारावर आधारित पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आढळते.

१. वन्यपशूच्या कथा.
२. पाळीव प्राण्याच्या कथा.
३. मनुष्य आणि वन्यपशूच्या कथा.
४. पक्ष्यांच्या कथा.
५. मासे किंवा इतर प्राण्यांच्या कथा.

नीतिकथा आकाराने लहान असून त्या स्वतंत्र आणि संपन्न असतात. परदेशात मुलांच्या मनोरंजनासाठी या कथा सांगितल्या जातात. भारतात सांगितल्या जाणाऱ्या नीतिकथा गंभीर स्वरूपाच्या असल्या तरी त्यात उपरोध आणि सूक्ष्म विनोद पाहवयास मिळतो. उपरोधाच्या किंवा विनोदाच्या पाठीमागे नीतितत्व सांगणे हा उद्देश असतो.

ईसापनीतिकथा या अशा प्रकारच्या कथांचे उत्तम उदाहरण आहे. अशा प्रकारच्या कथातून व्यावहारिक आशय पाहवयास मिळतो. धर्मविधीशी या कथांचा कोणताही संबंध असत नाही. अद्‌भूत कथेशी या नीतिकथा किंवा प्राणीकथा यांची तुलना करताना आपल्या लक्षात येते की अद्‌भूत कथेतील प्राणी अतिमानवीशक्तीनी युक्त असतात तर नीतिकथातील प्राणी लौकिक पातळीवर जीवन जगतात. वास्तव मानवी जीवनाचे प्रतिबिंब आपणास या प्राणीकथातून पाहवयास मिळते. या कथातील प्राणी मनुष्याच्या विविध स्वभावांचे प्रतिक असतात. प्राणीसंबंधीचे काही रूढ संकेतही या कथातून आढळतात. कोल्हा हा लबाड व धूर्त व्यक्तीचे प्रतिनिधीत्व करतो. वाघ गर्विष्ट व्यक्तीचे प्रतिक म्हणून वावरतो तर नाग डूख धरणारा समजला जातो. इत्यादी संकेत या कथातून आढळतात.

नीतिकथातून व्यावहारिक सत्याचे आणि मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचे दर्शन होत असल्याने या कथाना उद्‌बोधकता प्राप्त झाली असल्याचे कळते.

नीतिकथांचे हे स्वरूप पाहू जाता त्या प्रगल्भ आणि सुसंस्कृत व्यक्तीकडूनच निर्मिल्या गेल्या असल्या पाहिजे असे वाटते. अशा स्वरूपाच्या प्राचीन कथा महाभारतात आढळतात.

५. वीरकथा

व्यक्तीच्या पराक्रमाचे वर्णन ज्या कथातून आढळते त्यांना वीरकथा किंवा पराक्रमकथा म्हणतात. या पराक्रमाचे स्वरूप बौद्धिक किंवा शारीरिक असते. ऐतिहासिक व्यक्तीच्या पराक्रमकथा मौखिक परंपरेने लोकजीवनात रूढ झालेल्या आढळतात. काही काही वेळा या कथेतील नायकात प्रादेशिक वैशिष्टये दिसून येतात. गावातील, जमातीतील, एखाद्या परिसरातील साहसी पराक्रमी व्यक्तीचे त्याच्या जीवनातील घटना व प्रसंगांच्या आधारे वर्णन केलेले या कथातून पाहवयास मिळते. अशा पराक्रमी व्यक्तिविषयी अभिमान बाळगणे, त्याच्याबद्‌दल आदर व्यक्त करणे, त्याचे स्मरण करणे, त्याची प्रशंसा करणे इत्यादी प्रेरणा या कथेच्या निर्मितीस कारणीभूत ठरतात.

बहिजी नाईक, उमाजी नाईक, तंट्या भिल्ल या कथा वीरकथांची उदाहरणे म्हणून देता येतात.

६. हास्यकथा

ज्या लोककथेतून विनोदनिर्मिती होते किंवा विनोदनिर्मितीसाठी ज्या लोककथा सांगितल्या जातात त्यांना हास्यकथा म्हणतात. अशा प्रकारच्या लोककथांची संख्या मराठीत विपुल आहे. हास्यकथेतील विनोद हा शारीरिक व्यंग, अतिशयोक्ती,

अश्लीलता, ग्राम्यता आणि विसंगती या घटकावर आधारित असतो. व्यक्तीच्या आंधळेपणा, बहिरेपणा, तिरळेपणा, लंगडेपणा, बोबडेपणा या व्यंगावर आधारीत विनोद त्या त्या व्यक्ती चित्रणाद्वारे दाखविलेला असतो. लोककथेतील असा विनोद खालच्या दर्जाचा असतो. मानसिक व्यंगावर आधारलेल्या कथा याही विनोदी स्वरूपाच्याच आहेत. मूर्खमाणसाविषयी, विसराळू माणसाविषयीच्या या कथेत बेमालूपणे विनोद निर्मिती करतात. मराठी लोककथात जावयाच्या मूर्खपणाची कथा, मूर्ख नोकराची कथा, या मानसिक व्यंगावर आधारित हास्यकथांची उदाहरणे म्हणून देता येतात. सामाजिक व्यंगावर आधारित हास्यलोककथाही लोकसाहित्यात आढळतात. निरनिराळ्या जातीतील वैमनस्यावर आधारित ही हास्यकथा उपलब्ध आहेत. भटजी, न्हावी, सुतार, सोनार, मारवाडी इत्यादी संबंधीच्या हास्यकथेत या जातीतील व्यक्तींचा व त्यांच्या स्वभाव धर्माचा उपयोग करून हास्यकथेतून विनोद निर्मिती केल्याचे आढळते.

हास्यकथेतील विनोद निकृष्ट दर्जाचा असला तरी तो खेळकर वाटतो. स्त्री स्वभावाचाही उपयोग लोककथेतून विनोदनिर्मितीसाठी केलेला आढळतो. विशेषत: मंदबुद्धीची स्त्री, असूयावृत्तीची स्त्री, अविश्सवनीय चारित्र्याची स्त्री अशा विविध स्वभावाच्या स्त्रियांच्या वागण्याने घडणाऱ्या घटनेतून विनोदनिर्मिती होते. अशा प्रकारच्या कथेतून एखादी म्हातारीही डोकावून जाते.

हास्यकथेत काही हास्यकथा अश्लील व बीभत्स अशाही असतात. हास्यकथेतून विनोदनिर्मितीसाठी मधून मधुन चुटकेही सांगितलेले जातात.

७. व्रतवैकल्याच्या कथा

या प्रकारच्या कथाना 'कहाणी' म्हणतात. या कहाणीच्या भाषेच्या दृष्टीने, त्यातील गद्यपद्य शैलीने काही लोकसाहित्य विशारद त्यांना लोककथात समाविष्ट करीत नाहीत. आतापर्यंत आपण अभ्यासिलेल्या लोककथांपेक्षा या कहाण्यांची धाटणी वेगळी असली तरी त्यातील आशयाच्या अनुषंगाने आणि लोकजीवनात कहाणीचे असलेले महत्त्वाचे स्थान पाहू जाता या कहाण्या लोककथातच समाविष्ट कराव्यात असे मला वाटते.

कहाणी सांगितल्याने पुण्य मिळते या भावनेतून कहाण्यांची निर्मिती झाली असावी असे वाटते. स्त्री जीवनात या कहाण्यांना फार महत्त्व असते. या कहाण्याचा संबंध एखाद्या व्रताशी, एखाद्या देवतेच्या उपासनेशी वा सणाशी संबंध असतो. व्रतवैकल्यांच्या प्रसंगी कहाणी सांगावयाची असल्याने या कहाण्याभोवती पावित्र्याचे एक वलय निर्माण झालेले आपणास पाहवयास मिळते. एखादे व्रत का करावे ? त्याची सांगता कोणत्या प्रकारे करावी ? या व्रताची फलश्रूती काय ? हे सांगण्याणाठी या कथांची निर्मिती

झाली असावी असे त्यांच्या स्वरूपावरून व त्यातील आशयावरून वाटते. पौष महिन्यातील प्रत्येक रविवारी सूर्यनारायणाच्या साक्षीने कहाणी सांगण्याची प्रथा आजही महाराष्ट्रात पाहवयास मिळते. या प्रसंगी सांगितल्या जाणाऱ्या या व्रत-वैकल्याच्याच कथा होत.

लहान लहान सोपी व सुटसुटीत वाक्य, ठराविक वाक्याची पुनरावृत्ती व मनाची पकड घेणाऱ्या भावना हे या कथांचे विशेष होत. व्रतवैकल्याच्या कथांची भाषा ही गद्य आणि पद्य यांच्या सीमेरेषेवरील असते. या कहाण्यांचे स्वरूपही रचनेच्या दृष्टीने गद्य आणि पद्य यांच्या सीमेरेषेवर असते.

'कहाणी पुण्या आयतवारची', 'व्रताची कहाणी' ही उदाहरणे या कथांची देता येतील.

व्रतवैकल्याच्या कथातून पुढील कल्पनाबंध आपणास पाहवयास मिळतात–

१. गरीब बहिणीचे व्रत
२. श्रीमंत भाऊ
३. मुलांची दैना
४. व्रतपूर्तीत अडचणी
५. दारिद्र्याचा नाश
६. राजाच्या दोन राण्या
७. गरीब ब्राह्मण
८. अन्न देणारी थाळी

येथपर्यंत आपण लोककथेच्या वर्गीकरणाधारे लोककथेचे विविध स्वरूप अभ्यासिले. लोकजीवनात लोककथेला किती महत्त्वाचे स्थान आहे हेही आपण पाहिले. लोककथा-विषयीचा हा ओझरता अभ्यास लोकसाहित्यातील लोककथा हा स्वतंत्र ग्रंथ होईल असा अभ्यास आहे. विस्तार भयास्तव येथे या लोककथांचा थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

लोककथांचे मूल घटक

लोककथांच्या मूल घटकांचा अभ्यास पाश्चात्य लोकसाहित्य विशारदानी व भारतातील लोकसाहित्याच्या अभ्यासकानी करून त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या अभ्यासकांच्या या संदर्भातील अभ्यासाचा मागोवा घेऊन लोककथेचे मूल घटक कोणते याचा आपण विचार करू.

सर रिचर्ड टेंपलच्या मते कथेतील पात्रे, कथेची अभिवृद्धी, अभिवृद्धीला पूरक साधने आणि संपूर्ण घटना हे लोककथेचे चार मूलघटक आहेत. परंतु लोककथांचे विविध स्वरूप पाहू जाता रिचर्ड टेंपल यांचे हे लोककथाविषयक मूलघटक अपूरे आहेत असे वाटते.

लोककथांचा चिकित्सक अभ्यास करताना लोककथांत पुढील बाबींचा समावेश असल्याचे दिसते.

१. कथारूप २. कथेतील व्यक्ती किंवा प्राणी ३. कथेतून व्यक्त होणारे समाज मानस. ४. कल्पनाबंध ५. कथाविशेष ६. कथेची घटना ७. वातावरण निर्मिती ८. कथेचा हेतू ९. कथक १० कथेतील तत्त्व.

लोककथांचे हे घटक लोककथांचे स्वरूप घडवित असतात. या घटकांच्याच आधारे लोककथा विकसित होत असते हे विविध लोककथांचा अभ्यास करतांना आपल्या लक्षात येते. लोककथांचे अनेक विशेष निरनिराळ्या प्रदेशातील लोककथात आढळतात. ठिकठिकाणच्या लोककथात साम्य आढळते आणि हे साम्य पाहूनच लोककथांचे स्वरूप ठरवावे लागते. लोककथेतील सारखा आढळणारा भाग म्हणजे लोककथेचा गाभा होय. यालाच मूलकथा किंवा कथा विशेष Tale Type म्हणतात. कथेचे स्वरूप ठरविताना कथाविशेषाचे फार महत्त्व आहे. या कथाविशेषाच्या आधारे निरनिराळ्या देशातील लोककथांचा अभ्यास आपणास करता येतो. लोककथांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी आपणास कथाविशेषा सोबत कथाविशेषाच्या मूलघटकांची मदत घ्यावी लागते. कथाविशेषाच्या मूलघटकाला कल्पनाबंध म्हणतात. कल्पनाबंध लोककथेत स्थिर राहतो. कथेचा लहानात लहान घटक म्हणजे कल्पनाबंध.

कथेच्या सर्व अंगाना कल्पनाबंधीची गुंफण असते अशा कल्पनाबंधाचे थामसन तीन प्रकार सांगतात. ते असे–

१. कर्ता : यात देवता, असाधारण पशू, आश्चर्यकारक प्राणी, राक्षस, अप्सरा, नाग, मानव.
२. वस्तू : जादूच्या वस्तूंचा यात समावेश केलेला आहे.
३. घटना : कथेत घडणाऱ्या घटनांचा यात समावेश केला आहे.

तेव्हा कल्पनाबंधाचे कथेतील महत्त्व याद्वारे स्पष्ट होते. कल्पनाबंधाशिवाय कथा होऊच शकत नाही असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये. कल्पनाबंध सारखे असूनही लोककथांचे अनेक पर्याय आढळतात याला कारण लोककथांचे कथक, कथांचा हेतू, श्रोते, प्रादेशिकता इत्यादी बाबी होत.

या कल्पनाबंधाच्या अभ्यासाचेही लोकसाहित्यात बरेच प्रयत्न झालेले आहेत.

मराठीत उपलब्ध असलेल्या लोककथांचे हे असे विविध स्वरूप आहे. लोककथाना लोकजीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

लोककथा एका विशिष्टदृष्टीच्या द्योतक आहेत. लोकजीवनात त्या आनंद निर्माण करतात. हसत खेळत एखाद्या घटनेतून त्या कोठलेतरी नीतितत्व सांगून जातात. लोकसाहित्यातील लोककथा म्हणजे एक अमूल्य खजिना होय. या लोककथांची भाषा ही लोकांचीच असल्यामुळे जनमानसावर त्यांची पकड चांगली आहे.

काही लोककथावर काही अभ्यासक ग्राम्यतेचा आक्षेप घेतात. पण लोककथांच्या निर्मितीमागील प्रेरणा व उद्देश पाहू जाता या आक्षेपात काही तथ्य वाटत नाही.

० ० ०

संदर्भ

१. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. ७६, ७८, ७९.
2. Gieschichte der Indischene Literature III : P. 266
३. प्राचीन महाराष्ट्र, शातवाहन पर्व : पृ. ३१०.
४. सरोजिनी बाबर : मराठी लोककथा पृ. २४
५. कुंदनलाल उप्रेती : लोकसाहित्य के प्रतिमान पृ. १४१
६. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. ११९ ते १५०

७. उखाणे

- उखाण्याला पर्यायी शब्द
- उखाण्याचे स्वरूप
- प्रश्नोत्तरी स्वरूपाचे उखाणे
- प्रश्नविरहित उखाणे
- नाव घेण्याचे उखाणे
- व्याहीविहिणीचे उखाणे
- खेळातील उखाणे
- मनोरंजनात्मक उखाणे

लोकसाहित्यात उखाणा हे एक मौल्यवान लेणे आहेत. लोकसाहित्यातील उखाण्यांचे क्षेत्र दालन वेगळे पण आगळे आहे. उखाण्याचा प्रकार फार प्राचीन काळापासून परंपरेने चालत आला असून त्यात नेहमीच नवीन अशी भर पडत आलेली आहे. रामायण, महाभारतात उखाणे घालण्याच्या पद्धतीचा धागा आपणास सापडतो.

लोकसाहित्यातील उखाणा कधी भव्य-दिव्य विचार बोलून दाखवितो तर कधी थट्टामस्करी व मिस्कील विनोद करून गालावर खळी पाडतो तर कधी ऐकणाऱ्या व्यक्तीला कोड्यात टाकतो. अशा या उखाण्याचा उद्देश असतो मनोरंजनातून ज्ञान.

उखाण्याला पर्यायी शब्द

उखाणा या शब्दाला भारतात अनेक पर्यायी शब्द उपलब्ध आहेत. कूट, प्रहेलिका, कोडे, प्रश्न, ब्रह्मोद्य, आयना असेही प्रचलित शब्द उखाणा या प्रकारासाठी उपयोगात आणले जातात. शिवाय निरनिराळ्या जाती-जमातीतही उखाण्याला प्रतिशब्द उपयोगात आणतात. मराठीत कोडे, उखाणा, आहणा किंवा आयना हे शब्द प्रचलित आहेत. कोहडा, उमाण, हुमाण असे शब्द उखाण्यासाठी कुणब्यात रूढ आहेत. हिंदीत उखाण्याला पहेली म्हणतात तर सिंधी भाषेत उखाणी हा शब्द प्रचलित आहे.

उखाण्याचे स्वरूप

उखाणे प्रामुख्याने पुढील दोन स्वरूपात उपलब्ध झालेले आढळतात.

१. कोडी किंवा कूट
२. साधा उखाणा

१. कोडी किंवा कूट

कोडी किंवा कूट याचा अर्थ गूढ अर्थाचे वचन. उखाण्याच्या या स्वरूपात प्रश्न आणि उत्तर यांचा समावेश असतो.

अशा प्रकारच्या उखाण्यात प्रश्न विचारणारा व त्या प्रश्नाचे उत्तर देणारा असे दोन घटक असतात. प्रश्न रूपकाश्रयी असतात. उत्तरात गोपनाचा स्फोट अपेक्षित असतो. अशा प्रकारच्या उखाण्याचा प्राण म्हणजे त्यातील 'गोपन' कूट प्रश्नांच्या अशा उखाण्यास मराठवाड्यात 'तोटका' हा शब्दही काही परिसरात प्रचलित आहे.

अशा स्वरूपाच्या उखाण्याचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे मनोरंजनातून ज्ञान हा असतो. या उखाण्याला सांस्कृतिक परंपरा असते. गूढतेमुळे उखाण्याला एक विशिष्ट सौंदर्य प्राप्त होते. उखाण्याच्या या प्रकारात त्याच्या बाह्यस्वरूपावरून अशा प्रकारच्या उखाण्यांचे दोन वर्ग पुढीलप्रमाणे करता येतात.

१. प्रश्नार्थक रचनेची कोडी.

२. प्रश्न विरहित रचनेची कोडी.

पहिल्या वर्गातील उखाण्याची रचना प्रश्नार्थक असते. उदाहरण म्हणून पुढील उखाणा देता येईल.

पाऊस नाही, पाणी नाही, राव कसे हिरवे ?
कात नाही, चुना नाही, तोंड कसे रंगले ?

अशा उखाण्यात उखाणा घालणारा सुटसुटीत व लयबद्ध रचनेत प्रश्न विचारतो आणि उत्तर देणारा एका शब्दात या प्रश्नांचे उत्तर देतो. त्यातील गोपनाचा स्फोट करतो.

वरील उखाण्याचे उत्तर 'पोपट' असे आहे.

प्रश्नविरहित उखाण्याचे उदाहरण असे–

काळी गाय, ढवळी येणी,
तिघं लागतात तिच्या ध्यानी
एक हिंडे परदेशावाणी ॥

या उखाण्यातही गोपनची क्रिया आहेच. फक्त उखाण्याची रचना प्रश्नविरहित आहे. अशा प्रकारचे उखाणे मराठीत विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत.

१. प्रश्नोत्तरी स्वरूपाचे उखाणे

प्रश्नोत्तरी स्वरूपाच्या उखाण्यांना 'कूट' असेही म्हणतात. प्रश्नोत्तरी उखाण्याचा विस्तार प्रश्न व उत्तर यात असतो. यात दोन घटक असतात. एक प्रश्न विचारणारा व या प्रश्नास उत्तर देणारा दुसरा घटक. या उखाण्यातील प्रश्न रूपकाश्रयी असतात व उत्तरात गोपनाचा स्फोट करून मूलार्थ व्यक्त केला जातो.

अशा स्वरूपांच्या उखाण्याला प्राचीन परंपरा असल्याचे दिसून येते. वेदकाळातील कवींनी रचलेली ब्रह्मोदे आणि सध्या मराठीत प्रचलित असलेली 'कूटे' यांचा अभ्यास करू जाता दोन्हीतील काही साम्य आपल्या लक्षात येते. ब्रह्मोदात प्रश्नोत्तरी स्वरूपाचे बरेच उखाणे आढळतात. प्रश्नोत्तरी स्वरूपातील 'कूट' या उखाण्यास अध्यात्माचा स्पर्श झालेला आढळतो. महाराष्ट्रात 'कलगी-तुऱ्या' च्या प्रकारात अध्यात्मिक आशयावर आधारलेली अनेक कूटे उपलब्ध झालेली आहेत. वेदात कूटे आणि कूटकथानक स्वतंत्र प्रकारात आढळतात. महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला विचारलेले प्रश्न कूटाच्याच स्वरूपाचे आहेत. काही कूटे कथानकावर आधारलेली असतात त्यांना कूटकथानक म्हणतात. अशा कूटकथानकाचे उदाहरण आपल्याला हेमचंद्राच्या त्रिषष्टिशलाकापुरुष चरिताच्या परिशिष्ट पर्वात सापडते.

कूटे आणि कूटकथानक सुरूवातीला स्वतंत्र प्रकारात आढळतात पण पुढे मात्र त्यांची सांगड घातलेली दिसते. अध्यात्मावर आधारित कूटकथानके नाथ संप्रदायात आढळतात. कलगीतुऱ्याच्या लावणीत प्रश्नोत्तराच्या रूपाने एखादे कथानक विकसित होत जाते. अशी कूटकथानके महाभारत, रामायण, भागवत इत्यादी पौराणिक विषयावर आधारलेली आहेत. अशा कूटकथानकाना काही अभ्यासक 'लौकिक ग्रामगीते' म्हणून संबोधतात.

प्रश्नोत्तरी स्वरूपाच्या उखाण्याचा एक विशेष म्हणजे प्रश्नात आणि उत्तरात पद्यात्मक असते. एक चरण प्रश्नांचा असून दुसरा चरण पहिल्या चरणात विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा असतो. प्रश्नोत्तरी स्वरूपाच्या या उखाण्याचे उदाहरण म्हणून दुर्गा भागवत यानी पुढील उखाणा दिला आहे.[१]

प्रश्न :

कोठे सांगा ही कांचननगरी
तिथे कोण तो तप करी
ह्याचे पासून कोण नारी
गुरु पुत्रा याचा शोध करी
सृष्टीची रचना कशी झाली केव्हा
आकाश तारे निर्मिले कोणी तेव्हा
प्रश्न करीतो अडूरवाला
उत्तर देइ रे गुरूच्या मुला ॥

उत्तर :

एकवीस स्वर्ग तो कांचननगरी
तेथे गौतम ऋषी तप करी
तेथे हो जन्मली गोमाता आई
खरे सांगतो, शोध तू घेई

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
दा. क्र. 3239
शाखा (स्थळ प्रत)

माये पासून उत्पन्न सारे
तेहतीस कोटी देवांचे पसारे
अगस्ती पासून निर्माण तारे
सृष्टी ही निर्मिली त्या मायेने रे
सीताराम राजापूरवाला
प्रश्नाचा जवाब देतो तुला ॥

याप्रमाणे प्रश्नोत्तर करीत करीत कूटातील कथानक विकसित होत जाते.

प्रश्नोत्तररुपी उखाण्यांचा विधीशी संबंध असल्याचे काही ठिकाणी पाहवयास मिळते. बंजारा जमातीत लग्नविधीत प्रश्नोत्तररूपी उखाणे घालण्याची प्रथा काही ठिकाणी पाहवयास मिळते. गोंड जमातीत मर्तिकाच्या विधीशी अशा उखाण्यांचा उपयोग करतात.

तर काही काही प्रश्नोत्तररूपी उखाणे मनोरंजनाच्या उद्देशाने अवतरतात.

दिवसा ढवळघा मुक्काम करतो
रात्री बाहेर निघतो
कोण असा फिरे प्रवासी
दिवा बांधून डुंगणाला ?

उखाण्यातील प्रश्नोत्तरी स्वरूपाच्या उखाण्यात विषयाची विवधता असते. ते सांगण्याचे एक स्वतंत्र वैशिष्टये असते. उखाण्यातील पद लालित्य वैशिष्टयपूर्ण आणि कलात्मक असते. रूपकाच्या आश्रयानी केलेली गुंफण आश्चर्यचकित करणारी असते, कोड्यात टाकणारी असते. प्रश्नोत्तरी स्वरूपाच्या उखाण्याचे स्थूलमानाने दोन वर्ग पडतात. एक प्रश्न आणि उत्तर हे दोन्ही घटक पद्यात्मक असतात व दुसरा वर्ग प्रश्न फक्त पद्यात्मक असतो व या प्रश्नाचे उत्तर फक्त एका शब्दात देता येते. रचनेच्या दृष्टीने अशा उखाण्यांचे स्वरूप सुटसुटीत, सहज आकलनीय असले तरी त्यातील गूढ किंवा गोपन सहजतया उकलत नाही.

प्रश्नविरहित उखाणा

प्रश्न विरहित उखाण्याची रचना साधी, सोपी व सहजस्फूर्त असते. यात फक्त गोपनक्रिया असते. या उखाण्यांची रचना गद्यात्मक असली तरी ती पद्याकडे अधिक झुकलेली आढळते.

उखाण्यातील आशय, त्यामागील उद्देश या तत्त्वाआधारे प्रश्नविरहित उखाण्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते-

१. नाव घेण्याचे उखाणे
२. व्याह्मीविहीणीचे उखाणे

३. खेळातील उखाणे
४. मनोरंजनात्मक उखाणे.

अशा स्वरूपांच्या उखाण्यांना साधे उखाणेही म्हणतात.

१. नाव घेण्याचे उखाणे

महाराष्ट्रात उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा आहे. नुसतेच नाव घेतले तर पतीचे आयुष्य कमी होते अशी एक समजुत असल्याने उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा प्रचलित आहे. अशा स्वरूपाच्या उखाण्याला मराठीत आयणा असाही एक शब्द रूढ आहे. नाव घेण्याच्या उखाण्याचे स्वरूप पद्यात्मकच असते. उखाण्याच्या पहिल्या ओळीत साजेशे वर्णन असते आणि दुसऱ्या ओळीत नावाची कलात्मक गुंफण असते. अशा प्रकारच्या उखाण्यात प्रतिपक्षाकडून उत्तराची अपेक्षा नसते. कल्पकता व भावसौंदर्य हे या उखाण्यांचे विशेष होत.

नाव घेण्याच्या उखाण्याच्या निर्मितीमागील प्रेरणा अभ्यासनीय आहे. नाव सांगणे म्हणजे विनाश पावणे ही कल्पना या उखाण्याच्या पाठीमागे असते. स्त्रीने व पुरूषाने नेहमीच व्यवहारात एकमेकांचे नाव उच्चारावयाचे नाही व प्रसंगविशेषी उखाण्यातून ते उच्चारावयास हरकत नाही या समजुतीतून उखाण्यांची निर्मिती झाली असावी. नैमित्तिक कारणासाठीच नवऱ्याचे नाव उखाण्यातून घेणे याचा स्पष्ट उल्लेख एकनाथांच्या 'रुक्मिणी स्वयंवरा'त १५ ते १८ अध्यायात आलेला आहे तो असा–

न कळे भीमकीचे लाघव, सकळही म्हणती धन्यभाव
आता घेऊनिया नाव, पायमागे कृष्णाचे ॥ ५४ ॥

रुक्मिणीला नाव घेण्याबद्दल केलेला हा उल्लेख स्पष्ट आहे. यावरून वधुवरांनी एकमेकांची 'नावे घेणे' व ती घेताना विशिष्ट तऱ्हेची शब्द रचना करून त्यात नावे गुंफणे या पद्धतीचे अस्तित्व स्पष्ट होते. काहीशी चमत्कृतीजन्य, लयबद्ध आणि संयमक अशी वाक्यरचना अशा प्रकारच्या उखाण्यातून आढळते. कल्पकतेला अशा उखाण्यात महत्त्वाचे स्थान असते. अशा प्रकारच्या उखाण्यातून विविधता, नाविन्य आणि बदलत्या समाजस्थितीचे दर्शन आपणास घडते.

सोन्याची बुगडी, मोत्याचा घोस
× × रावांचं नाव घ्यायची मला हौस

हा उखाणा आणि पुढील उखाणा यातून स्त्री जीवनातील अलंकाराचे दर्शन घडते.

सोन्याची पाटली, हाताला दाटली
× × रावांच नाव घेताना खुशाली वाटली.

अर्थपूर्ण आणि समर्पक शब्दयोजना हे उखाण्यांचे एक वैशिष्ट्य होय. चमत्कृतीजन्य रचनेचे उदाहरण म्हणून पुढील उखाणा देता येईल.

ताड फाड
रामफळाचं झाड
सोन्याची चौकट
रुप्याचा पाट
खोलीत खोली
खोलीत अंजीर भात
अंजीत भातावर साजुक तूप
× × रावांच रामा सारख रूप

अशा या उखाण्यात कल्पकता आहे, लय आहे आणि चमकृतिजन्य रचना आहे. आपल्या पतिदेवाचे नाव घेण्यासाठी वधूने केलेला हा कल्पनाविलास आकर्षक आहे. अशा स्वरुपांच्या उखाण्यातील शब्द सौष्ठव लक्षात घेण्याजोगे आहे. अशा उखाण्यातून कौटुंबिक नातीगोती, सणासुदींचे विशेष, घराण्यांची रीत–भाव, इत्यादींची कलात्मक गुंफण पाहवयास मिळते. उखाणा सांगणाऱ्याचे बुद्धिवैभव ही या उखाण्यातून दिसून येते.

२. व्याही-विहिणीचे उखाणे

लग्नप्रसंगी विशेषतः रुखवताच्या प्रसंगी थट्टा मस्करी करून हास्याचे तुषार उडविण्यापलिकडे अशा स्वरूपांच्या उखाण्यांची झेप जात नाही. व्याही-विहिणीच्या या उखाण्यात अश्लीलता अधिक प्रमाणात आढळते.

या उखाण्यात प्रश्नोत्तरे नसली तरी संवाद आणि तोही एकमेकाना टाकून बोलण्याचा असल्याने या उखाण्यांचे स्वरूप जरा झोंबरेच असते. लग्नात मानपानाच्या प्रसंगी थट्टा-मस्करी करताना या उखाण्यांचा उपयोग केला जातो. या प्रसंगी विहिणीची थट्टा करण्याकडेच साऱ्यांचा रोख असतो.

आला आला रुखवत, त्यात होता गोंडा
विहिणबाईला बसाया द्या धोंडा

असे मिस्कील स्वरूप उखाण्यात असते. हा उखाणा एवढ्यावरच थांबत नाही तर–

आला आला रुखवत, त्यात होती नोट
विहिणबाई मागती पँट आणि कोट

आणि हाच उखाणा पुढे अश्लिलता धारण करतो तो असा–

आरकराची नथ, तिला परकराचा दाणा
इव्हाही म्हणतो इहिणबाई

पलंगावरती का याना
येते दादा ये, पण फजितीला भेते

किंवा पुढील उखाणा पहा–

मांडवाच्या दारी पडल टिपरं
विहिणीला पोर झाल झिपरं

आणि झिपऱ्या पोराच कारण पुढीलप्रमाणे सांगण्यात येते.

असू द्या दादा; रात्री निजाया गेली होती
तेव्हा नवऱ्याला आलं फेफरं
तेव्हा पोर झाल झिपरं ॥

व्याही–विहिणीच्या संबंधी असे अनेक अश्लिल उखाणे आढळतात. भारतात निरनिराळ्या प्रदेशात व जमातीत लग्नप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गीतांचा अभ्यास करताना या गीतातील सांकेतिक अश्लिलता आपल्या लक्षात येते. असा हा उखाणा सामान्यत: स्त्रीयातच आढळतो व्याही-विहिणीच्या उखाण्यात गालाला.'खळी पाडणाऱ्या उर्खाण्यांची संख्या फारच कमी आढळते. अशा स्वरूपाच्या उखाण्यातून रुखवताच्या साहित्याचे, सामाजिक व शारिरीक व्यंगाचे आणि जीवनातील विसंगत प्रसंगांचे वर्णन केलेले आढळते.

या उखाण्यांच्या रचनेचा विचार करताना आपल्या लक्षात येते की काही उखाणे दोन चरणी असून सयमक आहेत तर काही उखाणे तीन चरणी असून दुसऱ्या व तिसऱ्या चरणाच्या शेवटी यमक साधलेले आहे याचे उदाहरण पुढीलप्रमाणे देता येइल–

रुखवत आला रुखवत
दणाणली आळी । उघडून पाहिलं तर दीड पोळी

याशिवाय काही उखाणे चार ते सहा चरणाचेही उपलब्ध झालेले आहेत. आटोपशीर रचना, ठसकेबाजपणा आणि लय हे विशेष अशा प्रकारच्या उखाण्यातून पाहवयास मिळतात.

खेळातील उखाणे

साध्या उखाण्याचा किंवा प्रश्नविरहित उखाण्याचा तिसरा प्रकार म्हणजे खेळातील उखाणा हा होय. या उखाण्यांची सांगड एखाद्या खेळाशी घातली जाते. महाराष्ट्रात फुगडी किंवा झिम्मा किंवा 'कोणीही यावे, टिकली मारून जावे' वगैरे खेळ खेळताना उपयोगात आणलेल्या उखाण्यांच्या प्रथेबद्दल दुर्गा भागवत म्हणतात.[२] "मूळचे हे नाचाचे

प्रकार विधीशी संलग्न असावेत व त्यानंतर विधी नष्ट झाल्यावर नाच व गीतांची किंवा प्रश्नोत्तर रूप उखाण्याची प्रथा बदलून तिचे परिवर्तन प्रचलित पारंपारिक उखाण्यात झाले असावे."

खेळातील उखाण्यांचे स्वरूप पाहू जाता दुर्गा भागवतांचे हे विचार योग्य वाटतात.

फुगडीत दोन मुली असतात. गिरक्या घेऊन नाचताना त्या एकमेकीस उखाणा घालतात. यावेळी घालण्यात येणाऱ्या उखाण्यात एकमेकींची थट्टा केलेली असते. एकमेकांच्या व्यंगाचेही व दुषणांचेही वर्णन या उखाण्यातून आढळते. अशा उखाण्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे:-

समोर होता कोनाडा, त्यात होता पेडा
मैनीला नाही कळल, तिचा नवरा होता येडा
नवरा होता येडा, बाई नवरा होता येडा
त्याला आवडे लांड्या शेपटीचा गौडा

आणि या उखाण्याला दुसरी मैत्रिण उत्तर देते त्याचे स्वरूपही एकमेकांचे वर्म काढण्यासारखेच आहे. हे पुढील उखाण्यातून स्पष्ट होते-

समोर होता कोनाडा, त्यात होता आणा
ठकीला नवरा भेटला काणा, बाई काणा
असा नवरा लई शाहणा, बाई शाहणा
का ग ठके त्याच्याकडे जाईना

असे स्पर्धात्मक स्वरूप अशा प्रकारच्या उखाण्यांचे असते. एकमेकीना असे उखाणे घालून फुगडी रंगत जाते. फुगडीच्या गती बरोबरच उखाणाही गती घेत असतो- आणि या गतीतूनच एकमेकांची वर्मे काढून उत्तरात वरचढपणा करावयाची वृत्ती वाढत जाते.

काही काही उखाण्यातून या स्पर्धेचा अभाव आढळतो. अशा उखाण्यांचे स्वरूप सामान्यच असते. स्पर्धा नसलेल्या उखाण्याचे एक उदाहरण पुढीलप्रमाणे आहे-

वर आला दिवस, दारी होती तुळस
तुळशीला होत्या मंजुळा, मला तुझा लळा
पानाचा मळा, घालू माळा
सुटली शाळा
शाळातला मास्तर, पाहतो घुर घुर
करतो किर किर

नाचता येइना, बोलणं जमना
कसं सांगू तुला, तुझी जोडी मला
जोडीत जोडी, आपली जोडी
लोक डोळं मोडी, काय सांगू खोडी
येइना मोडी, लिहिते बाराखडी ॥

मनोरंजनात्मक उखाणे

केवळ मनोरंजनाच्या हेतूने अस्तित्वात आलेला उखाण्याचा हा प्रकार आहे. मनोरंजनाचे हे उखाणे पुरूष वर्गात अधिक प्रमाणात प्रचलित आहेत. या उखाण्याचे स्वरूप कोडयासारखेच आहे पण अत्यंत सुटसुटीत असा हा उखाणा असतो. संध्याकाळी पुरुष मंडळी गप्पा गोष्टी करावयास बसले की या उखाण्यांना रंग चढतो आणि मग उखाणे सांगण्याची स्पर्धा सुरू होते. अशा या उखाण्यांची उदाहरणे पुढील प्रमाणे देता येतात–

१. पाच दार – (पवा)
२. वळचणीला खवा– (केस)
३. दुधावरचा फेस – (लोणी)
४. जेवणात जी – (करंजी)
५. वैरणात बा – (कडवा)

असे सुटसुटीत व मोजक्या शब्दाचे स्वरूप असते या उखाण्यांचे एकाने उखाणा सांगावयाचा व दुसऱ्याने तात्काळ उत्तर द्यावयाचे या पद्धतीने हे उखाणे चालत असतात. मोजके व समर्पक शब्द हे या उखाण्यांचे एक वैशिष्टय होय.

येथपर्यंत आपण उखाणा किंवा कोडी यांचे स्व प पाहिले. उखाण्यांचे स्वरूप असे विविधतेने नटलेले आहे. उखाण्याच्या विविध घडणी आकर्षक असून अर्थपूर्ण आहेत. पुरुष वर्गात कोडी तर स्त्रियात उखाणे प्रचलित आहेत. उखाणे केव्हा घालावेत म्हणजेच उखाण्यांचा वापर केव्हा आणि कोणत्या प्रसंगी करावा. या प्रसंगी दुर्गा भागवत म्हणतात,[३]

"ज्यावेळी गावाचे, जमातीचे किंवा घराण्यांचे भवितव्य धारेवर धरलेले असते त्यावेळी उखाण्यांचा वापर करावयाचा असतो. पावसाचे आवाहन, धान्याची लावणी, सुंता, शिकार, लग्न आणि मर्तिक वगैरे प्रसंगी उखाण्याचा वापर होणे साहजिकच आहे."

पण उखाण्यांचा वापर याच प्रसंगी करण्यात येतोच असे आढळत नाही. लग्नप्रसंगी व मर्तिकाचे वेळी उपयोगात आणल्या जाणाऱ्या उखाण्यांचा अपवाद

सोडता बाकी उखाणे केव्हाही उपयोगात आणले जातात. चार चौघे पुरूष मंडळी किंवा स्त्रिया एकत्र आल्या की उखाण्याना सुरूवात होते. साध्या उखाण्यांचा अभ्यास करताना एक गोष्ट आपल्या लक्षात येते की अशा प्रकारच्या उखाण्यात अक्षर मात्रा यांच्या संख्येचे बंधन नसते. डॉ. कमलाबाई देशपांडे उखाण्याला अपौरूषेय वाङ्मयातील अनुष्टुभ छंद म्हणतात ते योग्यच वाटते. उखाण्यात सांगण्याच्या पद्धतीत समतत्त्व (symmetry) व संवादित्व (hormony) ही सौंदर्यतत्त्वे असतात आणि त्यामुळेच साधा उखाणा वैशिष्टचपूर्ण वाटतो.

उतरंडीवर उतरंड, त्यावर होते पात
सांग माझा उखाणा, नाहीतर उपटीन तुझे कान

या उखाण्याचा त्यातील सौंदर्यतत्त्वानी आपण विचार करू लागली तर दोन ओळी लागोपाठ कानावर पडल्याने समतत्त्व व शेवटी आलेल्या यमकामुळे संवादित्व निर्माण होते व रचना कानाला मधुर लागते. डॉ. कमलाबाई देशपांडे[३] उखाण्याला पद्यरचनेचा पाया म्हणतात ते यामुळेच. उखाण्यांचे स्वरूप, त्यातील सौंदर्यतत्वे पाहू जाता उखाण्यांचा समावेश पद्यातच करावा असे मला वाटते.

० ० ●

संदर्भ

१. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. २५१
२. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. २७०
३. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. २३३

८. म्हणी,वाक्संप्रदाय आणि लोकसमजुती

- म्हणींचे स्वरूप
- म्हणींची परंपरा
- म्हणींचे वर्गीकरण
- नात्याच्या संबंधीत म्हणी
- शरीर अवयवावरून प्रचलित म्हणी
- प्राणीविषयक म्हणी
- विरोध, उपहास, विसंगती दर्शक म्हणी
- धर्म, व्यवहार, नीति संबंधीच्या म्हणी
- इतर प्रकारच्या म्हणी
- वाक्संप्रदाय
- वाक्संप्रदायाचा अर्थ
- वाक्संप्रदायाचे वर्गीकरण
- लोकसमजुती
- लोकसमजुतीचे वर्गीकरण
- आचारविषयक लोकसमजुती
- दृष्टीबाधेविषयीच्या लोकसमजुती
- भूतपिशाच्चविषयक लोकसमजुती
- मसणजोग्याविषयीच्या लोकसमजुती
- शुभअशुभाच्या लोकसमजुती
- सापाविषयीच्या लोकसमजुती
- इतर लोकसमजुती.

लोकजीवनातील म्हणी व वाक्संप्रदाय

लोकजीवनातील म्हणी व वाक्संप्रदाय याना लोकसाहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. लोकजीवनात प्रचलित असलेल्या म्हणी व वाक्संप्रदाय यांच्या पाठीमागे एक विशिष्ट परंपरा असते. लोकजीवनातील विविध अनुभव त्यांच्या पाठीमागे असतात. लोकजीवनातून या म्हणी व हे वाक्प्रचार अविष्कृत झालेले असल्यामुळे लोकजीवनाचे विविध

पलू आपल्याला या म्हणीतून व वाक्प्रचारातून पाहवयास मिळतात. मराठी लोकजीवनातील प्रचलित म्हणी व वाक्प्रचारांच्या साहाय्याने आपण लोकसाहित्याच्या या वेगळ्या पण आगळ्या प्रकाराचे स्वरूप पाहू या.

म्हणींचे स्वरूप

अगदी मार्मिकपणे, मोजक्या शब्दात मोठे सत्य सांगणारे वचन म्हणजे म्हण होय असे क्राप म्हणतो.[१] अलेक्झांडर क्रापच्या या व्याख्याने म्हणीचे सुटसुटीत स्वरूप आपल्या लक्षात येते. म्हणीतून व्यक्त होणारे सत्य हे लोकजीवनातून व्यक्त होणारे असते. या सत्याला लोकजीवनाचा स्पर्श झालेला असतो. मोजक्या व सुटसुटीत शब्दांच्या म्हणी पद्याकडे झुकलेल्या असून ठसकेबाज असतात.

म्हणीतून व्यक्त होणाऱ्या सत्याची चर्चा करताना दुर्गा भागवत म्हणतात[२].

"हे सत्य प्रगट करण्याच्या तीन तऱ्हा संभवतात.

१. अपूर्ण स्थितीचे दिग्दर्शन
२. अतिशयोक्ति वर्णन
३. रूपकाचा आश्रय"

म्हणींचे स्वरूप व त्यातून व्यक्त होणारा आशय पाहू जाता दुर्गा भागवत यांचे वरील विचार योग्य वाटतात.

म्हणींच्या मांडणीचा विचार करताना आपल्या लक्षात येते की म्हणीची मांडणी सूत्रबद्ध असून तिची धाटणी साहित्यिक असते. साहित्यिक शैलीतून व्यक्त करण्याचे सामर्थ्य म्हणीत असते.

म्हणीला ठसकेबाजपणा येण्यासाठी प्रास आणि पद्याभास या दोन साहित्यिक गुणांची अत्यंत आवश्यकता असते. या साहित्यिक गुणाशिवाय म्हण वैशिष्ट्यपूर्ण होऊच शकत नाही असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्रास आणि पद्याभास यामुळेच म्हणीचे लोकजीवनातील अस्तित्व जाणवते.

लोकजीवनाच्या सार्वत्रिक अनुभवाचा आधार म्हणीला असल्यामुळे म्हणीतून सामूहिक जीवनाचा आविष्कार होतो असे म्हणता येईल. यामुळे निरनिराळ्या लोकसमूहात एकाच अर्थाच्या म्हणी सापडतात आणि म्हणूनच म्हण म्हणजे लोकमानसाने आत्मसात केलेली उक्ती होय.

म्हणींची परंपरा

लोकजीवनात रूढ झालेल्या म्हणींना कित्येक शतकांची परंपरा आहे. युरोपात तर म्हणींच्या अभ्यासाला एके काळी फार चालना मिळाली होती. ॲरिस्टॉटलने इसवीसनापूर्वी दुसऱ्या शतकात म्हणींचा अभ्यास करण्यास सुरूवात करून तिच्यातील

मोठा आशय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणींची पहिली व्याख्या करण्याचा मान ॲरिस्टॉटलचाच. ॲरिस्टॉटलने म्हणीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे[३].

"Proverbs are remarks which on account of their shortness and correctness have been saved out of the wreck and ruins of ancient philosophy."

ॲरिस्टॉटलच्या या व्याख्येन्वये म्हणीचे सुटसुटीत स्वरूप आणि आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य आपल्या लक्षात येते. म्हणीसाठी स्पेन देश तर जगप्रसिद्धच आहे. म्हणींचा अभ्यास अनेक लोकसाहित्य विशारदानी करून शास्त्रीय मीमांसा करण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. डॉ. डाह्‌ल याने म्हणीचा शास्त्रीय अभ्यास करून एक कोशही तयार केला. डाह्‌लच्या मते 'राष्ट्राच्या म्हणी म्हणजे राष्ट्राच्या लौकिक विधेयकांची स्मृतीच होय.' म्हणीना Peoples Voice असेही संबोधतात.

'Proverbs are the daughters of daily experience' असेही वर्णन आपल्याला म्हणींचे करता येते.

म्हणी जगभरच्या वाङ्‌मयात आढळतात. म्हणींचा पर्याय सहसा आढळत नसला तरी पाश्चात्य व पौर्वात्य म्हणींची सादृश्ये पाहवयास मिळते.

भारतातही म्हणीची प्राचीन परंपरा आपणास पाहवयास मिळते. प्राचीन भारतीय वाङ्‌मयात सुभाषितांची विपुलता आणि संपन्नता आढळते. सूक्तिवाङ्‌मयात सूक्तांचे सुटसुटीत स्वरूप आपणास पाहवयास मिळते. सुभाषितांचा उगम संहितेत आढळतो. अशी सुभाषिते म्हणजे आज प्रचलित असलेल्या म्हणींचे मूळ रूप होय असे म्हणावेसे वाटते. आशय आणि अभिव्यक्ती यादृष्टीने सुभाषित आणि म्हण यात फरक असतो हे मान्य करूनही सुभाषित आणि म्हणी यांचा जवळचा संबंध नाकारता येत नाही. प्राचीनकाळात म्हणीसाठी वापरलेला दुसरा शब्द सापडत नाही म्हणून म्हणीची परंपरा पाहताना आपणास सूक्तांचा, सुभाषितांचा आधार घ्यावा लागतो. ब्राह्मण वाङ्‌मयात सुभाषित हा शब्द प्रथम वापरलेला सापडतो. ब्राह्मण वाङ्‌मयातील सुभाषिताचे स्वरूप गाथेसारखे आहे. गाथेचे दोन चरण असून अनुष्टुभ छंद असतो. या गाथेचे उदाहरण पुढीलप्रमाणे आहे.

आस्ते भग आसीन स्योर्ध्वं तिष्ठति तिष्ठतः ।
शेते निपद्य मानस्य चरति चरतो भगः ॥

(बसणाऱ्याचे भाग्य बसते, उठणाऱ्याचे भाग्य उठते, निजलेल्याचे भाग्य निजते आणि चालणारांचे भाग्य चालते.) यावरून अनेक म्हणींचा उगम सुभाषितातून झालेला आपणास पाहवयास मिळतो. 'भितीला कान असतात' या म्हणीचा उगम 'कर्णिनी वै भूमिः' या जैमिनीय ब्राह्मणातील सुभाषितात सापडतो.

रामायण, महाभारत आणि स्मृतिग्रंथात अनेक सुभाषिते आढळतात. तेव्हा सुभाषित, सूक्ते, लोकोक्ती, लौकिकप्रवाद या संस्कृत शब्दानी सूचित झालेल्या म्हणी व वाक्प्रचार या वाङ्मयीन प्रकाराची सांस्कृतिक परंपरा अभ्यसनीय आहे.

म्हणी आणि उखाणे यांचा तुलनात्मक अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की या दोन्ही प्रकारांची शैक्षणिक पार्श्वभूमीच आहे. म्हणी आणि उखाणे यांची सांस्कृतिक परंपरा अत्यंत प्राचीन आहे. उखाण्यात खटकेबाज विनोद व मार्मिकपणा असतो तसाच खटकेबाजपणा म्हणीतही असतो. म्हणीत रूपकाचा आश्रय घेतलेला असतो तसाच रूपकाश्रय उखाण्यातही पाहवयास मिळतो. उखाणा आणि म्हण यांच्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे उखाण्याचा कथेशी संबंध येत नाही पण म्हण कथेशी संबंधित असू शकते. अर्धचंद्र, सतीचेवाण, एखाद्या वस्तूत जीव गुंतणे, खापर फोडणे, बोळवण करणे, कावळा शिवणे, गुडघ्याला बाशींग बांधणे, बाजारात तुरी–, पडत्या फळाची आशा, पांघरून घालणे इत्यादी वाक्संप्रदायाच्या पाठीमागे कथांची परंपरा असल्याचे आपल्या लक्षात येते.

म्हणींचे स्वरूप व त्यामागील परंपरा पाहू जाता आपल्या लक्षात येते की जुना अनुभव सूत्रबद्ध करून सांगताना म्हणींची निर्मिती होते. एकाच अर्थाच्या म्हणी निरनिराळ्या लोकसमूहात, निरनिराळ्या प्रांतात प्रचलित झालेल्या पाहवयास मिळतात. अलिखित म्हणींची संख्या विपुल प्रमाणात उपलब्ध होते. अशिक्षित, अडाणी आणि ग्रामीण भागातील लोकांच्या बोलीत तर म्हणींचा व वाक्प्रचारांचा सहज व सर्रास वापर होत असतो.

म्हणींचे वर्गीकरण

म्हणीतील आशयांच्या दृष्टीने म्हणीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

१. नात्यासंबंधीच्या म्हणी.
२. पशु, पक्षी इत्यादी विषयक म्हणी.
३. विरोध व उपहासात्मक म्हणी.
४. धर्म, नीति, अनुभव आणि व्यवहारज्ञान संबंधीच्या म्हणी.
५. इतर प्रकारच्या म्हणी.

१. नात्याच्या संबंधावरून प्रचलित असलेल्या म्हणी

आई, बाप, भाऊ, बहिण, गुरु, शिष्य आणि मित्र या मानवी नात्याच्या संबंधावरून अनेक म्हणी मराठी लोकजीवनात प्रचलित आहेत. अशा स्वरूपाच्या काही म्हणी पुढील प्रमाणे आहेत.

१. आई जेवू घालीना, बाप भीक मागू देईना.
२. आजा मेला नातू झाला.

३. कामा पुरता मामा.
४. गुरुची विद्या गुरुलाच कळली.
५, बडे बाप के बेटे.
६. बाप तसा बेटा.
७. बाप दाखव नाही तर श्राद्ध कर.
८. लेकीस बोले सुनेस लागे.

२. शरीर अवयवावरून प्रचलित असलेल्या म्हणी

माणसाच्या शरीर अवयवांचा उपयोग करून तयार झालेल्या म्हणींची संख्या मराठीत विपुल प्रमाणात आढळते. अशा प्रकारच्या काही म्हणी खालीलप्रमाणे आहेत.

१. आंधळा मागतो एक डोळा अन् देव देतो दोन.
२. आधी पोटोबा मग विठोबा.
३. आपलेच दात आपलेच ओठ.
४. आले अंगावर घेतले शिंगावर.
५. उचलली जीभ लावली टाळघाला.
६. एका हाताने टाळी वाजत नाही.
७. काखेत कळसा गावात वळसा.
८. काना मागून आला तिखट झाला,
९. तोंड धरून बुक्क्याचा मार.
१०. दोन डोळे शेजारी भेट नाही संसारी.
११. पाचही बोटे सारखी नसतात.
१२. लेकराचे पाय पाळण्यात दिसतात

३. पशु, पक्षी आणि प्राणीविषयक म्हणी

निरनिराळ्या प्राण्यांचा उल्लेख असलेल्या काही म्हणींची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. अग अग म्हशी मला कोठं नेशी ?
२. अति शहाणा त्याचा बैल रिकामा.
३. उंदराला मांजर साक्षी.
४. उंटावरून शेळ्या हाकणे.
५. कसायाला गाय धारजीण.
६. कावळ्याच्या शापाने ढोर मरत नाहीत
७. कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच.
८. कोल्हा काकडीला राजी.
९. गाढवांचा गोंधळ लाथांचा सुकाळ.

१०. गाढवाला गुळाची काय चव ?
११. गोगलगाय अन् पोटात पाय.
१२. घोडा मैदान जवळ आहे.
१३. डोंगर पोखरून उंदीर काढणे.
१४. बैल गेला अन् झोपा केला.
१५. वराती मागून घोडे.
१६. वासरात लंगडी गाय शहाणी.
१७. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर.

४. विरोध, उपहास आणि विसंगती दर्शक म्हणी

दोन गोष्टीतील विरोध किंवा विसंगती दर्शविणाऱ्या म्हणींचा समावेश या वर्गात करता येतो. अशा प्रकारच्या काही म्हणी पुढीलप्रमाणे आहेत.

१. असेल त्या दिवशी दिवाळी, नाही तेव्हा शिमगा.
२. आयजीच्या जीवावर बायजी उदार.
३. आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास.
४. आपण हसे लोकाला, शेंबूड आपल्या नाकाला.
५. आपला हाथ जगन्नाथ.
६. उतावळा नवरा गुडघ्याला बाशींग.
७. एक ना धड भाराभर चिंध्या.
८. खायला काळ, भूईला भार.
९. गावचा रांडया, घरचा देशपांडया.
१०. चोराच्या उलटया बोंब्या.
११. चोराच्या मनात चांदणे.
१२. जेवीन तर तूपाशी, नाही तर उपाशी.
१३. ताकाला जाऊन भांडे लपविणे.
१४. न खाल्या देवाला नैवेद्य.
१५. नाव मोठं लक्षण खोटं.

५. धर्म, व्यवहार नीति संबंधीच्या म्हणी

अशा प्रकारच्या म्हणी पुढीलप्रमाणे आहेत.

१. अडला नारायण गाढवाचे पाय धरी.
२. अंथरूण पाहून पाय पसरावे.
३. एक घाव दोन तुकडे.
४. ऐकावे जनाचे करावे मनाचे.

५. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ.
६. कोळसा उगाळावा तितका काळाच.
७. खाण तशी माती.
८. गरज सरो वैद्य मरो.
९. गर्वाचे घर खाली.
१०. घरोघरी मातीच्या चूली.
११. दगडा परीस इट मऊ.

६. इतर प्रकारच्या म्हणी

आशयाच्या दृष्टीने विविधता असलेल्या व वरील वर्गात समाविष्ट न केलेल्या म्हणी या वर्गात मोडतात. अशा स्वरूपाच्या काही म्हणी पुढीलप्रमाणे आहेत.

१. इकडे आड तिकडे विहीर.
२. कर नाही त्याला डर नाही.
३. गाडग्या बरोबर नळाची यात्रा.
४. घरचे झाले थोडे व्याहयाने धाडले घोडे.
५. चावडीवर दरोडा.
६. दिल मे चंगा तो कारवड मे गंगा.
७. पदरी पडले पवित्र झाले.
८. रोज मरे त्याला कोण रडे.

येथपर्यंत आपण आशयाच्या दृष्टीने म्हणीतील विविधतेचा परामर्श घेतला. रूढार्थ व्यक्त करण्याची किमया म्हणीत असते हेही आपण पाहिले. लोकजीवनाचा आणि म्हणींचा दाट संबंध आहे. म्हणीतून व्यक्त होणारा आशय आणि म्हणीचे स्वरूप पाहू जाता लघुता, व्यावहारिकता आणि चिताकर्षकता तसेच लोकमान्यता हे चार गुण म्हणीत असणे अत्यंत आवश्यक आहे. वचन किंवा वाक्य समाजाला पसंत पडून त्यास मान्यता मिळाली की त्या वचनाला किंवा वाक्याला म्हण ही संज्ञा प्राप्त होते. म्हणीत धर्म आणि नीति यांचा बोध असलाच पाहिजे असे नाही. या ऐवजी लोकजीवनातला अनुभव किंवा एखादा चटकदार दृष्टांत असला तरी म्हण वैशिष्ट्यपूर्ण होऊ शकते.

वाक्संप्रदाय

वाक्संप्रदाय व म्हणी यांचे सोपपत्तिक विवेचन करण्याच्या मार्गात बऱ्याच अडचणी येतात. कित्येकवेळा एखादा संप्रदाय निरनिराळ्या स्वरूपात निरनिराळ्या लोकसमूहात प्रचलित असतो तेव्हा संप्रदायाचे स्वरूप, त्यातील सत्यता ठरविताना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. मराठीत संस्कृत, हिंदी, गुजराथी अशा निरनिराळ्या भाषेतून वाक्संप्रदाय आणि म्हणी आल्या आहेत.

वाक्संप्रदायाचा संबंध कित्येकवेळा दंतकथेशी, धर्मविषयक समजुतीशी, आचार-विचाराशी येत असल्यामुळे अशा वाक्संप्रदायाची उपपत्ती लावण्याचे काम जरा कठीणच होते. प्रस्तुत प्रकरणात मराठीतील वाक्संप्रदायाचा ओझरताच परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

वाक्संप्रदायाचा अर्थ

कधी कधी शब्द, पद किंवा वाक्य यांचा अर्थ मूळ अर्थाहून भिन्न अर्थाने वापरला जातो. अशा शब्दाना, पदाना किंवा वाक्प्रचारांना वाक्संप्रदाय म्हणतात. वाक्संप्रदाय या शब्दासाठी इंग्रजीत Idiom हा शब्द वापरल्या जातो.

शब्दाच्या मूळ अर्थाहून भिन्न अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य वाक्संप्रदायात असते आणि म्हणूनच इतर शब्दापेक्षा वाक्संप्रदाय वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. विशेष प्रकारच्या अर्थाने रूढ झालेल्या शब्दाना किंवा शब्दसमूहाना वाक्संप्रदाय म्हणतात.

लोकजीवनात अशा वाक्संप्रदायाना विशेष महत्त्व असते. लोकजीवनातील अनुभवातून हे वाक्संप्रदाय साकार होत असतात. लोकजीवनातील विविध अनुभवांची परंपरा या वाक्संप्रदायांच्या पाठीमागे असते. लोकजीवनातून सहजस्फूर्त आविष्कारीत होणारे हे वाक्संप्रदाय लोकजीवनात रूढ झालेले आहेत. लोकसाहित्याच्या अभ्यासात अशा वाक्संप्रदायांचा आणि म्हणीचा महत्त्वाचा सहभाग असतो.

वाक्संप्रदायाचे वर्गीकरण

मराठी भाषेत वाक्संप्रदायांचे दालन भव्य आणि संपन्न आहे. वाक्संप्रदायाचे रूप आणि अर्थ यादृष्टीने पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१. ऐतिहासिक, पौराणिक किंवा इतर कथा यांच्या संबंधाने झालेले वाक्संप्रदाय.
२. संख्यावाचक शब्दावरून झालेले वाक्संप्रदाय.
३. धर्मविषयक संस्कार व नीति यासंबंधीचे वाक्संप्रदाय.
४. प्राणी, पशु, पक्षी, इत्यादीवरून झालेले वाक्संप्रदाय.
५. खेळातील वाक्संप्रदाय.
६. भांडण आदि परिस्थितीतून निर्माण झालेले वाक्प्रचार.
७. इतर भाषेतून मराठीत आलेले वाक्संप्रदाय.
८. व्यापार, शेती, धंदे वगैरे संबंधाचे वाक्संप्रदाय.
९. किरकोळ वाक्संप्रदाय.

मराठीतील वाक्संप्रदायाच्या आशय आणि अभिव्यक्ती यांच्या आधारे स्थूलमानाने वरीलप्रमाणे वर्गीकरण करता येते. या सर्व प्रकारच्या वाक्संप्रदायाचा सविस्तर अभ्यास करणे विस्तार भयास्तव येथे तरी अशक्य आहे. या सर्व प्रकारच्या वाक्संप्रदायाचा साकल्यानेच व ओझरता परामर्श घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

मराठीत एकाच शब्दाचे अनेक वाक्संप्रदाय प्रचलित आहेत. शब्द एक असला तरी त्यातील रूढार्थ लक्षणीय आणि अभ्यासनीय असतो हे नाकारता येत नाही. एकाच शब्दाच्या वाक्संप्रदायाचे काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतात.

१. अर्धचंद्र–गचांडी देणे
२. अर्धांगी–पत्नी
३. अष्टपैलू–अनेक गुणांनी युक्त
४. अक्षरशत्रू–निरीक्षर
५. उपटसुंभ–दुसऱ्याचे हक्क दाबून वर चढलेला
६. एळकोट–गोंधळ
७. कर्णपिशाच्च–गुप्त बातम्या सांगणारा
८. काथ्याकूट–व्यर्थ चर्चा
९. कूपमंडूक–संकुचित वृत्तीचा माणूस
१०. कोल्हेकुई–क्षूद्र लोकांची ओरड
११. खुशालचंद–विलासी माणूस
१२. गोगलगाय–निरुपद्रवी माणूस
१३. चटकचांदणी–सुंदर स्त्री
१४. चुकारतट्टू–कामचुकार
१५. तिस्मारखाँ–योग्यता नसलेला मिजासखोर माणूस
१६. नंदीबैल–अक्कलशून्य
१७. न्हाती धुती–वयात आलेली
१८. भागूबाई–भित्रा माणूस

एकाच शब्दात रूढ अर्थ व्यक्त करण्याची किमया या वाक्संप्रदायात पाहवयास मिळते.

पौराणिक, ऐतिहासिक किंवा इतर कथाच्या आधारे रूढ झालेले अनेक वाक्संप्रदायात मराठीत आढळतात. या वाक्संप्रदायाचा संबंध पौराणिक, ऐतिहासिक घटनेशी जोडलेला असतो. अशा स्वरूपाचे काही वाक्संप्रदाय पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अहिल्याबाई–साध्वी स्त्री
२. आनंदीबाई–कारस्थानी स्त्री
३. कर्णाचा अवतार–दानशूर व्यक्ती
४. कळीचा नारद–लाव्या लाव्या करणारा
५. कुंभकर्ण–दीर्घ काळ झोपणारा माणूस
६. कुबेर–अतिशय श्रीमंत

७. कैकेयी–दुष्ट स्त्री
८. चाणक्य–कारस्थानी माणूस
९. जमदग्नि–रागीट मनुष्य
१०. त्राटिका–कजाग स्त्री
११. धर्मराज–न्यायी व धर्मनिष्ठ माणूस
१२. भीष्मप्रतिज्ञा–खडतर प्रतिज्ञा
१३. मारुतीचे शेपूट–लांबत जाणारी गोष्ट
१४. रामराज्य–आदर्श राज्य
१५. लंकेची पार्वती–दरिद्री स्त्री

पौराणिक, ऐतिहासिक घटना, प्रसंग आणि व्यक्ती यांचा संदर्भ स्पर्श झालेले वाक्संप्रदाय त्यातील मूळ अर्थ सोडून भिन्न अर्थ व्यक्त करतात.

संख्यावाचक शब्दावरून लोकजीवनात रूढ असलेले काही वाक्संप्रदाय पुढील प्रमाणे आहेत.

१. अठरा धान्याचे कडबोळे–अनेक गोष्टींचे मिश्रण
२. अवाचे सवा–बेहिशोबी
३. इजा बीजा तीजा–तीन वेळा
४. चतुर्भुज होणे–कैद होणे
५. चवदावे रत्न–मारणे
६. चारी वाटा मोकळ्या–स्वच्छंदाने वागणे
७. छक्के पंजे–युक्त्या
८. छत्तीसचा आकडा–भांडण
९. नवकोट नारायण–श्रीमंत
१०. नव्याचे नऊ दिवस–नवे कौतुक

शरीर अवयवाच्या शब्दावरूनही काही वाक्संप्रदाय रूढ झालेले आहेत ती पुढीलप्रमाणे:–

१. कावळा शिवणे–
२. कपाळ फुटणे–दुर्दैव ओढवणे.
३. काखा वर करणे–दिवाळे काढणे
४. कान टोचणे–दोष देणे
५. काना डोळा करणे–दुर्लक्ष करणे
६. केसाने गळा कापणे–विश्वासघात करणे
७. डोळ्यात धूळ फेकणे–फसविणे
८. तोंडसुख घेणे–बोलणे (अशक्य)
९. थोबाड रंगविणे–मारणे
१०. पाय फुटणे–चालणे

शरीर अवयवाच्या संबंधावरून आलेले हे वाक्संप्रदाय बराच मोठा अर्थ सांगून जातात.

धर्म, रीति व शास्त्रे इत्यादी संबंधातून काही वाक्संप्रदाय झालेले आढळतात. त्यातील काही येणेप्रमाणे–

१. उदक सोडणे–दान करणे
२. करणी करणे–अचाट कृत्य करणे
३. गुळाचा गणपति–बुळचा स्वभावाचा माणूस
४. गोंधळ घालणे–घोटाळा करणे
५. जन्माची गाठ–नेहमीचा संबंध
६. तळी उचलणे–अधिकारच्युत करणे
७. तुळशीत भांग–चांगल्यात वाईट
८. बारशाचे जेवणे–अधिक वस्ताद असणे
९. शनीचा फेरा–साडेसाती
१०. सतीचे वाण–निश्चयी स्त्री

निरनिराळ्या खेळाच्या संबंधानेही काही वाक्संप्रदाय साकार झालेली आहेत ती अशी–

१. आखाड्यात उतरणे–लढण्यास तयार होणे
२. कुरघोडी करणे–दुसऱ्यावर वर्चस्व चालविणे
३. चीत करणे–पराभूत करणे
४. पिंगा घालणे–फिरत राहणे
५. शह देणे–लाभ होण्यास लक्ष ठेवणे

मराठीत उपलब्ध झालेले काही वाक्संप्रदाय व्यापार, व्यवसाय वगैरे संबंधाचीही आहेत. अशा प्रकारच्या वाक्संप्रदायांची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. आंधळा कारभार–अंदाधुंदीचा कारभार
२. इळा मोडून खिळा करणे–मूल्यवान वस्तू निर्मूल्य करणे
३. खुशीचा सवदा–मर्जीप्रमाणे वागणे
४. पदरी माप घालणे–देणे
५. सोन्या सारखे मोजणे–मोजकेच वजन करणे.
६. वकील पत्र देणे–एखाद्याची बाजू घेणे

नेहमीच्या जीवनात संघर्ष पदोपदी येतो. व्यक्ती व्यक्तीच्या स्वभावातील फरकामुळे काही वेळा भांडणाचे, वादविवादाचे प्रसंग येतात. अशा भांडणादि प्रसंगाच्या संबंधित काही वाक्संप्रदाय सहज मुखावटे निघून मनातील एकमेकाविषयीचा राग व्यक्त करून जातात त्यातील काही वाक्संप्रदाय पुढीलप्रमाणे आहेत–

१. आग पाखडणे–दोष देणे
२. आग लावणे–भांडण लावणे
३. आग्या वेताळ–तापट मनुष्य
४. कणीक तिंबणे–मारणे
५. कुभांड रचणे–आळ घेणे
६. खोड मोडणे–तीव्र उपाय करणे
७. नांगी टाकणे-निष्प्रभ होणे
८. हरबऱ्याच्या झाडावर चढविणें–खोटी स्तुती करणे
९. होळी करणे–नाश करणे

इतर भाषेतून मराठीत अनेक वाक्संप्रदाय आलेले आहेत. त्यांची उदाहरणे अशी–

१. जीवश्च कंठश्न–जिवलग (संस्कृत)
२. न भूतो न भविष्यति–अपूर्व गोष्ट ,,
३. भवति न् भवती–वाद ,,
४. मनःपूतं समाचरेत–स्वैर वर्तन करणे ,,
५. कफल्लक–दरिद्री (हिंदुस्थानी)
६. घी देखा लेकिन बडगा नही देखा–नफा दिसतो पण तोटा दिसत नाही. ,,
७. दर्यामे खसखस–अल्प प्रमाण ,,
८. वखत पडे बाका तो गधे को बोले काका–कठीण समय येता हलक्या माणसालाही महत्त्व देणे ,,
९. बापसे बेटा सवाई–अधिक हुशार ,,
१०. बुढ्ढी घोडी लाल लगाम–म्हाताऱ्याने तरूणासारखे राहणे ,,
११. मियाँ मूठभर दाढी हात भर–मुख्य गोष्टीपेक्षा गौण गोष्टीस महत्त्व देणे ,,

इतर काही वाक्संप्रदाय

१. अकलेचा खंदक–मूर्ख
२. अंग धरणे–लठ्ठ होणे
३. अठरा गुणांचा खंडोबा–नेहमी आजारी असणारा
४. अडेल तट्टू–हट्टी
५. आंधळ्याची काठी–आधार
६. अवदसा आठवणे–दुष्ट/वाईट कृत्य करण्याची बुद्धी येणे
७. अक्षत देणे–बोलाविणे
८. आकाशाला गवसणी घालणे–आवाक्याबाहेरची गोष्ट करणे
९. उंटावरचा शहाणा–मूर्खपणाचा सल्ला देणारा

१०. एरंडाचे गुऱ्हाळ–कंटाळवाणे भाषण
११. कुत्र्याचे मूत–तुसडया स्वभावाचा माणूस
१२. खरवड काढणे–कान उघाडणी करणे

असे विविध वाक्संप्रदाय मराठीत सापडतात. केवळ वाक्संप्रदायावर एखादा ग्रंथ तयार करता येईल एवढी विपुल संख्या मराठीत वाक्संप्रदायाची आहे. ग्रंथ विस्तार भयास्तव प्रस्तुत प्रकरणात अशा वाक्संप्रदायाचा ओझरता परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी लोकजीवनात असे वाक्संप्रदाय रूढ झालेले असल्याने व या वाक्संप्रदायाना जीवनातील अनुभवांचा स्पर्श झालेला असल्यामुळे लोकजीवनाची विविधता यातून कळू शकते. शिवाय म्हणी व वाक्संप्रदाय यांच्यामुळे भाषेला वेगळे सौष्ठव प्राप्त होते हाही एक विशेषच होय.

लोकसमजुती

लोकजीवनात लोकसमजुतीना बरेच महत्त्व असल्याचे आढळते. लोकजीवनात परंपरागत चालत आलेल्या रूढींचा, लोकसमजुतींचा व लोकभ्रमांचा समावेश लोकसाहित्यात करणे आवश्यक वाटते. कारण या लोकसमजुती लोकजीवनाचे अविभाज्य अंग असते. लोकसमजुतींचा अभ्यास करताना लोकजीवनातील श्रद्धा, आचारविचार व लोकमानस इत्यादी महत्त्वाच्या बाबी आपल्या लक्षात येतात. निरनिराळ्या जाती-जमातीमध्ये प्रचलित असलेल्या लोकसमजुतींचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही लोकसमजुती आचारविषयक आहेत, काही दृष्टीबाधा किंवा बाहेरबाधा विषयीच्या आहेत. लोकसमजुतींच्या पाठीमागे प्राचीन परंपरा आहेत. लोकजीवनाचा विकास प्राचीन काळापासून होत आल्यामुळे प्राचीन काळातील लोकसमजुतीच्या द्वारा त्या जीवनाचे काही अवशेष आपणास पाहवयास मिळतात. लोकसमजुतीच्या अभ्यासाने लोकस्वभा वाचीही ओळख आपणास होते. लोकजीवन आणि लोकसमजुती यांचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की स्त्री जीवनात लोकसमजुतीना विशेष स्थान आहे याला कारण स्त्रियांचा हळवा व श्रद्धाशील स्वभाव होय.

आशयाच्या दृष्टीने लोकसमजुतींचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे मांडता येईल.

१. आचारविषयक लोकसमजुती

१. विस्तवावर थुंकू नये.
२. उंबरठ्यात शिकू नये.
३. दाराची कडी वाजवू नये.
४. निजलेल्या माणसास ओलांडू नये.
५. ऊन पाण्यात 'इसाण' घातल्याशिवाय स्नान करू नये.
६. दोघांच्या मधून विस्तव नेऊ नये.
७. दक्षिणेकडे पाय करून झोपू नये.

अ. क्र. 3239
24888

८. पालथे झोपू नये.
९. तेल, तूप बरोबर आणू नये.
१०. हळदीच्या अंगाने बाहेर जाऊ नये.

२. दृष्टिबाधेविषयीच्या काही लोकसमजुती

लोकजीवनात अशी समजूत आहे की, लहान मूल, सुंदर इमारती, प्राणी यांना दृष्टिबाधा होते. लहान मूलास दृष्टिबाधा झाल्यास ते किर किर करते त्याला ताप येतो. इत्यादी प्रकार होतात अशी समजूत आहे. दृष्टबाधा काढण्याच्या काही विधीही पाहवयास मिळाल्या आहेत. दृष्टबाधेसंबंधीच्या काही लोकसमजुती पुढीलप्रमाणे आहेत.

१. लहान मूल आजारी पडल्यास त्याला दृष्ट लागली असे समजतात.
२. दृष्टिबाधा होऊ नये म्हणून गळ्यात काळा दोरा किंवा केसाळी बांधावी.
३. प्राणी, (गाय, म्हैस, गोरा, शेळी इ.) यांनाही दृष्टीबाधा होते.
४. इमारतींनाही दृष्टीबाधा होते.
५. दृष्टीबाधा झालेले अन्न खाल्ल्यास 'पायरव' होतो. (जेवण जात नाही.)
६. दृष्टीबाधा होऊ नये म्हणून मुलाच्या डोळ्यात काजळ घालावे. गालावर काजळाचे बोट लावावे.
७. मूल वाचत नसल्यास, जिवंत राहत नसल्यास त्याचे ओबड धोबड नाव ठेवावे. उदाहरणार्थ, उकंडी, दगडया, झिपरी इ.
८. मूल वाचत नसल्यास त्याच्या पायात 'बेडी' घालावे.
९. लहान लेकराला मांडवाखालून घेऊन जाऊ नये, प्रेतयात्रेसमोर जाऊ नये, नवीन बाळंत झालेल्या बाईजवळ जाऊ देऊ नये.
१०. 'बाहेर बाधा' झालेल्या व्यक्तीवरून अंडी, कोंबडी उतरून टाकणे.
११. दृष्टिबाधा झालेल्या व्यक्तीवरून लिंब ओवाळून टाकणे.
१२. 'सोबनी' हा आजार मुलाला झाल्यास चांभारांच्या कुंडातील पाण्याने त्यास आंघोळ घालावी.
१३. मुलाच्या पोटातले आल्यास गाढविणीचे दूध पाजावे.
१४. दृष्टीबाधा फडयाने, केरसुणीने किंवा खेटराने काढावे.

३. भूतपिशाच्चाविषयीच्या काही लोकसमजुती

मराठी लोकजीवनाची पाहणी करताना आढळून आले की येथील लोकांचा भूतपिशाच्चावर विश्वास आहे. भूत लागणे, चेटूक करणे, भूत उतरविणे, मांत्रिक इत्यादी गोष्टींवर येथील लोकांचा विश्वास आहे. भूतपिशाच्याविषयीच्या काही लोकसमजुती पुढीलप्रमाणे आहेत.

१. अमावस्येच्या रात्री भूते नाचतात.

२. तेलकट, तूपकट खाऊन भरदुपारी बाहेर गेल्यास भूतबाधा होते.
३. हळदीचे अंग असलेली नवरी भरदुपारी बाहेर गेल्यास भूतबाधा होते.
४. माणसाची एखादी इच्छा अतृप्त राहिल्यास ते भूत बनते.
५. चिंचेच्या झाडावर भूत असते.
६. राम राम म्हणून नाव घेतल्याने भूत पळते.
७. बाळंतीणबाईला भूत लवकर लागते.
८. 'येऊ का ?' म्हणून भूताने विचारल्यास 'ये' म्हणून उत्तर दिल्यास भूत जवळ येत नाही.
९. अस्वलाचा केस जवळ बाळगल्यास भूतबाधा होत नाही.
१०. न्हाऊन बाहेर गेल्यास भूतबाधा होते.
११. गरोदर स्त्री किंवा बाळंतीण वारल्यास ती हडळ बनते.
१२. पंचधातूची अंगठी किंवा कडे जवळ बाळगल्यास भूतबाधा किंवा चेटूक लागत नाही.
१३. तेलकट पदार्थ भूतपिशाच्चांना आवडतात.

४. मसणजोग्याविषयीच्या काही लोकसमजुती

मसणजोग्याबद्दलही काही लोकसमजुती लोकजीवनात रूढ आहेत. त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत.

१. मसणजोगी जादूटोणा करतात.
२. मसणजोगी भूतपिशाच्चासोबत बोलतात.
३. बाळंतीणबाईवर मसणजोग्याची वाईट नजर असते.
४. मसणजोगी पुरलेले प्रेत उकरून काढतात.
५. घराचा 'मसणवाटा' करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते.

५. शुभअशुभाच्या काही लोकसमजुती

१. सुतार पक्षी झाडावर बसला असताना त्या झाडाला पाच फेऱ्या घालण्याने लाभ होतो.
२. मुंगसाचे तोंड दिसल्यावर लाभ होतो.
३. भरलेली घागर पुढे आल्यास जात असलेले काम होते.
४. झोपेत रडणे चांगले.
५. घुबडाला उंबरठ्यात पुरल्यास घरात समृद्धी येते.
६. पिंपळाच्या झाडाची नित्यनेमाने पूजा केल्यास संकटे येत नाही.
७. पाच चा आकडा शुभ असतो.
८. मांजर आडवी गेल्यास अशुभ समजतात.

९. पाल अंगावर पडल्यास किंवा तिने चुक चुक केल्यास अशुभ घटना घडते.
१०. शनिवारी किंवा अमावस्येच्या दिवशी उडदाचे पदार्थ करणे अशुभ समजतात.
११. विधवा, नपुसक, यांचे सकाळीच तोंड पाहणे अशुभ.
१२. वारीक, परदेशी तेली किंवा तेली यांचे सकाळी तोंड पाहू नये.
१३. दारासमोर कुत्रे रडणे अशुभ समजतात.
१४. रात्रीच्या वेळी घरावर घुबड ओरडल्यास अशुभ घटना घडते.
१५. झोपेत हसणे वाईट आहे.
१६. शनिवारी किंवा अमावस्येच्या दिवशी घरात तूप, तेल आणि लाकडे आणू नये.
१७. कावळ्याची लागण पाहणे अशुभ आहे.
१८. टिटवी ओरडणे अशुभ असते.

६. सापाविषयीच्या लोकसमजुती

१. सापाची 'लागण' पाहणे भयसूचक असते.
२. नागाच्या डोक्यावर पृथ्वी असते.
३. नाग पाताळात राहतात.
४. साप एखाद्या माणसाचा डूख धरतो.
५. भुजंग बारवात असतात.
६. सापाची कात जवळ बाळगल्यास साप दंश करीत नाही.

७. इतर लोकसमजुती

१. घरच्या नाटीखाली झोपल्यास वाईट स्वप्ने पडतात.
२. उशाला लोखंड किंवा खेटर घेतल्यास वाईट स्वप्ने पडत नाहीत.
३. चेटूक करणाऱ्या माणसास आळघा पडतात.
४. डोक्यावरची जखम उघडी टाकू नये.
५. रात्रीच्या वेळी सापाला साप न म्हणता जीवजंतू म्हणावे.
६. रात्रीच्या वेळी कात देऊ नये.
७. सापाच्या दंशास 'पान लागणे' म्हणून संबोधावे.
८. रजस्वला स्त्रीने पाटाच्या पाण्याला स्पर्श केला व ते पाणी ऊसाला दिले तर ऊस किडका होतो.
९. कहाणी सांगितल्याने पुण्य मिळते.
१०. अमावस्येच्या दिवशी स्त्रीने विवस्त्र अवस्थेत मारुतीला पाणी घातल्यास पुत्रप्राप्ती होते.
११. मुलाच्या किंवा मुलीच्या पाचव्या दिवशी सटवी येऊन आयुष्याचा 'लेखा' लिहून जाते.
१२. तळपाय सपाट असणे भाग्याचे लक्षण समजले जाते.

१३. स्त्रीचा डावा डोळा लवल्यास अशुभ घटना घडते.
१४. पुरुषाचा उजवा डोळा लवत असल्यास अशुभ घटना घडते.
१५. मरीआईच्या अवकृपेने साथीचे रोग फैलावतात.
१६. प्रवासाला निघताना सोबत लिंबू न्यावे.
१७. नवा कपडा धुवून वापरावा.
१८. कावळा अंगणात ओरडू लागल्यास पाहुणे येण्याची शक्यता असते.
१९. सूर्यग्रहण पाहिल्यास दृष्टी जाते.
२०. पोपईच्या बीया ओलांडल्यास 'रातआंधळे' लागते.
२१. पौर्णिमेच्या रात्री चंद्राकडे पाहिल्यास दृष्टी सतेज होते.

अशा प्रकारच्या विविध लोकसमजुती लोकजीवनात रूढ झालेल्या आढळतात. लोकसाहित्यात लोकजीवनातील या रूढ लोकसमजुतीना महत्त्वाचे स्थान आहे. लोकसाहित्य हे लोकजीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करीत असल्याने लोकसाहित्याची व्याप्ती विशाल आहे. त्यात लोकजीवनाच्या परंपरेने चालत आलेल्या आणि कृतीतून आणि उक्तीतून प्रगट होणाऱ्या स्वरूपांचाही समावेश करता येतो.

या लोकसमजुतीशिवाय काही तोडगेही लोकजीवनात पाहवयास मिळतात. दृष्टीबाधा उतरण्यासाठी, निरनिराळ्या आजारावरील निरनिराळे तोडगे, लोकजीवनात रूढ असल्याचे आढळते. या सर्वांचा सविस्तर अभ्यास करणे येथे तरी शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचा ओझरता उल्लेख करण्याचा येथे अल्पसा प्रयत्न केला आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने लोकजीवनातील धार्मिक आणि सामाजिक स्वरूपांच्या काही विधीही महत्त्वाच्या आहेत. बंजारा जमातीतील लग्नातील गाणी, पोतराजांची गाणी, गोंधळ्याचा गोंधळ, जागर इत्यादी स्वरूपांची लोकगीते की जी धार्मिक विधीशी संबंधित असतात त्यांचा आणि लोकसाहित्याचा घनिष्ठ असा संबंध आहे. असे अनेक विधी लोकजीवनात महत्त्व पावलेले आहेत. गावाचे रक्षण करणाऱ्या दैवताला संतुष्ट करण्यासाठी करण्यात असलेले विधी, बळी देणे, मरीआईचा 'गाव बांधण्याचा' विधी, बारा गाड्या ओढण्याचा विधी, रेडा, बोकड, कोंबडा बळी देण्याचा विधी, बारव पुजण्याचा विधी इत्यादी विधींचा अभ्यास लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे हे नाकारता येत नाही.

० ० ०

संदर्भ

१. अलेक्झांडर क्रॉप : द सायंस ऑफ फोक्लोअर पृ. १४३
२. दुर्गा भागवत : लोकसाहित्याची रूपरेखा पृ. २७६
3. Long oriental : Page 2.
proverbe and their uses.

९. लोकसाहित्यातून आविष्कृत झालेले लोकजीवन

- लोकसाहित्य आणि लोकजीवन
- लोकसाहित्यातून आविष्कृत झालेले समाजजीवन
- लोकसाहित्यातून घडणारे लोकसंस्कृतीचे दर्शन
- लोकसाहित्यातून व्यक्त होणारे स्त्री-जीवन
- लोकसाहित्यातून घडणारे अलंकार दर्शन

लोकसाहित्य आणि लोकजीवन

लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य लोकसाहित्य विशारदांनी लोकसाहित्य हे परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा आविष्कार आहे हे लक्षात घेऊनच लोकसाहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीनेही अभ्यास केलेला आहे याला कारण लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचे अभिन्नत्व होय. लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार होय. समाजाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीची नोंद लोकसाहित्यात असल्याने या जीवनाचे विविध पैलू आपल्याला लोकसाहित्यात पाहवयास मिळतात. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा जवळचा संबंध आपण यापूर्वी अभ्यासिला आहेच. लोकसाहित्य लोकजीवनाशी कसे निगडित असते, एकरूप झालेले असते हेही आपण पाहिले.

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचे अभिन्नत्व सांगताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात[१], "लोकजीवनाशी निगडित असणे, लोकजीवनाचा त्यातून सतत आविष्कार होणे, लोकजीवनाचे अविभाज्य अंग असणे ही लोकसाहित्याची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत." यावरून लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा परस्परसंबंध आपल्या लक्षात येतो. लोकसाहित्यातून लोकजीवनाचा आविष्कार होत असतो आणि लोकसाहित्यातील प्रेरणानुसार लोकजीवन घडत असते.

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा हा परस्परसंबंध लक्षात घेऊनच प्रस्तुत प्रकरणात मराठी लोकसाहित्यातून आविष्कृत होणाऱ्या लोकजीवनाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. लोकजीवनाची जीवन जगण्याची पद्धती, लोकजीवनातील आचार-विचार, विधी आणि लोकसंस्कृती इत्यादीचे प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले पाहवयास मिळते. लोकजीवनाच्या विविध भावात्मक रंगछटाही लोकसाहित्यात पाहवयास सापडतात.

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यातील परस्परावलंबी व परस्परपूरक घटक पाहू जाता आपल्या लक्षात येते की लोकसाहित्याची निर्मिती लोकजीवनातूनच होत असते. लोकजीवनातूनच लोकसाहित्य आकारास येत असते. लोकजीवनातील काही अनुभवातूनच लोकसाहित्याचे काही घटक आकार घेत असतात म्हणजेच लोकसाहित्यातील या घटकांना लोकजीवनाचा स्पर्श झालेला असतो. 'कल्हई करणे' हा लोकसाहित्यातील पर्यायाने लोकजीवनातील रूढ वाक्प्रचार एक उदाहरण म्हणून देता येईल. 'कल्हई करणे' या वाक्प्रचाराची निर्मिती विशिष्ट लोकजीवनाच्या अवस्थेतूनच झाली आहे. या वाक्प्रचाराच्या पाठीमागे विशिष्ट लोकजीवनाची परंपरा आहे. या वाक्प्रचाराप्रमाणेच इंगा फिरविणे, कच्चे मडके, कान टोचणे, चांभार चौकशी इत्यादी वाक्प्रचार विशिष्ट लोकजीवनातून साकार झालेले दिसतात. तसेच लोकजीवनातील काही आचार-विचार, प्रथा लोकसाहित्यातून व्यक्त होताना दिसतात. लोकजीवनातील विविध जातीजमातीतील विधीनाही लोकसाहित्यात अत्यंत महत्त्व आहे. या विधी आणि लोकगीते यांचा जवळचा संबंध आहे. लग्नाचा विधी, मर्तिकेचा विधी, बाळजन्माचा विधी, सण उत्सव, कुळाचार इत्यादी विधींचा आणि गीतांचा संबंध असल्याचे लोकसाहित्याच्या अभ्यासाने आपल्याला कळते. लोकजीवनातील या विधीत गीतांना मंत्राइतके महत्त्व असल्याचे जाणवते. लोकसाहित्यातील प्रेरक घटक म्हणून लोकजीवनातील या विधीना म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये आणि म्हणूनच लोकसाहित्यातून व्यक्त होणारा प्रत्येक अनुभव हा जिवंत अनुभव असून तो लोकजीवनातूनच लोकसाहित्यात साकार झालेला असतो. लोकजीवनाचे स्वच्छ आणि स्पष्ट प्रतिबिंब आपणास लोकसाहित्यात पडलेले दिसते. मानवी जीवनातील सुखदुःखाच्या भावना, धीर गंभीर प्रसंग आणि मानवी स्वभावाच्या विविध छटा आपणास लोकसाहित्यात पाहवयास मिळून लोकसंस्कृतीचे दर्शनही आपणास त्यातून घडते.

मराठी लोकसाहित्यातून आविष्कृत होणारे लोकजीवन विविध प्रकारचे असून त्यातून लोकजीवनाच्या विविध छटा व लोकजीवनाची विविध वैशिष्ट्ये पाहवयास मिळतात. या लोकजीवनाचा अभ्यास पुढील घटकांच्या आधारे या प्रकरणात केला आहे.

१. सामाजिक जीवन
२. स्त्री-जीवन
३. अलंकार दर्शन
४. वेशभूषा
५. मराठी लोकसंस्कृती.

१. सामाजिक जीवन

लोकसाहित्यातून व्यक्त होणारे समाजजीवन आणि समाजमन वैशिष्ट्यपूर्ण असून सामाजिक जीवनाचे अनेकविध विशेष त्यात पाहवयास मिळतात. लोकसाहित्यातून

आविष्कृत होणाऱ्या समाजजीवनाचे विविध पैलू पाहवयास मिळतात. निरनिराळचा जातीजमातींचे त्यांच्या वैशिष्टयासह, आचार-विचार पद्धतीसह आपणास लोकसाहित्यातून दर्शन घडते. निरनिराळ्या सामाजिक अवस्था, समाजजीवनात होणारे परिवर्तन आणि या सामाजिक परिवर्तनास साह्यभूत ठरलेले घटक यांचीही ओळख लोकसाहित्याच्या अभ्यासाने होते.

बदलत्या समाजाचे चित्र पुढील लोकगीतातून किती प्रभावीपणे रेखाटले आहे ते दिसते–

खोटं बोलणं, खोटं ग्वाही उलटा जमाना
शाहणा चतुर पंडीत याला कोणी इचारीना

कीर्तनाला कोणी पुसेना, नाच्यावर प्यार
लिंगायत, वाणी, बुडाले, मारवाडी फार

समाजजीवन कसे भ्रष्ट होत आहे, सत्य निर्मूल्य होऊन समाजात असत्याचे स्तोम माजले आहे याचे सुंदर वर्णन वरील लोकगीतात केले आहे. इंग्रजाच्या आगमनाने समाजात कोणते बदल झाले आहेत याचाही उल्लेख पुढील लोकगीतात आढळतो–

इंग्रेजानं जामे बुडविली, ऐका प्रचेती
आणेदार हा घोडा तोडा आबासाहेब लेती ।।

आणि देशात प्रचलित असलेल्या नाणे व्यवस्थेतही झालेला बदल लोकसाहित्यात व्यक्त झालेला आहे.

ढब्बूशाही बुडून गेली, गर्दी झाली याची
बाळ तोंड्या खडक्या निघाला, खोटी साळ याची ।।

समाजातील ढोबळ बदलाची लोकसाहित्यात जाण आढळते तशीच समाजातील सूक्ष्म बदलाचीही दखल लोकसाहित्यात घेतलेली पाहवयास मिळते.

समाजमनाने जे जे अनुभवले किंवा अनुभवले जात आहे त्याचाच प्रामाणिक आणि स्वाभाविक आविष्कार लोकसाहित्यातून झालेला आढळतो. नितळ पाण्यात सभोवतालच्या निसर्गाचे अगदी हुबेहूब प्रतिबिंब दिसावे त्याचप्रमाणे समाजजीवनाचे–लोकजीवनाचे हुबेहूब प्रतिबिंब लोकसाहित्यात पडलेले दिसते. मराठी लोकजीवन किती संपन्न होते याची साक्ष लोकसाहित्यातून पटते.

समाजातील प्रमुख वर्ग श्रमकऱ्यांचा. शेतीचा व्यवसाय करणारांचा. आपल्या काळ्या आईत घाम गाळणाऱ्यांचा. अशा सामाजिक अवस्थेत जीवन जगणाऱ्या मनातील विविध भावछटा त्यांच्याच प्रतिमांच्या साहाय्याने लोकसाहित्यातून व्यक्त होताना दिसतात. झरा, पलाण, आंबा, वड, जोंधळा, बैल, हिरवी शेते आणि शेतीतल्या इतर अनेक प्रतिमा श्रमकरी जीवनाचे यथार्थ दर्शन घडवितात.

बारा बैलाची कशी गव्हणी दाटली
साखर मुठीनं वाटली

असे यथार्थ वर्णन लोकसाहित्यात विविध स्वरूपात लोकजीवनाची संपन्नता स्पष्ट करते.

लोकसाहित्याची निर्मिती आणि जोपासना प्रामुख्याने अडाणी, अशिक्षित आणि ग्रामीण भागातच होत असल्याने ग्रामिण समाजरचनेचे प्राचीन अवशेषही लोकसाहित्यातून पाहवयास मिळतात. ग्रामीण समाजरचनेत गावचा पाटील, त्याची पत्नी आंणि इतर वतनदार, वलुतेदार यांचे महत्त्व किती होते इत्यादी बाबी आपल्याला लोकसाहित्यात प्रकर्षाने पाहवयास मिळतात.

गावकीचा महार, हाक मारितो पहाटे
पाटलिणी नंतर नेहरी करी ॥

वरील ओवी वरून गावात पाटलाचे आणि पाटलिनीचे किती उच्च दर्जाचे स्थान होते याची कल्पना येते. अशा या पाटलाची गावातील लोकाविषयीची आपुलकी पुढील ओवीतून व्यक्त होताना दिसते.

पाटिलांच बाळ, मोठं हौसंच गळी
लिंब लाविती चावडी, करतो रयतेला सावली ॥

ग्रामीण समाजरचनेत मानाचे स्थान असलेला आणि गावातील लोकाविषयी आपुलकी असलेला हा पाटील, त्याची कारभारीन, गावाला भूषण होय. चावडी. गावातील सार्वजनिक इमारत. कोणी सरकारी पाहुणा आला तो चावडीवरच. गावातील भावकी भावकीतील वाद मिटायचे ते चावडीवरच. आणि रात्री गप्पा रंगायच्या त्या गावातल्या चावडीवरच. कोणावर अन्याय झाला की त्याने धाव घ्यावी चावडीकडेच. ग्रामिण समाजरचनेत चावडीला विशेष महत्त्व होते आणि अशा या चावडीचा आदरही होत असे. चावडी समोरून जाताना स्त्री पदर घेऊन व हातात वाहणा घेऊन जाई जणू एखाद्या पवित्र मंदिराचे स्वरूप होते चावडीला. अशा समाजरचनेचे अनेक विशेष लोकसाहित्यात पाहवयास मिळतात. गावकीचा महार, येसकर, रामोशी आणि इतर बारा बलुतेदार इत्यादी महत्त्वाच्या समाज घटकांचे त्यांच्या वैशिष्ट्यासह लोकसाहित्यातून दर्शन घडते.

निरनिराळ्या व्यावसायिकांचीही माहिती लोकसाहित्यातून मिळते. वाणी, चाटी, सावकार, मारवाडी इत्यादींच्या उल्लेखाबरोबरच भिक्षुक, न्हावी, सुतार, गवंडी, सोनार इत्यादी जाती-जमातींच्या व्यवसायांचे विशेषही लोकसाहित्यातून आढळतात. समाजात वावरणाऱ्या विविध स्वभावांचे दर्शन त्यांच्या खास वैशिष्ट्यासह पुढील लोकगीतातून घडते.

चाटी, भाटी करं बेपार
अन् शिराळ शेठ हिंडती पेठेवर
हयो तेली मोजतो उलट्या मापानं
गूळ म्हणून साखर दिली वाण्यानं
रुपं म्हणून सोनं मोजलं जोहऱ्यानं
तांबोळी पाही मैनीकडं, सुकलं पान ।।

पेठेतून जाणाऱ्या सुंदर तरुणीमुळे वरील व्यावसायिकांच्या नेहमीच्या वर्तनात कसा बदल होतो याचे मार्मिक वर्णन वरील गीतात केलेले आहे. अशा समाजजीवनाच्या अनेक छटा लोकसाहित्यातून पाहवयास मिळतात.

सण, उत्सव आणि यात्रा यांना समाजजीवनात महत्त्वाचे स्थान होते आणि आजही आहे. आजही ग्रामीण लोकजीवनात विविध सणांना, उत्सवाना आणि यात्रांना अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसते. नागपंचमीचा सण तर ग्रामीण लोकजीवनात विशेषत: स्त्री जीवनात अत्यंत महत्त्वाचा असतो. याप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या विविध गीतांचे स्वरूप अभ्यसनीय असून त्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री मनाचे चित्र हृद्य आहे.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या लोकजीवनाला धार्मिकतेचा परिस स्पर्श झालेला आढळतो. या लोकजीवनावर धार्मिक परंपरा, पुराणे, ग्रामीण देवदेवता यांचा प्रभाव पडलेला दिसतो. देवदेवताविषयीची श्रद्धा अनेक लोकगीतातून व्यक्त झालेली आहे. निरनिराळ्या जाती-जमातीतील विधी लोकगीताशी संबंधित आहे. या विविध जमातीतील विधी, प्रथा लोकसाहित्यातून आकारास येताना दिसतात. समाजजीवनात राम, लक्ष्मण, सीता, पांडव, श्रीकृष्ण, मारोती, विठोबा या देवदेवतासोबतच खंडोबा, म्हाळसा, आसरा, मसोबा, सटवाई, बिरोबा इत्यादी ग्रामदेवताविषयीची श्रद्धाही आदरनीय आहे. अंधश्रद्धेच्या पोटी समाजजीवनात प्रचलित असलेल्या काही असूरीविधी-बळी देण्यासारख्या इत्यादींचा उल्लेख लोकसाहित्यातून आढळतो. काही अंधश्रद्धा, रुढी, प्रथा समाजजीवनात किती खोलवर रुजल्या होत्या याचे ज्ञानही लोकसाहित्यातून मिळते.

परमेश्वराची निंदा केल्यास परमेश्वर कशी शिक्षा देतो याचे वर्णन पुढील गीतात केलेले आहे–

आराध्याची निंदा, कोण करिते जतरत
फूल टाकिले नेतरात
गोंधळ्याची निंद्या, कोण करिते जतरत
कीडे पाडिले देहात ।।

पंढरपूरचा विठोबा अवघ्या महाराष्ट्राचा लाडका. लोकसाहित्यातून पंढरपूरच्या विठोबाविषयीची मराठी मनाची श्रद्धा उत्कटतेने व्यक्त झालेली आढळते. मराठी

लोकजीवनात विठोबा, खंडोबा, सटवाई इत्यादी देवदेवताना अनन्य साधारण महत्त्व असल्याने या देवदेवताविषयीच्या श्रद्धा व्यक्त करणारी लोकगीते विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या समाजजीवनाचे एक आगळे वैशिष्ट्ये म्हणजे या समाजजीवनात मराठी लोकसंस्कृतीच्या उपासकांना महत्त्वाचे आणि मानाचे स्थान आहे. वासुदेव, गोंधळी, पोतराज, वाघ्या-मुरळी, पांगुळ, भराडी, भोपे इत्यादी लोकसंस्कृतीच्या उपासकांची कामगिरी समाजाचे नैतिक आरोग्य अबाधित राखण्यासाठी महत्त्वाची ठरली आहे. लोकसंस्कृतीच्या या उपासकांना डॉ.प्रभाकर मांडे लोकगायकांचा वर्ग म्हणून संबोधतात. लोकगीतांच्या माध्यमातून लोकगायकांचा हा वर्ग पौराणिक कथा, उपदेशपर कथा आणि देवदेवताविषयक श्रद्धा समाज मानसात रुजवीत असत त्यामुळे समाजमनाला उदात्ततेचा आणि धार्मिकतेचा स्पर्श होऊन समाजाचे नैतिक आरोग्य चांगले राहून लोकजीवन वैशिष्ट्यपूर्ण राहत असे. लोकसंस्कृतीची जोपासना करण्याचे कार्यही या लोकसंस्कृतीच्या उपासकांनी केले आहे. आजच्या समाजपरिवर्तनात मात्र लोकसंस्कृतीच्या या उपासकांचे स्थान मात्र तितके महत्त्वाचे राहिलेले दिसत नाही.

लोकसाहित्यातून व्यक्त होणारे समाजजीवन संपन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. असे हे संपन्न समाजजीवन आज इतिहासजमा होत असून त्या जागी नव्या समाजजीवनाचे होत असलेले आगमन आपल्याला जाणवते. समाजजीवनाचे विविध पैलूही लोक-साहित्यात आढळतात.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या समाजजीवनातील कौटुंबिक जीवनाचे हृद्य दर्शनही आपणास घडते. लोकसाहित्यातील कौटुंबिक जीवन अत्यंत हृदयस्पर्शी असून वैशिष्ट्यपूर्ण आहे. लोकसाहित्यातून प्रगट होणाऱ्या कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की समाजात संयुक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. अशा कुटुंबात आई-वडील, सासु-सासरे, नणंद-भावजया, जावा इत्यादी वडिलधारी माणसे असून त्याचे भावविश्व संपन्न आणि हृद्य आहे. लोकसाहित्यातील हे कुटुंब नात्यागोत्यानी गजबजलेले असून संपन्न आहे. अशा या कुटुंबाच्या दारी गायी वासरांचे, गोठ्यात बैलांचे आणि अंगणात पोराबाळांचे हुंदडणे आपल्याला पाहवयास मिळते. अशा या कौटुंबिक जीवनात कौटुंबिक जिव्हाळ्या सोबतल रुसणे-फुगणे, हेवे-दावे, भांडण-तंटे इत्यादी मानवी स्वभावाच्या छटाही पाहवयास मिळतात.

अशा या कुटुंबात प्रेमळ आई-वडील आहेत, दिवाळीच्या सणा, मुळा आसुलेली लेक' आहे, माहेरच्या मायेनं वागणारी सून आहे, दिवाळीला बहिणीला लुगडे-चोळी घेणारा भाऊ आहे, डोळे मुरडणारी नणंद आहे, हौशी दीर आहे, देव्हारीचे सासू-सासरे आहेत, प्रेमळ पती आहे तर अंगणात दुडदूड धावणारा 'राजेधर बाळ' आहे. अशा या कौटुंबिक नात्याची 'गुंतवळ' हृद्य आहे आणि कौटुंबिक जीवनाच्या या वैशिष्ट्यासोबतच

त्या-त्या घराण्याच्या चाली-रीती, कुळाचार इत्यादी बाबीही लोकसाहित्यातून व्यक्त झालेल्या आहेत.

लोकसाहित्यातून घडणारे लोकसंस्कृतीचे दर्शन

लोकसाहित्याच्याद्वारा लोकसंस्कृतीचे जतन आणि जोपासना होत असते हे कोणीही नाकारणार नाही. फ्रान्झ बोआस या संशोधकाने लोकसाहित्याचा अभ्यास करून लोकसाहित्याच्याद्वारा संस्कृतीचे सातत्य टिकते हे पटवून दिले आहे. लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासात सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ महत्त्वाचे ठरतात याला कारण लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य यांचा अत्यंत जवळचा असलेला संबंध होय. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन आपणास घडते याला कारण लोकसाहित्यात टिकून राहण्याची प्रवृत्ती असते. लोकसाहित्यातील या विशेषामुळे एखादा लोकसमूह त्याची पारंपारिक व सांस्कृतिक विशेष यांचे जतन केले जाते आणि या सांस्कृतिक आणि पारंपारिक विशेषांच्या आधारे आपल्याला लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

लोकसाहित्यात परंपरेने चालत आलेल्या विधींचा, रूढींचा समावेश असल्यामुळे व त्यातील काही विधीना धर्मविधींचे स्वरूप असल्यामुळे व्यक्तीच्या जीवनात पर्यायाने लोकजीवनात विधींचे महत्त्वाचे स्थान असते. या विधींचा व रूढींचा समाजजीवनावर बराच पगडा असल्यामुळे हे विधी पार पाडताना करण्यात येणारे विविध सांस्कृनिक व धार्मिक कार्यक्रम यानाही लोकसाहित्यात महत्त्व येतेच. या रूढी, प्रथा आणि विधी यामुळे त्या त्या प्रान्तातील, त्या त्या जमातीच्या संस्कृतीची ओळख आपल्याला लोकसाहित्याच्या द्वारा होते. लोकसाहित्याच्या या वैशिष्ट्यामुळेच लोकसाहित्याला मानवी संस्कृतीचा इतिहास म्हणून संबोधण्यात येते. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा हा अत्यंत जवळचा संबंध लक्षात घेऊनच लोकसाहित्यातून घडणाऱ्या लोकसंस्कृतीच्या दर्शनाचा येथे थोडक्यात परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मराठी लोकसाहित्यातून मराठी लोकसंस्कृतीचे घडणारे दर्शन वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी लोकसंस्कृतीचे स्पष्ट आणि स्वच्छ प्रतिबिंब आपणास लोकसाहित्यात पाहवयास मिळते. प्राचीन मराठी लोकसंस्कृतीच्या अवशेषाबरोबरच या लोकसंस्कृतीचे अनेक विशेष लोकसाहित्यात आढळतात. आपली लोकसंस्कृती किती संपन्न आहे ही जाणीवही लोकसाहित्याचा अभ्यास करताना होते.

मराठी लोकसंस्कृतीत आणि या लोकसंस्कृतीची जोपासना करणाऱ्या मराठी लोकजीवनात देवा–धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आदर्श जीवनाची व दैवी गुणांची जोपासना करणारी मराठी लोकसंस्कृती आदरनीय आहे. परमेश्वरावर लोकांची अस्सीम श्रद्धा. परमेश्वर हा दुःख दूर करणारा आणि दुःखिताना आश्रय देणारा तसाच नवसाला पावणारा या दृष्टीने लोक परमेश्वराकडे पाहत. त्यातूनच विविध विधींची,

उत्सवांची आणि नवसांची निर्मिती होऊन लोकजीवनाला धार्मिकतेचा स्पर्श झाला. अनेक कुळाचार घराण्यातून होऊ लागले आणि संस्कृती विशेषात भर पडत गेली. धार्मिक विधी आणि कुळाचार यांची पूर्तता देवदेवतांच्या निरनिराळ्या उपासकांच्या मार्फत केली जाऊ लागली यास्तव देवदेवतांच्या भगतांचा, लोकगायकांचा एक वर्ग लोकजीवनात मान्यता पावून लोकसंस्कृती संवर्धनास साह्यभूत ठरला हे नाकारता येत नाही.

लोकसाहित्यातील लोकगीते, लोककथा, लोकनृत्य आणि लोकसंगती यांच्या अभ्यासाने भारतीयांची मूळ संस्कृती आणि आचार-विचार यांच्यावर प्रकाश टाकता येतो. भारतीय प्राचीन संस्कृतीचे दर्शन आदिवासींच्या लोकसाहित्यातून आणि मराठी लोकसंस्कृतीचे दर्शन मराठी लोकसाहित्यातून होते.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या लोकसंस्कृतीविषयी पं. प्रयागदत्त जी शुक्ल पुढील उद्‌गार काढतात-[२]

"किसी भी जाति की सभ्यता और संस्कृति का परिचय हमें उसके काव्य, गीत और चित्रकला में मिलता है। कला के अंतर्गत लोकगीत, लोकनृत्य और लोककहाणीयाँ भी आती है, और उनके जातीय गुणधर्मोका पता चलता है। लोकजीवन की सामूहिक चेतना, उसकी आशा-निराशा, हर्ष-विषाद, आशाए, स्वप्न और संघर्ष की मार्मिक अभिव्यंजना का चित्रण हमे लोकसाहित्य से मिलता है. . . .वे अज्ञात है और अज्ञातही रहेंगे। यह वह भावना है-जो प्राकृतिक जीवन की सहगामिनी है और उसी का नाम 'संस्कृती' है।"

पं. प्रयागदत्त जी शुक्ल यांच्या वरील उद्‌गारावरून लोकसाहित्य आणि संस्कृती यांचा किती जवळचा संबंध असतो हे स्पष्ट होते. मराठी लोकसाहित्यातून दर्शन घडणाऱ्या लोकसंस्कृतीचा एक विशेष म्हणजे देवदेवता आणि धर्म यांच्याविषयीचीं लोकजीवनाला वेढलेले पवित्र वलय होय. सकाळच्या प्रहरी उगवणाऱ्या सूर्याला साक्षी ठेऊन नव्या दिवसाची मंगल सुरुवात होई-

उगवला नारायण, तुळशीच्या डोक्यावर
उजेड पडला मारुतीरायावर ॥

उगवत्या सूर्याचे दर्शन घेऊन मराठी स्त्री आपल्या देवाविषयीच्या श्रद्धा व्यक्त करते. मराठी लोकजीवनात सूर्य, चंद्र, तारे, नद्या, देवदेवता आणि ग्रामदैवते यांना अत्यंत महत्त्व आहे.

उगवला नारायण, चंद्रभागेला आरती
आंगोळीला आले सोपान निवृत्ती

अशा अनेक ओव्या मराठी लोकजीवनाला असलेला धार्मिकतेचा स्पर्श स्पष्ट करतात. मराठी मनाची एक विशेषत: पुढील ओवीतून व्यक्त होते-

पाटच्या पाण्यामंदी, आदी रामाचं नाव घ्यावं
मग चितल्या कामा जावं ॥

या आणि इतर अशा अनेक लोकगीतातून मराठी लोकजीवनातील भावगंगा आदरनीय आहे. मराठी लोकजीवनाला असलेली ही मंगल आणि पवित्र झालर मराठी लोकसंस्कृतीला अधिक सुशोभित करणारी आहे. पंढरपूरचा विठोबा, जेजुरीचा खंडोबा, माहुरची रेणुका, तुळजापूरची भवानी, चांद्याची लक्ष्मीआई यांच्याबरोबरच राम, सीता, मारोती, श्रीकृष्ण या देव-देवताविषयीच्या श्रद्धा मराठी लोकसाहित्यातून व्यक्त झालेल्या दिसतात.

मराठी लोकसंस्कृतीच्या घडनेत संताचेही अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे लोकसाहित्याच्या अभ्यासाने कळते. मराठी लोकजीवनात संताना आणि त्यांच्या वाङ्मयाना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. लोकांची परमेश्वराविषयीची श्रद्धा आणि आदर्श जीवनाची ओढ या भावनेतून संत लोकजीवनात मान्यता पावले तसेच संताना समाजोद्धाराची लागलेली तळमळ ही ही त्यांच्या लोकप्रियतेस कारण आहे.

लोकजीवनात संताना लोकप्रियता का प्राप्त झाली याची चर्चा करताना डॉ. रा. चि. ढेरे म्हणतात[३], "संताना लोकाविषयी करुणा वाटते. त्यांना लोक धारणा उंचावण्याची एकसारखी तळमळ लागून राहिलेली दिसते.... संत मात्र जे जे "लौकिक" आहे, ते ते "अलौकिक" पातळीवर नेताना लोकांना बरोबर घेतात आणि सर्व लोकश्रद्धांचा, लोकप्रतीकांचा आणि लोकमाध्यमांचा वापर लोकमानसाला अलौकिकाचा स्पर्श घडविण्यासाठी करतात."

संताच्या वरील दृष्टीमुळेच संताना लोकमान्यता मिळून अशा संताविषयी लोकमानसात नितांत श्रद्धा निर्माण झाली आणि या श्रद्धेतूनच लोकजीवनाला आदर्शाची ओढ लागली आणि या आदर्शाच्या ओढीतून मराठी लोकसंस्कृतीभोवती एक तजोवलय निर्माण झाले. लोकसाहित्यातून ते प्रगट झाले.

मराठी लोकसंस्कृतीवर मराठी संताच्या उपदेशाचा बराच पगडा बसलेला दिसतो. संताच्या या उपदेशाच्या प्रभावातून आणि लोकमानसाच्या आदर्शाच्या ओढीच्या प्रवृत्तीतून मराठी माणसाची नैतिक घडण घडत गेली. संताना लोकाविषयी वाटणाऱ्या करुणेमुळे, आत्मियतेमुळे त्यांनी लोकजीवनाचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला. त्यांची दुःखे संतानी स्वीकारली आणि लोकांच्याच माध्यमातून त्यानी उपदेश केला. असा उपदेश करताना संतानी मराठी लोकसंस्कृतीतील विविध संस्था, देवदेवता यांचे माध्यम स्वीकारले त्यामुळे संतसाहित्याचा लोकमानसावर विशेष प्रभाव पडला आणि संताचा हा लोकमानसावरील प्रभाव लोकसंस्कृतीच्या जडण-घडणेत महत्त्वाचा ठरला. मराठी लोकसाहित्यातून मराठी लोकजीवनावरील संताचा वरील प्रमाणेचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. आजही शहरी लोकापेक्षा ग्रामीण लोकात संताविषयीची प्रीतीची भावना विशेष प्रमाणात टिकून राहिल्याचे आढळते. लोकसाहित्यातील ओवी आणि संतांच्या

ओव्या आणि अभंग यांचा अभ्यास करताना लोकसाहित्य आणि संतसाहित्य यांची जवळीक लक्षात येते.

मराठी लोकसंस्कृतीच्या घडणेत लोकसंस्कृतीच्या उपासकांचा महत्त्वाचा सहभाग आहे हे विसरता येत नाही. लोकसंस्कृतीच्या या उपासकांनी आपापल्या परीने जोपासना करून मराठी लोकसंस्कृती अधिक उदात्त व जीवन मूल्यांकित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लोकगीतांच्या माध्यमातून लोकसंस्कृतीच्या या उपासकानी लोकजीवनाला मार्गदर्शन करून लोकजीवन आदर्शाकडे नेण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसंस्कृतीच्या जडण घडणेत महत्त्वाचा सहभाग असलेले लोकसंस्कृतीचे हे उपासक कोण व त्यानी कोणत्या प्रकारे संस्कृती संवर्धनात सहभाग केला ते पाहू.

भल्या पहाटे धर्मगीते गाणारा पांगूळ, कुडमुड्या जोशी, मोरपंखी टोपी घातलेला कृष्णभक्त वासुदेव, संबळ आणि तुणतुणे या संगीत वाद्यासह देवीच्या नावाने गोंधळ घालणारा गोंधळी, हलकीच्या तालावर नाचणारा लक्ष्मीआईचा भक्त पोतराज, नृत्यासह खंडोबा–म्हाळसाईची गाणी गाणारे वाघ्या-मुरळी, भराडी इत्यादी लोकगीतांचे गायक म्हणजे मराठी लोकसंस्कृतीचे उपासक होत. मराठी लोकजीवनात या लोकगायकांना महत्त्वाचे स्थान होते.

मराठी लोकसंस्कृतीचे हे उपासक आपल्या गीतातून पौराणिक घटनावर आधारित, देव-देवताविषयक श्रद्धा आणि उपदेशपर कथा सांगून लोकजीवनापुढे आदर्श ठेवीत. लोकसंस्कृतीचे हे उपासक लोकभाषेतून आणि लोकमाध्यमातून कधी 'श्रीयाळ–चांगुणा' यांची हृदयस्पर्शी कथा सांगून जादर्शजीवनाचे चित्र लोकजीवनापुढे ठेवीत तर कधी 'श्रावण बाळ' ऐकवून लोकमन हेलावून सोडीत. तर कधी–

राम संगती करा गड्यानो, आधार देवाचा
भरोसा नाही या जीवाचा ॥

असा उपदेश करून अन्तर्मुख होण्यास सांगत. मानवी जीवनात परमार्थाचे किती महत्त्व आहे हे पटवून देताना मराठी लोकसंस्कृतीचा उपासक–वासुदेव सांगतो–

सद्‌गुरु चरणी लक्ष लावा, हरिचरणी मन
प्रपंचात प्रेमार्थ करा नामाचं स्मरण
दान धर्म करा, पुढं इश्रांती जीवाला
धर्म पुण्य करा, चला तुम्ही सोडा पापाला ॥

परमार्थ न साधणाऱ्या, संसारात बुडणाऱ्या नरदेहाचे सार्थक नाही. मानवी जीवनाचे सार्थक करावयाचे असेल तर परमार्थात हे जीवन घालविणे किती महत्त्वाचे आहे हे अत्यंत प्रभावी आणि अर्थपूर्ण शब्दातून हा संस्कृती उपासक पुढील उद्‌गार काढतो–

करार आला जवळ, कागोद कडाचोट लिहिला
दिवस दिवस होइल, कलीचा येइल बोलवा
सर्वंच राहील घरी, शेवटी आलं तसं जाणं ॥

तर कधी 'बदलत्या दुनियेच' वर्णन करून भ्रष्ट होणाऱ्या मनाला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न हे लोकगायक आपल्या गीतांच्या माध्यमातून करीत. तर कधी या लोकसंस्कृतीच्या उपासकांची वाणी देवदेवतांचे गुणगाण करण्यात तल्लीन होत असे. माहुरच्या रेणुकेचे वर्णन करताना गोंधळी या देवीचे माहात्म्य आणि पराक्रम पुढीलप्रमाणे गातो–

आई जगदंबा रेणुका सुंदरी
नांदती माहुरगडी
घरातरी गांजली दैत्याने
बुडले अवघे जन
निघाली माया त्या होमातून
महिसासुर मर्दिला तिनं
तवा देवाशी झालं सुख ॥

आपल्या गीतातून लोकसंस्कृतीचे हे उपासक लोकसंस्कृतीचे भव्य आणि दिव्य दर्शन घडवितात. संपन्न मराठी लोकसंस्कृतीचे दर्शन आपल्याला घडते ते अशा लोकगायकांच्या गीतातून तसेच कुळाचार, लग्न इत्यादी विधीशी संबंधित असलेल्या गीतांच्या माध्यमातून.

लोकसाहित्यातून घडणारे लोकसंस्कृतीचे दर्शन वैशिष्ट्यपूर्ण असून प्राचीन संस्कृतीचे विशेषही लोकसाहित्यातून आढळतात. मराठी लोकसाहित्यातून ग्रामीण लोकजीवन, संस्कृती आणि आचार-विचार आदींचे स्वच्छ आणि स्पष्ट प्रतिबिंब पाहवयास मिळते आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते की भारतीय जीवन संस्कृतीचा मौलिक इतिहास म्हणजेच लोकसाहित्य. लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या संस्कृतीचा अभ्यास करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर[१] यांचे पुढील उद्‌गार किती सार्थ आहेत याची खात्री होते.

"लोकसाहित्य ही आमच्या संस्कृतीची संपत्ती आहे व तिचे जतन व संवर्धन आम्हाला केले पाहिजे. ती तर अत्यंत प्राचीन काळापासून हृदयपूर्वक सांभाळून ठेवलेली मूल्यवान ठेव आहे."

लोकसाहित्यातून व्यक्त होणारे स्त्री-जीवन

मराठी लोकसाहित्यात स्त्रीगीते विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. या स्त्रीगीतातून व काही लोककथातून स्त्री-जीवनाचे विविध भावस्पर्शी चित्र आपणास पाहवयास मिळते. स्त्री मनातील विविध भावछटा मोहक असून त्यात कधी जिव्हाळा भरलेला आढळतो तर कधी देवदेवताविषयीची श्रद्धा भारावून टाकते. स्त्री जीवनाच्या विविध छटा लोकसाहित्यातून पाहवयास मिळतात.

स्त्री ही जात्याच हळव्या मनाची, श्रद्धाळू वृत्तीची आणि संवेदनक्षम मनाची असल्यामुळे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना, येणारे अनुभव, कौटुंबिक नाती आणि

सभोवतालचा परिसर यांचे संस्कार तिच्या मनःपटलावर उमटणे साहजिकच आहे. स्त्री जीवनाचे भावविश्व विविध भावछटांनी विनटलेले आहे. सुख-दुःख, राग-लोभ; वात्सल्य, स्नेह आदि मानवी भावनांचा हृद्य आविष्कार लोकसाहित्यातून झालेला आहे.

शहरी स्त्री जीवनापेक्षा ग्रामीण भागातील स्त्री जीवन वेगळे आहे. या स्त्री जीवनात मांगल्य, पावित्र्य आणि श्रद्धा यांना विशेष महत्त्व आहे. या जीवन मूल्यांची जोपासना जीवापाड करणारी स्त्री लोकसाहित्यातून पाहवयास मिळते. देवाधर्मावर या स्त्रीची नितांत श्रद्धा आहे. या श्रद्धेच्या आधारेच आपल्या संसारातील सुखदुःखे ती अगदी शांतपणे सहन करते.

सकाळच्या पाऱ्यामंदी, हात माझा ग जोंधळ्यात
देव नारायण उगवले कंबळात ॥

दैनंदिन जीवनाची अशी सुरूवात लोकसाहित्यातील स्त्रीची होते. प्रातःकाळी उठून जात्यावर बसणारी ही स्त्री जात्याच्या फिरत्या चाकाबरोबरच तिच्या अंतःकरणातील भावतरंग ओवीच्या माध्यमातून गिरक्या घेत घेत साकार होतात. अशा ओव्यातून देवदेवताविषयीची स्त्रीची श्रद्धा व्यक्त होताना दिसते. लोकसाहित्यातील या स्त्रीच्या जीवनात सीता, द्रौपदी, पार्वती, तारामती इत्यादी आदर्श जीवनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या आदर्शांची पूजा ही स्त्री करीत असते.

पुराणातील आदर्श जीवनाची ओढ लोकसाहित्यातील या स्त्रीला आहे. राम, लक्ष्मण, सीता, मारोती, श्रीकृष्ण, द्रौपदी या सोबतच हरिश्चंद्र-तारामती, श्रीयाळ-चांगुणा इत्यादींच्याविषयी तिचे मन श्रद्धेने भरलेले आढळते. पंढरपूरचा विठोबा अवघ्या मराठी मनाचे श्रद्धास्थान. अशा या विठोबाला आणि त्याच्या परिवाराला मराठी स्त्रीच्या जीवनात उच्च स्थान प्राप्त झालेले आहे. या देवदेवतासोबतच अनेक ग्रामदैवतेही या स्त्रीला पूजनीय आहे. संताविषयी तिच्या मनात श्रद्धा आहे. स्त्री जीवनाला झालेला हा धार्मिकतेचा, श्रद्धेचा स्पर्श आपणास मराठी लोकसाहित्यातून पाहवयास मिळतो. देवदेवताविषयीची स्त्रीच्या मनात असलेली श्रद्धा पुढील ओव्यातून व्यक्त होते–

पहिली माझी ओवी, पहिला माझा नेम
तुळशी जवळी राम, पोथी वाची
दुसरी माझी ओवी, दुधाची भावना
लक्ष्मी नारायणा, विनंती माझी
तिसरी माझी ओवी, तिरकूटाच्या घरी
ब्रह्मा विष्णूवरी, बेलपत्री
चवथी माझी ओवी, चवथीच्या चांदा
मोतियाच्या भांगा, अंबाबाई
पाचवी माझी ओवी, पाची पांडवासी
पूजा आरंभीची, विठोबाची

या ओव्यांतून देवदेवताविषयी स्त्री जीवनात अत्यंत श्रद्धा असल्याचे विसून येते. स्त्री जीवनाची अनेकविध व भावपूर्ण रूपे आपणास लोकसाहित्यातून पाहवयास मिळतात. आपल्या घराण्याचे कुळधर्म, कुळाचार आणि धार्मिकविधी अत्यंत मनोभावाने पाळणारी ही स्त्री आहे.

सण, उत्सव आदी प्रसंगी एकत्र येऊन आपल्या जीवनातील आनंद लुटणारी स्त्री ही लोकसाहित्यातून पाहवयास मिळते. नागपंचमी, संक्रांत, वटसावित्री, पौर्णिमा आणि दिवाळी या सणाना स्त्री जीवनात विशेष महत्त्व आहे. नागपंचमीच्या दिवशी तर स्त्रीच्या आनंदाला पारावरच उरत नाही. आपल्या मैत्रिणीसोबत फेऱ्याची गाणी म्हणण्यात मग्न असलेली स्त्री म्हणजे लोकसाहित्याचा एक दागिणाच होय. आपले सौभाग्य अखंडित राहवे, कपाळीचे कुंकू अक्षय राहवे म्हणून मराठी स्त्री हळदी कुंकू वाटताना दिसते तर आपल्या सत्यवानासाठी दीर्घ आयुष्य मागण्यासाठी ती वडाची पूजा करताना आढळते आणि दिवाळीचा सण...! सासरी गेलेल्या स्त्रीस तर या सणाची उत्सुकता दसऱ्यापासूनच लागते.

दसऱ्यापासून दिवाळी वीस रोज
वाट पाहते नित रोज

'दिवाळीच्या मुळा आसुसलेली' ही लेक माहेरच्या माणसाची नित्य वाट पाहते कारण–

दिवाळीची चोळी, भाऊबीजेचं लुगडं
हाक माझा बंधुराया, तुझ्याकड

माहेरच्या प्रेमळ वातावरणात रमण्यासाठी, तिचे मन आसुसलेले आहे आणि मनाच्या या तृप्तीसाठी ती दिवाळीच्या सणाची मोठ्या आतुरतेने वाट पाहते. लोकसाहित्यातून आविष्कृत होणारे स्त्री-जीवन सोज्वळ, सात्विक आणि श्रद्धाशील आहे. हे स्त्री-जीवन मानवी मनाला भारावून टाकणारे आणि अलौकिक पातळीवर नेणारे असेच आहे. स्त्री-मनाचे धार्मिक रूप जसे लोकसाहित्यातून व्यक्त होते तसेच तिचे कौटुंबिक जीवनही लोकसाहित्यातून प्रगट होते.

आपल्या संसारात रममाण झालेली, कुटुंबातील आपल्या माणसासाठी जीवापाड परिश्रम करणारी, कुटुंबातील अनेक नाती गोती मायेने सांभाळणारी आणि आपल्या जीवनात पुराणातले आदर्श बाळगणारी स्त्री लोकसाहित्यातून पाहवयास मिळते.

माहेरी आईवडिलांच्या प्रेमळ छत्राखाली सुखाचे क्षण अनुभवणारी भावा–बहिणीच्या मेळाव्यात घातलेले मुक्त बालपण, तारुण्यातील प्रणय भावना, लग्न होऊन सासरलाही माहेरचं स्वरूप आगणारी, पतीला देव मानणारी असे अनेकविध स्त्री जीवनातील अवस्थांचे आणि या विविध अवस्थातील तिच्या विविध भावछटा आपल्याला लोकसाहित्यात पाहवयास मिळतात. लोकसाहित्यातील स्त्री-जीवन कौटुंबिक जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेले आहे.

आपल्या आई-वडिलाविषयीची आपुलकी ती पुढीलप्रमाणे व्यक्त करते–

पयली माझी वयी ग, मायच्या मायला
लोढणं वढाळघा गायीला ॥
दुसरी माजी वयी ग, मायच्या बापाला
दोडकं लोबंत कुपाला ॥

अशा या आपल्या प्रेमळ आई-वडिलाविषयीची लोकसाहित्यातील स्त्रीच्या मनात पुढील प्रकारची भावना आहे.

बाबा-आई वड, बाई मी पहिली वडाई
दोहीबी झाडाची, किती सांगू मी बढाई ॥

आणि अशा या स्त्रीच्या जीवनात तिच्या भावाचे स्थान कोणते आहे हे पुढील ओवीतून दिसते–

चंदनाचा टिळा, बंधू माझा कोठं गेला
लाडूचा पाहुणचार, बहिणीनं केला ॥

आई-वडिलांच्या मायेनं आणि भावाच्या प्रेमानं ओथंबून निघालेले हे स्त्री-जीवन पति-भक्तीत किती मग्न झालेले आहे हे आपणास पुढील ओव्यातून पाहवयास मिळते.

जाचू नका राया, तुमच्या पायाची मी दासी
राहीन उपाशी, घास घालीन तुमासी
सासरचे कष्ट राया, सारे साहून घेइन
जीव मी अर्पिन, वात इंद्रावनी ठेवीन
दिलाचा हेत राया, तुमा सांगू कवण्यापरी
उभी साऊली खाली, एकटे तुमी म्हो हरी ॥

पतीभक्तीचा उदात्त आदर्श व जीवनातील पावित्र्य वरील ओव्यातून व्यक्त होताना दिसते. लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री-जीवनात तिच्या पतीला देवाइतके उच्च स्थान आहे. पतिविषयी तिच्या मनात जाज्ज्वल्यपूर्ण निष्ठा आहे. आपल्या पतीप्रेमाबद्दल ही स्त्री म्हणते–

भातामंदी भात साळूबाई तुव्हा भात
भरताराचं सुख दुनियामंदी इरळागत

नवऱ्याआधी आपल्याला मरण यावे अशी उदात्त भावना लोकसाहित्यातील या स्त्रीची आहे.

अहेव मरणाची बायानो मोठी मौज
पुढं चालतो कंथ, माग गोताची फौज ॥
अहेव मरण कोण्या भाग्याच्या सइला
डोईचा मंदील, कंथ वाळवितो नयीला ॥

लोकसाहित्यातून प्रगट होणाऱ्या स्त्रीजीवनात कुंकू, चूडा आणि मंगळसूत्र याना एक विशिष्ट भावनात्मक स्थान आहे. आपला पती दीर्घायू व्हावा, तो सुखी राहवा म्हणून 'पहाटच्या पाऱ्यामंदी' 'सुर्व्याला हात जोडणारी 'लक्ष्मी' आपल्याला लोकसाहित्यात पहवयास मिळते.

हात मी जोडिते, उगवत्या बाणाला
आयुष्य मागते माझ्या कंथाला
देवा नारायणा, सुखाचा उगव
कुकाच बगव, शेला पागोटी वागव ॥

स्त्रीचे सौभाग्य-अहेवपण हाच स्त्रीच्या जीवनातील खरा अलंकार आहे हे ओव्यातून स्पष्ट होते त्याबरोबरच मराठी स्त्री-जीवनात कुंकू, चूडा, आणि मंगळसूत्र यांना किती महत्त्व आहे याची साक्ष वरील ओव्यातून मिळते.

लोकसाहित्यातून व्यक्त होणारे स्त्री-जीवन संस्कारक्षम आहे. माहेरी असताना तिच्यावर झालेले संस्कारच तिला सासरी उपयोगी पडतात. सासर आणि माहेर या दोन्ही ठिकाणी ती आपल्या जीवनाशी प्रामाणिक राहून जीवन जगण्याचा प्रयत्न करते. सासरी सुद्धा ती माहेरच्या आत्मियतेने वागते.

सासु–सासरे आहेत देव्हारीचे देवू
त्याचे आधी, माझे बाई नको जेवू ॥

असा संस्कार आईने तिच्या मनावर बिंबविल्यामुळे अशी स्त्री सासरच्या माणसांच्या प्रेमाला पात्र न ठरली तरच नवल. अशी उदात्त शिकवण माहेरी लाभल्यामुळे ही स्त्री सासरच्या माणसांची एकनिष्ठेने व प्रामाणिकपणे सेवा करते. आपल्या माहेरचे नाव राखण्यासाठी सासरी ती जीवापाड कष्ट उपसते. लोकसाहित्यातील या स्त्रीला आपल्या माहेरासोबतच सासरचाही अभिमान आहे.

लोकसाहित्यातून व्यक्त होणारी स्त्री ही कमालीची सहनशील आहे. संसारात येणाऱ्या दुःखाना सामोरे जाण्याचे धैर्य तिने रामायणातील सीतेकडून घेतलेले आहे.

एवढा वनवास सीतं सारखं सयीला
लहु अंकुशाच्या येळी, डोइ धुतली नयीला ॥

रामायणातील सीतेचा, पौराणिक कथातील तारामतीचा आणि पार्वतीचा आदर्श लोकसाहित्यातील स्त्रीच्या पुढे असल्याने ती आपल्या संसारात हालअपेष्टा सहन करण्यास समर्थ आहे. जीवनात येणाऱ्या संकटाच्या, दुःखाच्या निवारणार्थ व्रतवैकल्ये करणारी ही मराठमोळा स्त्री आहे. लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री जीवनाला अनेक कंगोरे आहेत. लोकसाहित्यातील ही स्त्री अबोल असून अत्यंत बोलकी आहे. साधी भोळी ही स्त्री असली तरी प्रसंगी ती कणखर वृत्तीची बनते. सहनशीलता, प्रेमळपणा आणि कष्ट उपसण्याची तयारी हा या स्त्रीचा स्थायिभाव आहे. वृत्तीने ती भाविक व धार्मिक आहे. आपल्या कुळाचा अभिमान बाळगणारी व कुळाचार पाळणारी मर्यादशील स्त्री आपल्याला लोकसाहित्यातून पाहवयास मिळते.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनाचे चित्रही अभ्यसनीय व लक्षणीय आहे. अशा या स्त्रीचे दैनंदिन जीवन थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येते–

खेड्यातली पहाट जात्याच्या चाकासोबत जीवनस्पर्शी ओव्यांचा नाद. दळण सरलं की झाड लोट आणि सडा सारवण आणि ही सर्व कामं करीत असताना मनात देवाचा भाव.

पाटच्या पाऱ्यामंदी, मला संसाराचा धंदा
नाव तुझे रे गोविंदा ओठावरी ॥

उगवत्या सूर्याला हात जोडून आपल्या कंथाला आयुष्य मागून पुन्हा ही स्त्री पुढील कामाला लागते. सडा सारवण झाले की गायी-म्हशींच्या धारा काढणे आलेच.

पाटच्या पाऱ्यामंदी, पाय वंदावे गायीचे
दारी तुळसीमाईचे वृंदावन ॥

आणि मग स्नान, देवदर्शन आणि स्वयंपाकाची तयारी. कारभाऱ्याचे, सासू-सासऱ्याचे मुला-बाळाचे जेवण खाण आणि नंतर तिचे जेवण. दुपारी थोडा वेळ मिळाल्यास निवडण-टिपणं आलेच. तोच तिन्ही सांजच्या येळा होते. गायी वासरं रानातून परत असतानाच पुन्हा ती सांजच्या स्वयंपाकाला लागण्याची तयारी करते तत्पूर्वी पदराखाली दिवा घेऊन मारोतीच्या मंदीराला जायला ती विसरत नाही. आणि रात्री कोठे कीर्तन असेल, पोथी असेल तर तिथे या स्त्रीची उपस्थिती लागायचीच याशिवाय घरी येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांची वर्दळ असेल तर त्यांची सोय करण्यातच तिचा सारा दिवस जात असे.

असे आहे लोकसाहित्यातील स्त्री जीवन. हृदयस्पर्शी आणि मनोवेधक तसेच आदर्शयुक्त लोकसाहित्यातून प्रकट होणाऱ्या स्त्रीचे विचार आणि आचार एका ठराविक मर्यादेने आखलेले आहेत. तिचे जीवन साधे आणि सामान्य असले तरी ते जिव्हाळ्याने, श्रद्धेने ओथंबलेले असेच आहे. त्या जीवनात प्रामाणिकपणा आहे, प्रेम आहे, कुटुंबातील व्यक्तीविषयी आत्मियता आहे. तर्क-वितर्कापेक्षा ती आपल्या जीवननिष्ठेशी प्रामाणिक असून विचारापेक्षा आचारावर तिचा अधिक भर आहे आणि विशेष म्हणजे तिच्या जीवनाला धार्मिकतेची, भाविकतेची मंगलमय कलाकुसर आहे.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनाचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की स्त्री-जीवन हे भव्य आणि दिव्य असून त्यावर थोरला मोठा ग्रंथ होईल असे हे स्त्रीजीवन संपन्न असे आहे. लोकसाहित्यातील स्त्रीजीवनाच्या विविध अवस्था आणि त्या त्या अवस्थातील विविध भावछटा यांचे उत्कट प्रतिबिंब लोक-साहित्यात पाहवयास मिळते.

लोकसाहित्यातून घडणारे अलंकार दर्शन

लोकसाहित्य म्हणजे लोकजीवनाचा आविष्कार. तेव्हा लोकजीवनातील प्रत्येक घडामोडींचा, आचार-विचारांचा, प्रथा-रूढी यांचा आणि लोकजीवनाशी संबंधित असलेल्या प्रत्येक गोष्टींचा आविष्कार लोकसाहित्यातून होणे अपरिहार्य ठरते. लोकसाहित्यातून आविष्कृत होणारे समाजजीवन, स्त्री-जीवन इत्यादी बाबींचा आपण परामर्श घेतला. त्याबरोबरच लोकजीवनाच्या संदर्भात त्या-त्या काळी वापरात असलेल्या आभूषणांचा-अलंकाराचा आणि प्रचलित वेशभूषेचाही विचार करणे प्रस्तुत ठरेल असे वाटते. लोकसाहित्यात आविष्कृत होणाऱ्या स्त्रीजीवनाबरोबरच स्त्रीजीवनात महत्त्व असलेल्या अलंकाराचा विचार करावयास हवा होता तथापि हे अलंकार इतके विविध प्रकारचे आहेत की त्यांचा स्वतंत्रपणे विचार करणे योग्य वाटते.

लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनात अलंकाराना दागदागिन्याना विशेष महत्त्व आहे. स्त्रीचा खरा अलंकार म्हणजे तिचे सौभाग्य आणि या सौभाग्याचे प्रतीक म्हणून अगदी गरीबात गरीब स्त्री चूडा व मंगळसूत्र वापरताना दिसते. सधन घराण्याच्या स्त्रिया अनेकविध स्वरूपाचे मूल्यवान दागदागिणे घालताना दिसतात.

अशा अनेकविध स्वरूपाच्या अलंकाराचे सुंदर व आकर्षक दर्शन आपल्याला लोकसाहित्यातून घडते. विविध अलंकारांची स्त्रीगीतात केलेली गुंफण अलंकाराइतकीच लोकसाहित्याचे सौंदर्य खुलविणारी आहे. पुढील लोकगीतातून स्त्रीजीवनाला हव्यास असणाऱ्या अलंकाराची केलेली कलात्मक गुंफण आपल्याला आकर्षित करते.

मैनानं केला सीणगार, उंची गजघाट
आंगी सत्वाची चोळी, कास बळकट
नेसली शालूची धटी, रेशीम काठ
माथ्यावर चंद्र सुर्वे तारा तुट
भागांत भरले मोती, कोकणी थाट
नाकात नथ सर्ज्याची, पुरभा घनदाट
गळचात मोहनमाळ केवळ कंठ
दंड पेटचा, बाजुबंदाला गोंडं लटपटं
हिच्या मुदीवर हिरकणी हिऱ्याचं बुटं
पायी आलपट पैंजण पोलार दाटं

असे विविध अलंकार लोकसाहित्यातून पाहवयास मिळतात. आणि या ओव्यातून घडणारे अलंकार दर्शन किती तरी सुंदर आहे.

आणिले दागिने, तबकी भरून
शोभेल चौगुण, उषाताई ॥

आधीच सोन्याची, आणिक सोन्यानं मढविली
अत्यंत शोभली, उषाताई ॥
हाती गोट तोडे, भाळी बिंदी बीजवर
गळा शोभे चंद्रहार, उषाताईच्या ॥
नाकी मोठी नथ, तोंडा पडली साऊली
चित्रशाळेची बाहुली, उषाताई ॥
ठुशा-पेटचाखाली कंठाचे बारा सर
दिल्या घरी राज्य कर उषाताई ॥

या प्रमाणे स्त्री-जीवनात महत्त्व असलेले आणि लोकजीवनात वापरात असलेले स्त्री-पुरूष आणि लेकरं यांच्या अलंकारांचे दर्शन आपणास लोकसाहित्यातून घडते. या अलंकारानी आपले डोळे दिपतात असे हे अलंकारांचे तेज.

महाराष्ट्रीय स्त्रीचा वैशिष्टचपूर्ण अलंकार म्हणजे नथ. या नथीची जडण घडण पुढील ओवीतून दिसून येते–

लेण्या मंदी लेणं, नथ आरल्याची ल्यावी
जाळीच्या मण्याखाली, हवा डोरल्याची पाहवी ॥

मराठी लोकसाहित्यातून उल्लेख आलेल्या दागदागिण्यांची यादी पुढीलप्रमाणे देता येईल.

१. गळ्यात घालावयाचे अलंकार

मंगळसूत्र; दुलाडपेटी, लिंबोळी डोरलं, जाळीचे मणी, टीकमणी, पुतळ्याची माळ, मोहनमाळ, बोरमाळ, सरी, गरसुळी, चिंचपेटी, चंद्रहार, चितांग, पानपोत इत्यादी सोन्याचे अलंकार.

२. कानात घालावयाचे अलंकार

कर्णफुले, मोत्याची फुले, झुंबर, डूल, कुंडल, मोत्याची ठुशी, जडावाची ठुशी, बुगडया.

३. नाकात घालावयाचे अलंकार

मोरणी, सर्ज्याची नथ, आरल्याची नथ, मोत्याची नथ.

४. दंडात घालावयाचे अलंकार

बाजुबंद, सोन्याच्या दंडपेटया, कडे, कोपऱ्या इत्यादी.

५. हातात घालावयाचे अलंकार

बांगडया, पाटल्या, बिलवर, अंगठी, हिऱ्याची अंगठी.

६. कमरेला बांधावयाचे अलंकार

कमरपट्टा, चांदीची किंवा सोन्याची विशिष्ट घडणीची साखळी.

७. पायात घालावयाचे अलंकार

वाळे, पैंजण, पोलार, तोडे, चैन, जोडवे, मासोळी इत्यादी. स्त्री जीवनात या अलंकाराना महत्त्वाचे स्थान आहे. हे अलंकार वापरण्यामागे काही विशिष्ट भावनाही असल्याचे लोकसाहित्याच्या अभ्यासावरून कळते. अलंकार आणि त्यांच्या गुणधर्माशी कौटुंबिक नात्यांची केलेली गुंफण ही लोकसाहित्यात पाहवयास मिळते. अशा प्रकारचे उदाहरण म्हणून पुढील ओव्या देता येतात.

नणंद-भावजया शिवच्या शेती गेल्या
दंडीच्या तोळबंद्या, इजवाणी चमकल्या ।।
शिपायी शिपायी म्हणितो तुला समदा गाव
कंबराला कंबरपट्टा, वर भरतारा तुझ नाव ।।

लोकसाहित्यातून दिसणारे हे अलंकार अस्सल मराठी घडणीचे असून त्याची मानवी भावनेशी केलेली गुंफण मनोज्ञ व आकर्षक आहे.

लोकसाहित्यातून प्रगट होणारी वेशभूषा

मराठी लोकसाहित्यातून मराठी लोकजीवनाच्या आवडीचे जसे अलंकार पाहवयास मिळतात तशीच त्याची वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषाही लोकसाहित्यातून प्रगट होते.

दिवाळीच्या सणाला भावाकडून चोळी लुगड्याची अपेक्षा करणारी बहिण, कंथाकडून काळ्या चंद्रकळेची अपेक्षा करणारी पत्नी आणि शालूची धटी नेसणारी रमणी आपल्याला लोकसाहित्यात आढळते. तर 'डोईला मंदील' बांधलेला पाटील त्याच्या वैभवाची माहिती सांगताना दिसतो. पत्नी आपल्या पतीकडून कोणती हौस पुरवू इच्छिते हे पुढील ओवीवरून कळते–

हौशी भरतार, हौश करतो मला
काळी चंद्रकळा घेतो बाळंतपणाला ।।

रेशीम जरी काठी चंद्रकळा लोकसाहित्यातील स्त्रियांची विशेष आवडीची दिसते. तसेच गर्भ रेशमी चोळी ही तिच्या आवडीची आहे. पदरावर जरतारी मोराची पैठणी, सोलापूरी चोळीचा खण, काळ्या किंवा निळ्या रंगाची चंद्रकळा, गर्भ रेशमी लुगडे आणि जरीचा उंची खण, अशाप्रकारच्या पोशाखाची आवड स्त्रियात असल्याचे दिसते. तर पुरूष डोक्याला तांबडा मंदील म्हणजे पटका, अंगात अंगरखा आणि रेशीम काठी

घोतर परिधान करीत असताना दिसतात. तर लहान मूल अंगडघा–टोपऱ्यानी सजलेले दिसते. टोपऱ्यावरील रंगीत रेशमी दोऱ्याची नक्षी आणि गोंडा बाळाला साजेसाच दिसतो.

या वेशभूषेसोबतच मानवी शरीराविषयीच्या सौंदर्य कल्पनाही लोकसाहित्यात डोकावून जातात. 'सावळी सुरत' 'गव्हाळी रंग' 'नाजुक बांधा' 'मोठं मोठं डोळं' इत्यादी सौंदर्यविषयक कल्पना बहारीच्या वाटतात. स्त्रीचे लांब सडक केस तिच्या सौंदर्यात भर टाकतात ही कल्पना पुढील ओवीतून स्पष्ट होते.

लांब लांब बाल, सडक तुझी येणी
रूप झाक तू बामणी ।।

उच्च घराण्यातील काही स्त्रिया वेण्या घालीत तर बहुसंख्य स्त्रिया वुचडाच बांधीत.

मराठी लोकसाहित्यातून आलेले अलंकार, वेशभूषाविषयक संदर्भ आकर्षक असून प्राचीन लोकजीवनाची ओळख करून देणारे असेच आहेत.

० ० ०

संदर्भ

१. डॉ. प्रभाकर मांडे : लोकसाहित्याचा अभ्यास : एक दिशा, 'प्रतिष्ठान' दिसेंबर, पृ. २१

२. पं. प्रयागदत्त जी शुक्ल : आरण्य की संस्कृती पृ. ९७–१००

३. रा. चि. ढेरे : संतसाहित्य आणि लोकसाहित्य पृ. १३

४. ना. रा. शेंडे : लोकसाहित्य संपदा पृ. ४४

REFBK-0025444

अध्ययन साहित्य

अ. (१) मराठी

१. अपौरुषेय वाङ्मय अर्थात स्त्री गीते : डॉ. देशपांडे, कमलाबाई
२. अहिराणी लोकगीते : संपादक, पांडये, वि. गो.
३. आदिवासींची लोकगीते : आवारी, गंगाराम जानू
४. आदिवासींचे सामाजिक जीवन : डॉ. संगवे, विलास
५. एक होता राजा... : डॉ. बाबर, सरोजिनी
६. कोलाम : डॉ. मांडवकर, भाऊ
७. घाटावरील श्रमिकांची लोकगीते : लिमये, सौ. अनुसया
८. घे गडे नाव : कर्वे, सुशिला
९. जनलोकांचा सामदेव : डॉ. बाबर, सरोजिनी
१०. जा माझ्या माहेरा : डॉ. बाबर, सरोजिनी
११. तीर्थांचे सागर : डॉ. बाबर, सरोजिनी
१२. धर्म व लोकसाहित्य : भागवत, दुर्गा
१३. प्राचीन मराठीचे वावप्रचार वैभव : डॉ. तुळपुळे, शं. गो.
१४. भाषा आणि संस्कृती : डॉ. कालेलकर, ना. गो.
१५. मराठवाड्यातील कलगी-तुऱ्याची अध्यात्मिक शाहिरी : डॉ. मांडे, प्रभाकर
१६. मराठवाड्यातील लोककथा : डॉ. पठाण, यू. म.
१७. मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी : आपटे, वा. गो.
१८. मराठी लोककथा : डॉ. बाबर, सरोजिनी
१९. मराठी लोकसंस्कृतीचे उपासक : डॉ. ढेरे, रा. चि.
२०. मराठीचा मोहोर : डॉ. नांदापूरकर, ना. गो.
२१. मराठीची माया : डॉ. नांदापूरकर, ना. गो.
२२. मराठीतील स्त्री-धन : डॉ. बाबर, सरोजिनी
२३. महाराष्ट्र लोकसाहित्य माला पुष्प १, २, ३, ४, ५ : कर्वे, चि. ग.
२४. माहेरचे मराठी : डॉ. नांदापूरकर, ना. गो.
२५. लज्जतदार लोककथा : रेगे, पंढरीनाथ
२६. लोककथा : दाते, शंकर गणेश

२७. लोककथा व लोकगीते : जोशी, वि. वा.
२८. लोकगीत : चंद्रशेखरन्, एस. गोपालन्
२९. लोकनाट्याची परंपरा : जोशी, वि. कृ.
३०. लोकसाहित्य : भागवत, दुर्गा (अनुवाद)
३१. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती : डॉ. बाबर, सरोजिनी
३२. लोकसाहित्य : भाषा आणि संस्कृती : डॉ. बाबर, सरोजिनी
३३. लोकसाहित्य : साजशिणगार : डॉ. बाबर, सरोजिनी
३४. लोकसाहित्याची रूपरेखा : भागवत, दुर्गा
३५. लोकसाहित्य संपदा : शेंडे, ना. रा.
३६. लोकसाहित्याचे अंतःप्रवाह : डॉ. मांडे, प्रभाकर
३७. लोकसाहित्याचे स्वरूप : डॉ. मांडे, प्रभाकर
३८. लोकसंस्कृतीची क्षितिजे : ढेरे, रा. चि.
३९. लौकिक दंतकथा : कालेलकर, गो. मं.
४०. संतसाहित्य आणि लोकसाहित्य : ढेरे, रा. चि.
४१. स्त्री-जीवन : साने, पांडुरंग सदाशिव
४२. साहित्याचे मूलधन : कालेलकर, चोरघडे
४३. स्त्रियाकरिता गाणी : पाठक, बाळकृष्ण लक्ष्मण

अ. (२) हिंदी

१. ग्रिम बंधू जर्मन लोककथाएँ : दीक्षित शिवराम (अनुवाद)
२. तीन त्यौहार की लोककथाएँ : कुणाल श्रीवास्तव
३. प्राचीन युनानी कहानियाँ : डॉ. रांगेय राघव
४. भोजपुरी लोकसाहित्य का अध्ययन : डॉ. कृष्णदेव उपाध्याय
५. रूसी लोकसाहित्य : डॉ. केसरी नारायण शुक्ल
६. लोककथाओं के कुछ रूढ तंतु : डॉ. कन्हैयालाल सहल
७. लोकगीतों की सांस्कृतिक पृष्ठभूमि : डॉ. विद्या चौहान
८. लोकसाहित्य : इंद्रदेव सिंह
९. लोकसाहित्य की भूमिका : डॉ. कृष्णदेव उपाध्याय
१०. लोकसाहित्य की सांस्कृतिक परंपरा : डॉ. मनोहर शर्मा
११. लोकसाहित्य विज्ञान : डॉ. सत्येंद्र
१२. लोकसाहित्य विमर्श : डॉ. श्याम परमार

अ. (३) English

1.	Animal Legends	:	Marice Burton
2.	Arbian Romances and Folk Tales	:	H. I. Katibah
3.	Bengal Fairy Tales	:	F. B. Bradleu
4.	Blue Fairy Book	:	Andrew Lang
5.	Burmes Wonder Tales	:	Donald A Mackenise
6.	Folk Literature of Maharashtra	:	Sarojini Babar
7.	Indian Fairy Tales	:	Mulkraj Anand
8.	The Golden Age of myth and Legend	:	Thomas Buifinch
9.	The Science of Folklore	:	Alexander Krappe
10.	The Yellow Fairy Book	:	Andrew Lang

०००